# माणूस

किसान-कामगार विशेषांक । २६ जुलै ८० तीन रुपये

# कोण म्हणतो दुष्काळग्रस्त शेतकऱ्याचे भाग्य उजळू शकत नाही?



*With Best Compliments From :*

QUALITY CHEMICALS COMPANY

Kalashree, Prabhat Road, Lane No. 6
Poona 411 004.

Phone : 56628

# पाणकळा । पाणकळा । पाणकळा । पाणकळा । पाणकळा

महाराष्ट्राच्या उत्तर विभागात 'कर्परा' नदीच्या काठी एक गाव आहे. त्याचे नाव 'सजलपूर'. रामायणकाळी या प्रदेशाला 'दंडकारण्य' किंवा 'दक्षिणापथ' असे म्हणत. याच प्रदेशात सीता—रामाच्या वनवासाची चिमुकली पावले उमटली. याच प्रदेशात शबरीने आंबट म्हणून टाकलेल्या बोराच्या आठया रुजल्या. याच बोरीचे वंशज अद्याप या भागात राने करून वाढत आहेत. पावसाळयात या प्रदेशात असख्य नदीनाले नागिणीची नुकतीच वीण झाल्याप्रमाणे पदोपदी आडवे जातात. हिवाळयात काळया वावरातून व नदी—काठच्या गाळपेरातून तजेलदार शाळूची ताटे डोलतात व त्या शाळूमधून कर्परेची धार पायात पैजण घातलेल्या अल्लड बालिकेप्रमाणे छुमछुम् आवाज काढीत त्या नादावर संथपणाने वाहते

नदीकाठी चुनखडीची पाढरी सपाटी आहे. ती काळया वावरांना जणू किनार लावल्याप्रमाणे दिसते. ही पाढरी सपाटी पाहून संस्कृत वाङमयात वर्णन केलेली 'तपोभूमि' ती हीच तर नव्हे ना, असे वाटू लागते! या पाढरीत, कर्परेच्या घशीवर, काळया रानाच्या वेढयात, शांत आडोशाला 'सजलपूर' लाव्हरीच्या घरटयाप्रमाणे वसले आहे. गावात मुख्य वस्ती शेतकऱ्यांची आहे. ह्या भागात सर्व शेतकी आकाशातून पडणाऱ्या पावसावर अवलंबून असते. पावसाला ह्या भागात 'पाणकळा' असे म्हणतात. एक साल 'पाणकळा' जर चांगला झाला तर काळया चिक्कण मातीत पाणी इतके धरते की, दोन साल ते विहिरींना पुरते. या कारणामुळे कोठे दोन पुरुष खणले तर सजलपुरात विहिरींना पाणी लागते. तेव्हा गावाचे नाव 'सजलपूर' आहे ते योग्यच आहे. विहिरीमुळे गाव बागायती आहे. गावाचा सरकारी वसूल देखील मोठा आहे. माळवदावरून पाहिले की, नदीकाठाने व गावाच्या चौफेर संत्री-मोसंब्यांच्या बागा हिरव्या वसाहतीप्रमाणे ठायी ठायी दिसतात व त्यातून साजसकाळी मोटांचे 'कर्र कर्र धो:' असे आवाज, मोटा हाकणारांच्या ललकाऱ्या व बैलांना आणि स्त्रियाना उद्देशून म्हटलेली अर्थशून्य गाणी ऐकू येतात. उन्हाळयात नदीनाले आटले तरी गारवा हटत नाही. चुनखडीमुळे नदीचे पाणी स्वच्छ व पाचक बनते आणि हिवाळयात ते इतके स्वच्छ होते की, डोहाच्या तळची वाळू मोजून घ्यावी.

काळया मातीत पाणी पुष्कळ धरते.पण केव्हा? 'पाणकळा'चांगला होईल तेव्हा. पण हा 'पाणकळा' आहे लहरी, विचित्र! पडला तर ठीक, नाही तर एखाद्या छळवाद्यापेक्षाही तो शेतकऱ्याचे जास्त हाल करतो एखाद्या वर्षी तो खूप पडून ओला दुष्काळ पाडतो, आलेले पीक मातीत लोळवतो व मग मातीत पडलेल्या कणसाना मोड येऊन ती रुजू लागतात. त्या साली वनस्पतीचे जीवन होण्याचे ऐवजी तो विष बनतो. एखा वर्षी तो मुळीच पडत नाही व शेतकऱ्याच्या घरादारांचा उन्हाळा करून टाकतो. एखाद्या वर्षी शेतकऱ्याच्या इच्छेप्रमाणे हुकमी पडून तो सुगी पिकवतो, तर दुसऱ्या साली अवकाळया पडून हातातोंडाशी आलेल्या पिकांचा घास पळवतो. मामलेदाराने रिपोर्ट करावा की, पीक सोळा आणे आहे. पण तो रिपोर्ट कमिशनर ऑफिसमध्ये जाण्याच्या आत पावसाने डोळे वटारावेत व पोटरीत आलेली कणसे करपून जावीत एखाद्या साली पावसाचे सात्रे बसून सूर्यदर्शन होऊ नये, तर एखाद्या साली आषाढात दुश्चिन्ही पांढरे स्वच्छ चादणे पडावे. एखाद्या वर्षी संध्याकाळच्या उन्हाच्या तिरीपेत शाळूचे पीक इतके सुन्दर दिसते की, आता हे पीक खाणार कोण, साठवणार कुठे, असा पाहुणारास प्रश्न पडतो. पण दुसरे दिवशी पंधरावीस मिनिटे धुके निघते व तेवढयात सर्व पीक जळून काळे होते किंवा त्यावर कीड पडते. केव्हा केव्हा रात्रीतून कडका पडतो व हिवाने शाळू जळतो किंवा त्यावरती साखर बाजून तो निकस होतो. याप्रमाणे अनादी कालापासून पाऊस हिंदुस्थानात शेतकऱ्यांवर हुकमत गाजवून राहिला आहे. सर्वजण शेतीवर अवलंबून आणि शेती आकाशातून पडणाऱ्या पावसावर अवलंबून! म्हणूनच पाव-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : आठवा
२६ जुलै १९८०
किंमत : तीन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

साला 'मेघराजा' म्हणतात. हा आमचा दुसरा बादशहा आहे. याच्यावर आमची सुखदुःखे, हालअपेष्टा, भलेबुरे दिवस अवलंबून असतात. सातासमुद्राच्या पलीकडील मँचेस्टरचे गिरणीवाले याच्यावर टपून बसतात त्याना तासातासाला पावसाच्या तारा जातात व त्याप्रमाणे ते आपल्या गिरणीत कापड काढतात.

हा 'पाणकळा' म्हणजे शेतकऱ्याचे जीवन, सुखाचे स्वप्न, आनंदोत्सव ! मातीत राबणाऱ्या व काबाडकष्ट करणाऱ्या जीवाचे 'पाणकळा' म्हणजे विश्वसंगीत ! वाजत, गाजत, गर्जत येऊन त्याने तापलेल्या कस्तुरीच्या काळ्या वावरात अमृताची बरसात सुरू केली, की लाखो कमळे फुलल्याप्रमाणे मातीचा सुगंध पसरतो. खेड्यातील लोक शेतात खपू लागतात. कस्तुरीच्या वावरात पाभरी सुरू होतात व त्यातून मोत्याचा पेरा होतो. पाच-सात दिवस वाफसा झाला म्हणजे जिकडे तिकडे हिरवेगार होते. नदीकाठाने, मळ्यातून, मैदानातून गालिचे पसरले आहेत असे वाटते. त्याच्यावरून तांबड्या पाण्याच्या नद्या तांबडमातीच्या माळावरून मळलेल्या वाटांप्रमाणे लाल दिसतात व त्या सों सो आवाज करीत पूर्वेकडे वाहात जातात. जिकडे पाहाल तिकडे हिरवे ! जणू काय हिरवा चष्मा घालूनच आपण पावसाची हिरवी जादू पाहात आहोत.

पाऊस मलबारकडून पश्चिम किनाऱ्याने समुद्राच्या लाटा खडकावर व किनाऱ्यावर आपटीत, नारळी-सुपारीच्या बागांचे शेंडे हालवीत, ताल व शाल वृक्षाना वाकवीत, रायांच्या पाचोळ्यात आंब्याच्या राशी पाडीत, सागाच्या जंगलातील वाळलेल्या पानांवर कोट्यवधी टपोरे थेंब शिंपून मोठे परचक्र आल्याप्रमाणे आवाज काढीत सोसाट्याने कोकणात येतो. मग त्याच्या धारांतून घुरणाऱ्या डोंगराची शिखरे दिसेनाशी होऊन बरसात सुरू होते. आंब्यांच्या फळांवरून व झाडाच्या पानावरून काजवे इतके बसतात की, डोंगरावरून पाहणारास खाली हिरव्या उजेडाची पाणथळ झाली आहे असे वाटते. त्याच्या उजेडाने दऱ्या चम्‌चम् करतात व पाणथळीतून हजारो बेडूक त्याना खाण्याकरिता उड्या मारतात. डोंगरावरून धबधबे आवाज करीत कोसळत राहतात.

काही दिवसानी हाच पाऊस घाटावर वळतो. लिंबाच्या सावलीला हताश होऊन निजलेल्या शेतकऱ्याने सकाळपासून बघावे तर आकाश निरभ्र व त्याखाली त्याचे नागरून, मशागत करून धूळपेरा केलेले शेत पावसाची वाट पाहात पडले आहे. इतक्यात नैऋत्य दिशेला त्याला तळहाताएवढा एक काळा ठिपका दिसतो. तो ठिपका वाढत वाढत जातो. वाढता वाढता तो क्षितिजावर पाताळातून कंबरेइतक्या वर आलेल्या काळ्याभोर राक्षसासारखा दिसतो. थोड्या वेळाने त्याच ढगाचा दुसरा राक्षस, तिसरा राक्षस असे एकामागून एक राक्षस दिसू लागतात. जणू पश्चिमेला काळ्या राक्षसांनी उठाव केला आहे ! पूर्वेकडे पाहावे तर हिमालयाच्या बर्फाच्या शिखरांप्रमाणे किंवा सैन्याच्या तळावरील तंबू-राहुट्यांप्रमाणे पांढरे ढग चोहोकडून उठले आहेत ! थोड्या वेळाने पाहावे तर हिमालयाची शिखरे, तबू, राहुट्या नाहीशा झाल्या आहेत व त्यातून काळ्या राक्षसाचे सैन्य हल्ला करण्याकरिता दबत दबत चोहोकडून येत आहे इतक्यात अस्तमान होतो व ढगाढगावर पडलेल्या मदिरावर्णी प्रकाश उजेडात दुष्काळी दुनिया पावसाची वाट पाहताना उभी दिसते. डोक्यावरून जाणाऱ्या वांझ्या ढगानी त्यांना असे किती तरी वेळा फसविले आहे. नाही, पण आजचा रंग निराळा आहे. सूर्य खाली गेला. ढग पुन्हा काळे होऊ लागले. छातीवरून सरकणाऱ्या जानव्याप्रमाणे विजा दक्षिण उत्तर चमकू लागल्या. 'दक्षिण उत्तर चमके बिजली पश्चिम वाहे वात' हा भाडळी ज्योतिषाचा दोहरा म्हणत लोक पाणकळा आला, असे सर्वांना सागत सुटले. दुखणाइताच्या पाठीत सणका चमकाव्यात व तो रात्रभर विवळत पडावा त्याप्रमाणे रात्रभर विजा चमकू लागल्या व ढग धडं धडं गुडं असा आवाज करीत राहिले. जणू काय इंद्र व वरुण याची आकाशात लटकी लढाई चालली आहे ! शेतकऱ्याची आशा बळावली. पण सकाळी उठून पाहावे तो काय ? भाडळी मताला खोटे ठरवून पश्चिमेकडच्या वाऱ्याने सर्व ढग सावरीत कापसाप्रमाणे कोठे उडवून नेले त्याचा पत्ता नाही !

पाऊस सर्व भागात एकदम सुरू होत नसतो. कडकडत गडगडत तो आज येथे पडला, तर उद्या लाब क्षितिजावर पडताना दिसेल व काळ्या ढगातून पडणाऱ्या त्याच्या धारा जलवंतीच्या सुटलेल्या केशकलापाप्रमाणे दिसतील; कधी कधी त्यात विजेची कलाबूत किंवा इंद्रधनुष्याचे रंग दिसतील, तर कधी तो स्वर्गातून सोडलेल्या झुलत्या जिन्यासारखा दिसेल. शेतकऱ्याचा स्वर्ग याच जिन्याने खाली येतो. ऊन्ह-पावसाच्या तिरीपेत इंद्रधनुष्याच्या कमानीतून हा स्वर्ग पावसाळ्यात कैक वेळा पाहावयास मिळतो. याप्रमाणे एखाद्या मोठ्या झारीने शिंपडावे तसे जिल्ह्येच्या जिल्हे पावसाने झोडपून निघतात.


**VIDYA SAHAKARI BANK LTD.**

596, Sadashiv Peth, Pune 411 030.

Phone : 44 49 36

| | | |
|---|---|---|
| Authorised Share Capital | Rs. | 10,00,000 00 |
| Paid-up Share Capital | Rs. | 6,25,300·00 |
| Number of Members 3000 | | |
| Total Deposits | Rs. | 110,55,000·00 |
| Total Advances | Rs. | 89,91,000·00 |
| Working Capital | Rs. | 132,90 740·00 |

Prof. V. A. Joshi
*Chairman*

Prof. V. R. Shirgurkar
*Vice-Chairman*

Shri. J. G. Nalawade
*Manager*

## Lathia Rubber MFG. Co. Pvt. Ltd.

**BOMBAY**

" I am only one, but I am one. I can't do everything, but I can do something. And what can I do, that I ought to do. And what I ought to do, by grace of God, I shall do."

*— EDWARD HALE*

We don t say that we can do everything. Whatever we can do, we are doing and we will do it. Our efforts were duly recognised and rewarded; success came in abundant measure. Long since, to develope products for import substitution has been the motto of LATHIAS. We won our first National Award for developing Rubber Blanket for Sanforizing Machine for Textiles in 1969. Thereafter three other National Awards followed in quick succession for pioneering the developements of Evast Rubber Sleeve ( for Textiles ), Suction Press Rolls ( for Paper ), Mercury Cells for Coustic Soda plants.

We enter our Silver Jubilee year with development of five new rubber products STONITE, MICROROCK, BLACK DIMAND, MICROMATE and SIL ROLL ( Silicone covered Roll ) that will revolutionise industry.

**Lathia Rubber MFG. Co. Pvt. Ltd,**
Sakinaka, Kurla - Anderi Road
Bombay 400 072.
Gram : LICANRELY
Phone : 551925/26 Telex ' 011-2430


कधी कधी पाऊस वर डोगरात पडून नद्याना त्यामुळे जे मोठे पूर येतात त्याची खालच्या मैदानातील लोकाना दख्खल नसते. मग लाल व गढूळ पाण्याचा एक प्रचंड लोढा नदीच्या कोरड्या पात्रातून, रंधा मारलेल्या लाकडाच्या ढलप्याप्रमाणे गुडाळून, आक्राळविक्राळ आवाज करीत, तोड वासलेल्या सापाप्रमाणे लोटत येतो. लोढ्याच्या तोडाशी असलेली पाण्याची भित खळखळ आवाज करीत, मुडपत पुढे सरकू लागली म्हणजे तिच्यातून गवताच्या काड्या, टरबुजे, कलिगडे, भेल्या, नदीच्या पात्रात वाळत घातलेल्या मिरच्या, गाड्या, बैल, शेळ्या–मेढ्या, क्वचित् माणसांचे मुडदे वरून खाली व खालून वर जाताना दिसतात. नदीच्या पात्रातील लोक 'नदीला जीभ फुटली, जीभ फुटली' असा इतराना इशारा देत जीव घेऊन पळत सुटतात.

याप्रमाणे दख्खनच्या पूर्व भागात पावसाचा काही नेम नसतो. आदल्या दिवशी जेथे घुरळा दिग्गजाच्या सोडेप्रमाणे वातचक्राबरोबर आकाशात गरगरा वर जाताना दिसतो तेथे दुसऱ्या दिवशी गुडघा गुडघा चिखल होतो. ऑब्झरव्हेटरीने भविष्य केले की, मान्सून कोरडा, की पावसाने जलप्रलय करावा. सिमल्याहून तार आली की, भयंकर पाऊस, की त्या साली हटकून दुष्काळ. तरी सरसहा मृगाला बरसात सुरू होते. काळ्या पहाडाप्रमाणे एकामागून एक ढग येतात व पृथ्वीवर जलप्रलय करतात. मृगानतर पुनर्वसु, पुष्य अशी नक्षत्रे क्रमाने पडतात. पंचमघा रब्बी व खरीपाच्या पिकामध्ये ताजवा घेऊन उभ्या राहतात. दुष्काळ की सुकाळ तेथें ठरतो. शेवटी मंगलाष्टके संपल्यानंतर होणाऱ्या वाद्याच्या कडकडाटाप्रमाणे हस्ताचा गटगडाट होतो. जणू हत्तीची वरात सोडेने पाणी शिपडीत चालली आहे! हाच खरा मोसमी पावसाचा शेवट. हस्तामागून चित्रा व स्वाती क्वचित् पडतात. त्यानंतर सुगी पिकू लागते. बाजरी काळीशार दिसते. तिळाची शेते पिवळी दिसतात. शाळू मोत्यांचे घोस घेऊन उठतात. अठरा धान्ये पिकून बाराबलुत्याची चंगळ उडते. हरळी, कुंदा, बाटूक जनावराना विपुल मिळू लागले. तलाठ्याच्या श्राद्ध–पक्षाला व कोजागिरीला खूप दूध मिळते. खण, लुगडी, मुडाशी याची विक्री जोरात चालते. साळ्याचे माग चालतात. माळ्याचे माळवे विकते. जत्रा–उरुसाना ऊत येतो. खेळ–तमाशे सुरू होतात, पाहुणे जाण्याचा मोसम सुरू होतो. लावणीवर पडलेली लग्ने उरकली जातात. पाटील सर्व पट्टी वसूल झाली म्हणून छाती काढून चालतो. जनावरांची कातडी सतेज होते. ती दुध्रे चढवतात. दूध-दुभते, हुळा-हुरडा विपुल खाण्यास मिळाल्यामुळे लोक तेजस्वी दिसू लागतात. जवान नदीच्या पात्रातून मेहनत सुरू करतात व दंड थोपटून वाळवंट दणाणून टाकतात

सजलपूरची दुनिया देखील याच पाणकळ्याबरोबर हेलकावे खात कालचक्राचे फेरे पुरे करते. शेतकऱ्याचा स्वभावविशेष, त्याची आर्थिक परिस्थिती, राग, लोभ, द्वेष, प्रणय, राजकारण, लगीनवऱ्हाड, सणसुगी, गुडगिरी, आशा, महत्त्वाकाक्षा – सर्व काही या पाणकळ्यावर अवलबून असते. त्या पाणकळ्याचे परिणाम त्याना वर्षभर, नव्हे जन्मभर पुरतात.

पावसळ्यानतर कार्तिकात थंडी पडू लागते. मार्गशीर्षात थंडीचा अम्मल वाढू लागतो. पुढ पुसात आब्याच्या आम्राळीला माहराच्या

डिऱ्या दिसू लागल्या म्हणजे सजलपुरात सृष्टिदेवीने सुगंधाचे फर्मान काढले आहे असे वाटते. चौफेर संत्री–मोसंब्यांचे बाग फुलू लागतात. स्वच्छ निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर तांबड्या डाळिंबीची फुले डुलतात. रानावनात आजूबाजूला झाडांना बहर येतो. मळ्यामळ्यांतून, तळ्यातळ्यांच्या बाजूने सुगंध दरवळून राहतो. जिकडे तिकडे फुलांचा घमघमाट सुटतो व सजलपुरावर परिमळाचे वातावरण बसून राहते. जो श्वास घ्याल तो गंधयुक्त. फुलांच्या सुवासाने जीव वेडावून जातो. जसजसा माघ महिना जवळ येऊ लागतो तसतसा सुवासाचा बहर वाढत जातो. एकामागून एक मळे फुलू लागतात. आज काय गुलाबराव पाटलाचा बाग फुलला, परवाच्या दिवशी जयवंतरावाचा बाग फुलला, यंदाच राजमलच्या झाडांना बार धरला, अशा तऱ्हेने एकदा सुरुवात झाली की, बारमहा सुगंधाची खैरात चालते व दररोज निरनिराळ्या प्रकारच्या सुवासाचा अनुभव मिळतो. असे निरनिराळे सुवास सुटू लागले की, निसर्गाने कानपुरी अत्तरवाल्याचे सोंग घेतले आहे व तो शेमल्यात खोवलेले निरनिराळ्या अत्तरांचे फाये काढून गिऱ्हाइकांना पटवीत आहे असे वाटू लागते. आंबेबार, मृगबार व हत्तीबार या मोसमात संत्री–मोसंब्यांच्या बागा चढाओढीने एकमेकांवर ताण करीत फुलू लागल्या की, सजलपूरच्या अंतराळात सुगंधाचा दर्या उसळतो, आणि तशात या फळझाडांच्या सुवासाबरोबर जाई, जुई, नेवाळी, कुंद, मोगरा, गुलाब किंवा शेवंती यांचे सुवास वाऱ्याच्या झुळकीबरोबर रात्रीच्या प्रशांत समयी अंतराअंतराने येऊ लागले की, सुगंधाची अखंड रागदारी चालली आहे असे वाटते. □

**कै. र. वा. दिघे यांच्या गाजलेल्या 'पाणकळा' या कादंबरीचे गाजलेले पहिले प्रकरण. साभार पुनर्मुद्रित. र. वा. दिघे यांना श्रद्धांजली वाहणारा लेख पुढील अंकी.**


*With Best Compliments From*

**Shri Rajshekhar B. Patil**

*B.E. (Elec.) C. ENG (I) M.I.E.*

*Chartered Engineer*

Nayar Samaj Building
14, Sir Bhalchandra Road
DADAR, Bombay 400 014

Phone : 44 67 57



*With Best Compliments From* :

**Rashtriya Chemicals & Fertilizers Limited**

SUPHALA

Complex granulate fertilizer suitable for veriety of crops and soils

UREA

High analysis nitrogeneous fertilizer containing 46% N.

INDUSTRIAL PRODUCTS

Methanol Ammonia (Anhydrous) Urea (technical grade) Argon 99.995% Dilute Nitric Acid (technical) Concentrated Nitric Acid Sulphuric Acid 98% (tech.) Ammonium Bicarnonate (food grade) Ammonium Bicarnonate (IP/BPC) Carbondioxide Sodium Nitrite Sodium Nitrate Carbon Black Monomethylamine 40% Dimethylamine 40% Trimethylamine 30% Ammonium Nitrate (Prilled)

Rashtriya Chemicals & Fertilizers Ltd.
CHEMBUR, Bombay 400 074.

# हे शक्य आहे, आपल्या आवाक्यातले आहे....

सोमा. दुष्काळी भागातील एक सर्वसामान्य शेतकरी. पाच–सहा एकर जमीन, चार–पाच जणांचे कुटुंब. मजुरी करून संसाराचा गाडा कसाबसा रेटणारा एक अशिक्षित माणूस.पण एक वेड या सोमाला लागले. आपल्या शेतात एक विहिर खणायला त्याने घेतली. रोज सकाळी–संध्याकाळी वेळ मिळेल त्याप्रमाणे तो एकटाच आपल्या शेतात खड्डा खणत राहतो. सगळेजण त्याला वेडा ठरवतात. पण सोमाच्या दिनक्रमात त्यामुळे काही फरक पडत नाही. महिने, वर्षे उलटतात. त्याचा आपला श्रमयज्ञ चालूच असतो.

यज्ञ शेवटी फलद्रुप होतो. साळुंख्यांची पाणी पंचायत सोमाच्या गावाला पोचते. शेजारी पाझर तलाव होतो. लिफ्टची सोय होते. सोमाच्या शेताला पाणी मिळते. विहिरीला पाणी लागते.

सोमाला विजय परुळकर विचारतात, 'काय सोमा, आता डबल पाणी आले. विहिरीवर इंजिन–पंप वगैरे बसवून सगळी शेती आता बागायती करणार की नाही ?'

सोमा विजयकडे चमत्कारिक नजरेने पाहतो. विजयचा प्रश्न शहरी असतो. सोमाचे उत्तर भारतीय शेतकरीच देऊ शकतो.

निरनिराळ्या विकासकार्यक्रमांमुळे शेतकऱ्यांची स्थिती आता सुधारते आहे. अगदी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या घरातही लक्ष्मीची पाउले उमटू लागलेली आहेत. हा विकास तुरळक ठिकाणी असेल, त्याची कारणे निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या प्रकारची असतील, त्याचे प्रमाण कमीजास्त असेल. पण ग्रामीण समृद्धीचे दिवस आता फार लांब नाहीत. शहरी मंडळींनाही हा विचार आता पटत चालला आहे, की ग्रामीण भागात विकासाचे लोण पोचवल्याशिवाय शहरातील कारखानदारीवर अवलंबून असलेली समृद्धीही सुरक्षित नाही. झोपडपट्ट्यात सारखी भर पडत आहे. शहरातील गलिच्छ वस्त्यांचे मूळ खेड्यातील उजाडपणात आहे. हा उजाडपणा कसा कमी करायचा ? पाणी पंचायत हा एक मार्ग आहे. त्याची विस्तृत ओळख या अंकात विजय परुळकर यांनी करून दिलेली आहे.

गेल्या वर्षी हेच विचारसूत्र असलेला किसान कामगार अंक माणूसने काढला होता. ( जून १९७९ ) त्याचे स्वागत चांगले झाले म्हणून यंदाही हा उपक्रम केला. या किसान कामगार अंक क्रमांक दोनचे स्वागतही चांगले होईल अशी अपेक्षा आहे.

पाणी पंचायत प्रयोगाच्या यशाचे रहस्य कशात आहे ? साळुंख्यांसारखा यशस्वी उद्योजक आपले सर्व आधुनिक ज्ञानविज्ञान घेऊन या कार्यात उतरला, म्हणून पाणी पंचायत उभी राहिली. हजार पाचशे माणसे आज झोपडपट्ट्या सोडून आपल्या गावाकडे परतायला तयार झाली, हे यश कमी नाही. असे साळुंखे अधिक संख्येने पुढे यायला हवेत. शहरकरी आणि गावकरी यांचा सहयोग असायला हवा. त्याशिवाय आपला दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही. योजनांपेक्षा योजक महत्त्वाचा आहे हे सत्य आपले राजकारणी आणि अर्थकारणी जेवढे लवकर लक्षात घेतील तेवढ्या लवकर दारिद्र्याची रेषा पुसटपुसट होत राहील.

साळुंखे ज्या भागात कार्य करीत आहेत तो भाग एकेकाळी समृद्ध होता. फळा–फुलांनी डवरलेला होता. निसर्गाच्या लहरीमुळे नाही तर माणसाच्या अधाशीपणामुळे हा भाग उजाड झाला व दुष्काळी चक्रात अडकला. गावकरी शहराकडे कामधंद्यासाठी ढकलले गेले. त्यांना हा कामधंदा पुन्हा खेड्यातच निर्माण करून देता येणे शक्य आहे का ? विद्वान मंडळी अशी शक्यता फार कमी आहे असे सांगतात. पण सोमाचा, साळुंख्यांचा अनुभव काही वेगळाच आहे. या अनुभवाची आणि विद्वान मंडळींच्या ज्ञानाची सांगड का जमू नये ? अशी सांगड जमली तर मुखपृष्ठावर जिचे छायाचित्र आहे ती सुमन पुरंदर तालुक्यातील कोथळे या गावीच फक्त असणार नाही. दुष्काळावर व भकासपणावर मात केलेल्या नव्या, उगवत्या पिढीची ती एक प्रतिनिधी ठरेल. गावोगाव असे हसरे चेहरे आपल्याला पाहायला मिळतील.

हे शक्य आहे, आपल्या आवाक्यातले आहे, एका पिढीत घडवता येण्यासारखे हे परिवर्तन आहे, हे तो न शिकलासवरलेला सोमा आपल्याला कृतीने सांगतो आहे. थोडी उमेद हवी, दानत हवी.

बाकीचे तंत्रज्ञान, मनुष्यबळ, साधनसामग्री यात आपण कमी नाही. पण हे सगळे आज शहरात केन्द्रित होऊन बसले आहे त्यातील काही हिस्सा तरी खेड्यांकडे आपण घेऊन गेलो तर शहरे वाचतील. आणि घेऊन जायचे म्हणजे उपकार म्हणून नाही, उद्धाराच्या भावनेने खेड्यात जाण्यापेक्षा न गेलेले बरे. तिथे जाऊन आपल्याला काही नवीन शिकायला पहायला मिळणार आहे अशी सहकार्याची –देवाणघेवाणीची दृष्टी हवी. सोमाला काही द्यायचे आहे तसेच त्याच्याकडून काही शिकायचेही आहे. विशेषत: ती सोमाची नैतिकता, सामाजिकता. आपल्या तांत्रिकतेला ही जोड नसेल तर ?–

पंडित नेहरूंनी आझाद व्याख्यानमालेचे उद्घाटन म्हणून 'भारत आज आणि उद्या' या विषयावर तीन व्याख्याने दिली होती. तिसऱ्या व्याख्यानाचा समारोप त्यांनी असा केला आहे. पं. नेहरू म्हणतात–

'परंतु मला जी चिंता आहे ती केवळ आमच्या भौतिक प्रगती–विषयीच नव्हे तर आमच्या लोकांचे शील आणि त्यांच्या मनाची सखोलता याविषयी आहे. औद्योगिक प्रगतीने सामर्थ्य प्राप्त झाल्यामुळे वैयक्तिक संपत्ती आणि सुखी जीवन साध्य करून घेण्याच्या प्रयत्नात आम्ही आमचे व्यक्तिमत्व तर गमावणार नाही ना ? तसे झाले तर ती एक शोकांतिका ठरेल. कारण त्यामुळे ज्या व्यक्तिमत्वाबद्दल भारताची गतकाळात प्रसिद्धी होती आणि मला वाटते वर्तमानकाळातही जे व्यक्तिमत्व गांधीजीच्या जीवनात प्रतीत झाले, ते नाहिसे होईल. सामर्थ्य आवश्यक आहे पण सूज्ञपणाचीही तितकीच गरज आहे.'

हा सूज्ञपणा आपल्याला सोमाकडून शिकायचा आहे. कारण गतकाळात ज्या व्यक्तिमत्वाबद्दल भारताची प्रसिद्धी होती ते व्यक्तिमत्व अजूनही गावोगाव असलेल्या अशा असंख्य सोमांच्या रूपाने अजूनही शाबूत असलेले आपल्याला दिसेल.

असे ऐकतो की, पुरंदर तालुक्यातील नायगावजवळचा हा सोमा आता काही दिवसांनी रुपेरी पडद्यावरही झळकणार आहे.

'माणूस'ला संधी अगोदर मिळाली. ही आणून दिल्याबद्दल सोमा आणि साळुंखे पती–पत्नी, विजय आणि सरोजा परूळकर, पाणी पंचायतीचे कार्यकर्ते या सगळ्यांचा 'माणूस' ऋणी आहे.

–संपादक


*With Best Compliments*
*From*

**Mrs. Sudha Sharad Kulkarni**
BOMBAY

AND

**Shri Manohar Waingankar**
KOLHAPUR

TO
KISAN-KAMGAR SPECIAL NUMBER
MANOOS



# कशासाठी पोटासाठी खंडाळ्याच्या घाटासाठी अर्धा एकर पाण्यासाठी

लेखक
विजय परुळकर



मुंबई भारताची भलीमोठी व्यापरपेठ. मुंबई-महाराष्ट्राची राजधानी. जेव्हा परदेशी पाव्हण्यांची ये-जा फक्त समुद्रमार्गानं चालायची तेव्हाची गेट वे ऑफ इंडिया म्हणजे मुंबई. कुण्या एका बिनरंगी व्यापारी राजानं दुसऱ्या एका सफेदचमडी व्यापारी राजाला लग्नात आंदण दिलेलं बेट म्हणजेच मुंबापुरी-बाँबे, बंबई किंवा मुंबई.

मुंबई—महाराष्ट्राचं नर्व्ह सेंटर. इकडच्या तालावर आख्खा महाराष्ट्र नाचतो. मुंबई म्हणजे महाराष्ट्राची पैशाची खाण. उद्योगपतींचं माहेर. कोट्याधीशांची स्वप्ननगरी ! फिल्मी हिरो-हिरॉइन्सची कचकडी चंदेरी दुनिया म्हणजे मुंबई!

ही नगरी महाराष्ट्राची राजधानी व्हावी म्हणून ज्यांनी प्राण गमावले त्यांचं हुतात्मास्मारक म्हणजे फोर्टातल्या फ्लोरा फाउंटनच्या परिसरातील कबुतरांचं आवडीचं विश्रांतीस्थान. मुंबई म्हणजे फोर्ट. इतरत्र पसरली आहेत ती सर्व सबर्बज-उपनगरे. पुण्याचे लोक, कोकणातले, देशावरचे-घाटावरचे जसे 'मुंबईला जातात' त्याचप्रमाणे दादर—पार्ल्याची जुनी माणसं कोर्टात काम असलं की अजूनही 'जरा मुंबईला जाऊन येतो' असं म्हणतात-अशी ही विराट आणि अजस्र नगरी मुंबई.

मुंबई म्हणजे 'मिनी भारत.' मुंबई म्हणजे अक्राळविक्राळ पसरलेली भारदर्शन घडविणारी अखंड झोपडपट्टी !

ह्या मुंबईत तुम्ही मागाल ते मिळू शकतं. तुमचं कसलंही स्वप्न पुरं करण्याची जबरदस्त ताकद ह्या महानगरापाशी आहे, फक्त तुमच्यापाशी पैसे मात्र हवेत. भरपूर पैसे. इथं पैसा बोलतो, पैसा चालतो, पैसा नाचतो आणि नाचवतो ! अर्थात बिन पैशांनी राजासारखी जगणारी माणसंदेखील ह्याच महानगरात आहेत; पण ती वेगळी !

अठरापगड जातींची बजबजपुरी म्हणजे मुंबई. ह्या मुंबईची आपली स्वतःची अशी एक खास आणि आगळी संस्कृती आहे. तिचा ठसा महाराष्ट्राच्या संस्कृतीपेक्षा वेगळा आहे. मुंबईची भाषा देखील अशीच खास आहे. 'खालीपिली बोंब कायकू मारताय' हे फक्त मुंबईतच ऐकायला मिळणार, इतरत्र नाही. त्या मुंबईचं सर्वच काही असं खास आणि वेगळं आहे.

मुंबईकरांचं ह्या महानगरावर अतोनात प्रेम आहे. त्यांना भारतामधील इतर कुठल्याही शहरात रहाणं पसंत पडत नाही. अस्सल मुंबईकराचा जीव दुसऱ्या शहरात रमतच नाही. जीना यहाँ—मरना यहाँ. कारण ये है बाँबे-ये है बाँबे-ये है बाँबे-मेरी जान ! मुंबईवर प्रेम असणाऱ्या अनेक मुड्द्यांचे आत्मे राजाभाई टॉवरवर बसून आपल्या लाडक्या नगरीचा अफाट संसार कौतुकानं पहात तिथंच घुटमळत असणार !

नवखा माणूस ह्या नगरीत पाऊल टाकताच प्रचंड बावरून जातो, गोंधळून जातो. जत्रेत हरवलेल्या मुलासारखी त्याची अवस्था होते; पण त्या नगरीचं हृदय फार विशाल आहे. पहाता पहता नवख्याला ती आपलासा करून घेते. आपल्या 'सिस्टिम' मध्ये, आपल्या जत्रेमध्ये—विराट गावगाड्यामध्ये अलगद सामावून घेते.

मुंबई म्हणजे एका विशिष्ट प्रकारच्या शहरी संस्कृतीचा अभेद्य चक्रव्यूव्ह आहे. आत शिरकाव होणे कठिण आणि चुकून प्रवेश मिळाला की परतीची वाट सापडणं त्याहूनही कठिण! यंत्राच्या पोटी जन्माला

आलेल्या ह्या संस्कृतीच्या चक्रव्यूहात माणूस एकदा सापडला की तो खोलवर अडकतच जातो. पुन्हा बाहेर पडणं त्याला जवळजवळ अशक्यच.

मुंबई म्हणजे एक अजस्त्र 'सक्शन पंप' आहे. भारताच्या चारी कानाकोपऱ्यांतून जरूर असेल ते सर्व काही खेचून घेण्याची राक्षसी शक्ती ह्या नगरीच्या ठायी आहे आणि एखाद्या महाशक्तिशाली ब्रह्माच्या दाबयंत्राप्रमाणे आपल्याला जे नको आहे त्या सर्वांची एकत्रित गठडी वळवण्याची क्षमता देखील ह्या शहराच्या संस्कृतीमध्ये आहे. माणसाच्या आशा-आकांक्षा साकार करण्याचा किंवा भरडून चक्काचूर करण्याचा अद्‌भुत कारखाना म्हणजे मुंबई!

मुंबई म्हणजे प्रचंड 'कॉन्ट्रास्ट' आहे. सर्वत्र विरोधाभास, असमतोल, विसंगती आणि तफावत. जागोजागी नाटच भरलेलं आहे. मुंबईकरांना घडोघडी नजरेस पडणाऱ्या ह्या नाटचाची-ह्या विरोधाभासाची सवय झाली आहे. पदोपदी विसंगती पाहून त्यांची नजर मेली आहे. हरघडी विरोधाभासाचा अनुभव, त्यामुळं मुंबईकराचं मन मेलं आहे. भावना बधिर झाल्या आहेत, आणि तरीदेखील अतिशय संवेदनाक्षम असे लेखक, कवी, नाटककार- कलाकार ह्यांना ह्याच शहरानं आंजारून-गोंजारून जोपासलं आहे. हाच ह्या नगरीचा कॉन्ट्रास्ट, हेच मुंबईचं वेगळेपण, भारतामधील दुसऱ्या कुठल्याही शहराच्या ठायी ही क्षमता नाही.

माणसा-माणसातील रहाणीमानात दिसणारा भयानक असमतोल इथं सर्वमान्य झाला आहे, राजमान्यदेखील झाला आहे. त्याची सत्यता, त्याचं अस्तित्व ह्या शहरानं सहजपणे पचवलं आहे. मलबार हिलवरील अलिशान फ्लॅटमधल्या धनाढ्य उद्योगपतीला, व्यापाऱ्याला, पुढाऱ्याला, सिनेनटाला, स्मगलरला-महागड्या स्कॉचचे मदमस्त घुटके घेताना, चहू बाजूला अजगराप्रमाणे पसरलेल्या झोपडपट्ट्यांमधून चिखलातल्या गांडुळाप्रमाणे जीवन जगणाऱ्या लाखो मानवांकडे पाहून, ऊठसूठ 'कोरडा ओलावा' आणि हळहळ व्यक्त करण्याची बुद्धिजीवी मध्यमवर्गी माणसाची वाईट खोड नाही. त्याचप्रमाणे झोपडपट्टीतल्या दलदलित ऐसपैस बैठक मारून मजेत ठर्री पिणाऱ्या हमालाला, पाटीवाल्याला, बदली-कामगाराला, वेश्येला 'उंचे महेल मे' रहाणाऱ्याबद्दल कसलीही कटुता नाही. मुंबईचा हा गुण विशेष आहे.

इथं सर्वांनी अपनी अपनी जिंदगी आहे त्या स्थितीत मान्य केली आहे. इथ पोलादसम्राट आहेत आणि फुटपाथरीचे सम्राट देखील आहेत! इतरांच्या जिंदगीकडे पहाण्याची मुंबईकराला सवय नाही. तितकी फुरसतच नाही त्याला.

अशी जिंदगी जगणाऱ्यावर-मग तो मलबारहिलचा परांच्या गादीवर लोळणारा उद्योगपती असो किंवा सैतानचौकीमधील गाळ्यात कुशीवर झोपण्यापुरती जागा असलेला मिलमजदूर असो, आपले मायबाप सरकार माणशी तीस हजार रुपये इतका अवाढव्य खर्च करते असे म्हणतात! रस्ते, पाणी, वीज, टेलिफोन, लोकल ट्रेन्स, बसेस वगैरे वगैरे शहरी जीवन सुखकारक आणि कार्यक्षम (?) करण्यासाठी आवश्यक असलेली साधनं पुरवायची म्हणजे इतका खर्च येणारच. ग्रामीण भागातील एखादा बेकार जर ह्या शहरात आला तर त्यावर देखील आपले सरकार तत्परतेनं तीस हजार रुपये खर्च करेल. ह्या शहराचा खर्चच दांडगा! आणि दिवसागणिक हा खर्च वाढतोच आहे-

-आणि त्याचबरोबर दुर्लक्षित खेड्यांतील उपेक्षित बेकार तरुणांचा मुंबईच्या दिशेनं लोंढा देखील वाढतोच आहे.

आणखी किती माणसं हे शहर जगवू शकेल? आणखी किती माणसं सामावून घेण्याची क्षमता मुंबईत आहे? 'काम करनेवाला बंबई में कभी भुका नही मरेगा-उसको दो टाइम रोटी की कमाई जरूर मिलेगी'-कुठलाही मुंबईकर तुम्हाला हे काहीशा अभिमानानं सुनावेल. जाणकार मात्र चिंतेनं पुटपुटतात-'आता आणखी एक जरी मनुष्य ह्या मुंबईत आला तरी मुंबईच्या संपूर्ण यंत्रणेवर असह्य ताण पडेल-सारी व्यवस्था कोलमडून पडेल-जीवन विस्कळित होईल-

-आणि अविकसित ग्रामीण भागातून रोटीच्या शोधात बाहेर पडणाऱ्या तरुणांचा ओघ मुंबईच्या दिशेनं वाढतोच आहे...वाढतोच आहे...

## सैतानचौकी-माणसांचा शहरी कोंडवाडा!

ह्या मुंबईत दादरच्या बाजूला सैतानचौकी नावाचा भाग आहे. ज्या कुठल्या महाभागानं ह्या वस्तीला सैतानचौकी असं समर्पक नाव दिलं त्याच्या कल्पकतेचं आणि दूरदृष्टीचं कौतुकच केलं पाहिजे. सैतानचौकी म्हणजे माणसांचा शहरी कोंडवाडा. जनावरांचा गोठा देखील बरा म्हणावा इतके येथील गाळे गलिच्छ आहेत. तरी देखील



भिंतीवर खिळा ठोकायलाही जागा नाही!

'एक दिन हम अमीर बनेंगे' हे फसवं स्वप्न उराशी घट्ट धरून 'हम गरिबोंकी झोपडी में जो सुख है वो महेलोंमें नही' असलं फिल्मी तत्त्वज्ञान घोळत येथील रहिवासी जीवनाशी सामना देत आहेत.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्याच्या दुष्काळी परिसरातील दहा हजाराहून अधिक माणसं ह्या सैतानचौकीमध्ये आणि सायन, लालबाग येथील अशाच प्रकारच्या वस्तीत दाटीवाटीनं, अंगाला अंग घाशीत आला दिवस रेटीत आहेत. बारा बाय् पंधराच्या–पोटमाळा असलेल्या–एकेका गाळ्यात पाच-सहा कुटुंबं 'संसार' थाटून आहेत. रोटी, कपडा और मकान ह्या माणसाच्या तीन किमान गरजा भागवल्या म्हणजे कर्तव्य पार पडलं असं मानणाऱ्यांनी सैतानचौकीतील कुटुंबाचे संसार जरा जवळून पहावेत म्हणजे Not By Bread Alone ह्या सूत्राचा थोडाफार अर्थ त्यांच्या ध्यानात येईल.

जे सडेफटिंग आहेत किंवा कुटुंब गावाकडे माघारी ठेवून मुबईला आले आहेत अशा जवानासाठी गाळ्यामधून एक फूट रुंद आणि साडेपाच फूट लांब एव्हढ्या आकाराची सतरंजीची पट्टी पसरण्यापुरती जागा भरमसाठ पागडी घेऊन दिली जाते. गाळ्याच्या भिंतीवर ओळीनं मोठाले खिळे ठोकलेले असतात. त्या खिळ्याला ह्या जवानांचं सर्वस्व लटकावलेलं असतं. कुणी ह्या खिळ्यावर आईबापांचा फ्रेम केलेला फोटो लटकावलेला असतो–कुणी पत्नीचा. एखाद्यानं साईबाबाच्या तसबिरीला गंध–उदबत्ती दाखवलेली असते तर नवीनच आलेल्या एखाद्यानं हेमामालिनीची छबी लटकावलेली असते!

भिंतीवरील हे खिळे आणि त्यावर अडकवलेली चीजवस्तू, ह्या गाळ्यामध्ये झोपेपुरता आसरा गवसलेल्या तरुणांच्या गतआयुष्याचा, वर्तमान स्थितीचा आणि भावी मनोराज्यांचा एक सुस्पष्ट आलेख आपल्यासमोर मांडतात. ह्या भिंतीचं बारकाईनं निरीक्षण केलं तर अनामिक भीतीनं काळजाचा थरकाप होतो. मुबई हे एक अतिशय क्रूर शहर आहे ह्याची एकाएकी तीव्र जाणीव होते आणि मस्तक बधिर होतं. ही मुबई अशीच बेसुमार वाढत राहिली तर एक दिवस सगळ्या मानवजातीला आपल्या अमानुष संस्कृतीनं भरडून काढणार ह्याची खात्री पटू लागते.

केवळ औद्योगीकरण म्हणजे विकास आणि प्रगती असं मानणाऱ्या अर्थशास्त्रज्ञाना मुबईमधील सैतानचौकीच्या गाळ्यातील असंख्य खिळे मारलेल्या भिंतीचा अभ्यास करण्याची सक्ती करावी; प्रत्येक पुढाऱ्याला, नेत्याला, उच्च पदस्थ सरकारी अधिकाऱ्याला सैतान चौकीत नेऊन ह्या एक एक खिळ्यावर टांगलेली ग्रामीण तरुणांच्या जीवनाची भकास बेसुरी कहाणी समजावून सांगावी अशी तीव्र इच्छा होते.

सैतानचौकीमधील गाळ्यातील–माणसाच्या ह्या शहरी कोंडवाड्यातील–भिंतीवर नवा खिळा ठोकण्यास देखील आता जागा शिल्लक नाही–

–तरीदेखील खेड्यातून ह्या शहराकडे तरुणांचा ओघ वाढतोच आहे. खेडी दुर्लक्षित राहिली तर हा ओघ महापुराचं स्वरूप धारण करणारा! सैतानचौकीतील गाळ्याच्या भिंतीवर मात्र एकही खिळा ठोकण्यास आता जागाच शिल्लक नाही!

¤

हे सर्व पाहिलं, अनुभवलं म्हणजे विलक्षण चीड तर येतेच आणि त्याबरोबरच अनेक प्रश्न मनामध्ये विचारांचं वादळ उठवितात.

देशाचा सर्वांगीण विकास घडविण्याच्या उद्देशानं आखलेल्या योजना आणि त्यांचं नियोजन ह्यामध्येच काही मूलभूत त्रुटी आहेत का? ह्या त्रुटी भरून काढण्यासाठी जे जे करणं जरुरीचं आहे त्यासाठी लागणारं धैर्य, आवश्यक असलेला दृष्टिकोन राज्यकर्त्यांमध्ये आहे का? त्यांना ह्या समस्येचं गांभीर्य कधी जाणवलं आहे का? शासनयंत्रणा चालविण्याबाबत विशेष प्रशिक्षण प्राप्त झालेले आणि विचारसरणीवर शहरी संस्कृती आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीचा पुरेपूर पगडा असणारे बहुसंख्य सरकारी अधिकारी भारताच्या ऐंशी टक्के जनसामान्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी सुयोग्य योजना आखू शकतील का? चरणसिंगांनी एक नवी विचारसरणी मांडण्याचा प्रयत्न केला तो खरोखरीच हास्यास्पद होता का? अनेक प्रश्न मन सैरभैर करून टाकतात.

ग्रामीण विकासाला अग्रक्रम, खेड्याचं शहरीकरण वगैरे घोषणा म्हणजेच पोकळ आश्वासनं, फक्त निवडणुकीच्या वेळेपुरती. नंतर परिस्थिती जैसे थे आणि ये रे माझ्या मागल्या अशीच. विकासाचा सर्व फायदा मोठ्या शहरांना आणि तोटा ग्रामीण भागाला. शहरं आणि खेडी ह्याच्यामधील तफावत वर्षागणिक वाढतेच आहे. दरी रुंदावते आहे. असंच चालत राहिलं तर?

¤

२६ जानेवारी १९८०. मुबईमध्ये गणतंत्रदिनाचे ते घोटून गुळमुळीत झालेले कार्यक्रम चालू होते. दिल्लीला देखील ठराविक साच्याची परेड चालू असणार. बघणारे तेच, परेड करणारे देखील तेच.

मुंबईमधील एक कार्यक्रम मात्र ह्या सर्वाहून अगदी वेगळ्या पद्धतीचा होता. ताजमहाल हॉटेलकडे जाणाऱ्या चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याखाली शंभर–सव्वाशे माणसं जमली होती. मध्यम बांध्याचे, पांढरीशुभ्र खादीवस्त्रे परिधान केलेले एक गृहस्थ हातामध्ये छोटा लाउडस्पीकर पकडून भाषण करत होते. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराबाबत मुबईमधील नवबुद्ध मंडळी काही तरी मागणी करीत असावी असा अंदाज करून मी जमावाच्या जवळ सरकलो.

त्याच वेळी खादीधारी गृहस्थाचं भाषण संपलं आणि साध्या पायजमा-शर्टातील एक तरुण कसलं तरी छापील निवेदन वाचू लागला. प्रत्येक वाक्य वाचून होताच तो तरुण थांबायचा आणि शंभर-सव्वाशे माणसं तेच वाक्य कोरसमध्ये उच्चारायचे. मला जरा गंमत आणि आश्चर्य वाटलं.

श्रोत्यांपैकी एकाकडून मी निवेदनाची छापील प्रत मिळवली. वाचून चकित झालो. हा सगळा प्रकारच नाविन्यपूर्ण होता. निवेदनाद्वारा जे सागण्याचा प्रयत्न केला होता ते बुद्धीला सहज पटण्यासारखं होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याखाली जमलेली ही माणसं एका मूलभूत हक्काची अतिशय न्याय्य मागणी करीत होती. कुठल्याही दृष्टीनं अवास्तव नसणाऱ्या ह्या मागणीचा साराश असा:

भारतीय घटनेप्रमाणे सर्व भारतीय नागरिकांना समान हक्क दिले आहेत. कायद्यापुढं सर्वांना समानता आहे. सर्वांना भाषणस्वातंत्र्य

तर मूलभूत हक्कातच दिले आहे; त्याचप्रमाणे उद्योगधंदा, रोजगार यामध्ये सर्वांना समान संधी अपेक्षित आहे व ती घटनेनुसार दिलेली आहे. त्याचबरोबर मालमत्ता हक्क दिलेले आहेत; म्हणजेच कायद्याच्या चौकटीत बसेल त्या जमिनीची मालकी अबाधित आहे. जमिनीची मालकी आणि जमीन कसण्याची संधी या दोन गोष्टी घटनेनुसार दिल्या आहेत. त्यानुसार सर्व जमीनधारकांना समान सोयी उपलब्ध असल्या पाहिजेत. या घटनेच्या अधिकारात एकच एक मागणी करणे जरुरीचे आहे आणि ती म्हणजे:

समान पाणीवाटप. पाण्याचे सामाजिक तत्त्वाने वाटप व्हावे; या हक्काची घटनेनुसार अंमलबजावणी व्हावी; त्यासाठी शेतकऱ्यांच्या ह्या मूलभूत समान पाणीवाटपाच्या मागणीची जाणीव सरकारला करून देणे आवश्यक आहे. यासाठी वेळ पडल्यास कायदेशीर चळवळ करून न्यायसंस्था व सरकार-दरबार यांची दारे ठोठावणे जरूर आहे.

समान पाणीवाटपाचे हक्क शेतीसाठी का व कसे अपेक्षित आहेत याचा विचार करताना शेती आणि पाणी यांचे अतूट नाते लक्षात घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे आर्थिक क्षेत्रात लक्षाधीश आणि भिक्षाधीश आहेत, त्याचप्रमाणे शेतीमध्ये बारमाही पाणी मिळून गबर होणारे शेतकरी एकीकडे तर दुसरीकडे पाण्याऐवजी पेरलेल्या बी-बियाणांचा नाश होऊन भाकरीला मोताद होणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांचे समावेशक चित्र दिसते. हे चित्र बरोबर नाही आणि ही तफावत घटनात्मक तरतुदीमध्ये बसत नाही.

पाणी हे निसर्गाने दिलेले वरदान असून ती नैसर्गिक शक्ती आहे. तसेच ही नैसर्गिक राष्ट्रीय संपत्ती आहे म्हणून तिचा लाभ समतेनं होणे आवश्यक आहे आणि हाती आलेल्या विज्ञानामुळे ते सहज शक्य आहे.


पाण्याच्या समवाटपातून राष्ट्रीय विकासात सर्वांना सामावून घेता येईल. औद्योगीकरणाला चालना मिळेल, ग्रामीण दारिद्र्य हटेल व नागरी आणि ग्रामीण भाग ह्यामध्ये निर्माण झालेली दरी भरून निघेल.

¤

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याखाली २६ जानेवारी रोजी जमलेल्या ह्या मंडळीबद्दल माझ्या मनात कुतूहल निर्माण झालं. त्यांची मागणी रास्त आहे असं बुद्धीला पटलं; पण शेतीसाठी पाण्याच्या समान वाटपाची मागणी मुंबईमध्ये का ? हा प्रश्न सतावू लागला.

प्रथम बोलत होते ते खादीधारी कोण ? राजकीय पुढारी का सामाजिक कार्यकर्ते ? का ग्रामीण विकास क्षेत्रात स्वयंसेवक वृत्तीनं कार्य करणारे शेतीतज्ज्ञ ? खादी तर एकदम पांढरीशुभ्र आणि स्टार्च केलेली. सर्वसामान्य माणसानं बिचकून दोन हात दूर रहावं इतकी कडक इस्त्री ! एकीकडे मन मात्र ग्वाही देत होतं – हे राजकीय पुढारी नसणार. राजकीय खादीधाऱ्यांच्या डोळ्यांत एक वेगळी चमक असते, बोलण्यात गुर्मी असते. ह्यांचे डोळे धारदार; पण भाव निर्मळ. विचार स्पष्ट; पण वाणी मृदु. राजकीय पुढारी असा नसतो; पण अंगावरील पांढऱ्याशुभ्र खादीचं काय ?

मी परदेशात युनोच्या नोकरीत असताना खादी वापरली आहे. अगदी चुणीदार आणि स्टार्च केलेला नेहरूशर्ट. भारतात परत



पाण्याच्या समान वाटपाचा हक्क मागणारे श्री. पोपट अण्णा खेसे

¤

आल्यावर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून भटकत असताना मी प्रथम खादीच वापरत असे; पण खादीला बघून लोक बिचकतात असं वारंवार अनुभवाला येऊ लागलं. कोणत्या पक्षाचे ? असा प्रश्न ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर उमटलेला स्पष्ट दिसत असे. त्याचबरोबर, 'मतलब साधून झाल्यावर हे आपल्याला नक्की लुबाडणार' असा संशयदेखील गावकऱ्यांच्या डोळ्यांत भरलेला असे. काही महिन्यांतच माझी खात्री पटली की, खादीवस्त्रे घालून ग्रामीण विकास क्षेत्रात काम करणं कठीण आहे. वास्तविक आपल्या हवामानाला साजेसा हा पेहराव; पण पांढरीशुभ्र खादी परिधान करणाऱ्यावर जनसामान्यांचा हल्ली विश्वासच बसत नाही ही मोठी अडचण. खादीधाऱ्यांनी लोकांची इतकी फसवणूक केली आहे की, ते कापड पहाताच लोक बुजतात. माझंदेखील ह्या गृहस्थांना बघून प्रथमदर्शनी तसंच झालं.

त्यांचं नाव विलास साळुंखे. ते स्वतः इंजिनियर. ॲक्युरेट इंजिनिअरिंग नावाची त्यांची फर्म आहे. एकोणिसशे बहात्तरच्या दुष्काळात विलास साळुंखे पुरंदरच्या परिसरात फिरत असताना त्यांना असंख्य लोक खडी फोडून रोजगार मिळवत असलेले नजरेस पडले. काळ्या आईच्या अंगाखांद्यावरचा मानी शेतकरी दुष्काळामुळं काळ्या-

पाण्याच्या कैद्याप्रमाणे खडी फोडून गुजराण करताना पाहून विलास साळुंखे अस्वस्थ झाले.

दुष्काळ वारंवार पडतच रहाणार; पण रोजगार हमी योजनेतून अशी खडी किती दिवस फोडायची? दुष्काळाला तोंड देण्यासाठी काही तरी कायम स्वरूपाची पर्यायी उपाययोजना आखणं आवश्यक आहे असं सगळ्यांना जाणवलं. ते आणि त्यांच्या पत्नी कल्पनाताई ह्यांनी पुरंदर तालुक्यातील नायगाव ह्या दुष्काळी खेड्यात मुक्काम करायचा निश्चय केला.

हडपसर सेंट पॅट्रिक्स टाउनमध्ये ऐषआरामी बंगला असलेला हा तरुण आणि जिद्दी कारखानदार दुष्काळाला उत्तर शोधण्याच्या विचारानं झपाटला गेला. नायगावच्या उजाड खडकाळ माळरानावर त्यानं आपली पत्नी आणि तीन छोट्या मुलांसह मुक्काम टाकला. मुलांना नायगाव खेड्यातील शाळेत घातलं आणि जीव ओतून स्वत: दुष्काळाशी लढायचा त्यांनी पण केला.

सर्वप्रथम त्यांनी ठिकठिकाणी पर्जन्यमापकयंत्रे बसवली. त्यावरून पाऊस अनियमित असला तरी सरासरी चौदा-पंधरा इंच हमखास पडतो हे त्यांच्या निदर्शनास आलं.

पडणाऱ्या पावसाचं बरंचसं पाणी ओढ्यानाल्यांतून वाहून जातं. आपल्याबरोबर जमिनीवरील कसदार मातीलादेखील हे पाणी ओढत नेतं. तेव्हा सर्वप्रथम पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचं आधुनिक शास्त्राच्या सहाय्यानं नियोजन करण्याचं त्यांनी ठरवलं. नायगावच्या माळरानावर एक पाझर तलाव खणला. त्याखाली विहीर खणली. विहिरीचं पाणी उपसून माळरानावरची पन्नास एकर जमीन भिजवली आणि तिथं शेतीमधील अनेक प्रयोग यशस्वी करून दाखविले. ह्या सर्व अनुभवांतून त्यांनी काही सिद्धान्त मांडले.

(१) कुठल्याही ग्रामीणभागात पडणाऱ्या पावसाचं जर शास्त्रोक्त पद्धतीनं नियोजन केलं तर शेतकऱ्याला आठमाही शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देता येतं.

(२) सर्वसामान्य शेतकऱ्याला वैयक्तिकरीत्या विहीर खणून, त्यावर डिझेलचं इंजिन किंवा मोटार बसवून शेती करणं दुष्काळी भागात किफायतशीर ठरणार नाही.

(३) दुष्काळी भागात जिथे पाण्याचे अगोदरच दुर्भिक्ष्य आहे तिथे उसासारखं पाणी पिणारं पीक अव्यवहार्य आहे.

(४) माणशी अर्धा एकर किंवा कुटुंबाला अडीच एकर ह्याप्रमाणे पाण्याचे समान वाटप म्हणजेच पाण्याचा फक्त जमिनीशी हिशोब न घालता पाणी, माणूस आणि जमीन असा हिशोब घातला तर ग्रामीण भागात उत्पादक शेतीव्यवसाय निर्माण होईल.

(५) ह्या समान वाटून मिळणाऱ्या पाण्यासाठी उपसा जलसिंचन योजना आवश्यक आहे आणि त्यासाठी भांडवली खर्चापैकी वीस टक्के रक्कम लाभधारकांनी जमविली पाहिजे. शंभर टक्के फुकट मिळालेल्या सवलतीमधून प्रगती होत नाही म्हणूनच शेतकऱ्यांचा या योजनेमध्ये संपूर्ण सहकार सुरुवातीपासूनच हवा असल्यास वीस टक्के भाडवल त्यांनी जमविणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

¤

प्रथम भेटीत विलास साळुंखे आणि कल्पनाताई यांचेकडून जे अनुभवाचे बोल ऐकण्यास मिळाले त्यांनी मी प्रभावित झालो. खादी-पेहराव पाहून मला जो प्रथमदर्शनी थोडासा गैरसमज झाला होता तो पूर्णपणे दूर झाला. सवयीनं खादी वापरणाऱ्या ह्या जिद्दी माणसाची विचारसरणी एका शास्त्रज्ञाची आहे, एका द्रष्ट्याची आहे, ह्याची मनोमन खात्री पटली. अर्थात पाण्याच्या समान वाटपाची मागणी करणारी ही सभा मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याखाली का?–हे कोडं मात्र अजून उलगडलं नव्हतं.

संध्याकाळी ही सर्व मंडळी दादरला रवीन्द्र नाट्यमंदिराशेजारच्या सानेगुरुजी उद्यानात जमणार होती. तिथं गेलो आणि कोडं सुटलं.

१९७२ च्या दुष्काळानंतर विलास साळुंखेंनी नायगावच्या परिसरात काम करायला सुरुवात केली. त्यांचा खादी-पेहराव, काही राजकीय पुढाऱ्यांशी असलेले त्यांचे नात्याचे संबंध ह्यामुळे साहजिकच गावकरी मंडळी त्यांच्या उद्देशाबद्दल साशंक. पुढेमागे निवडणूक लढवून विलासराव मंत्री होण्याचा प्रयत्न करणार अशी कुजबूज देखील लोकांच्यात सुरू झाली; पण गेल्या सात-आठ वर्षांतील त्यांचं कार्य पाहून हळूहळू हे गैरसमज मावळले.

नायगावच्या प्रयोगातून 'पाणीपंचायत' हा नवा विचार जन्मास आला. आजूबाजूच्या आठ दहा गावांत सामुदायिक उपसा-जलसिंचन योजनांची आखणी करण्यात आली. लोक वीस टक्के पैसे जमवू लागले. त्यानंतर सरकारकडून पन्नास टक्के अनुदान, जरूर तिथे अग्रक्रमाने वीजपुरवठा वगैरे गोष्टींची आवश्यकता निर्माण झाली.

सरकारनं जर 'पाणीपंचायत' तत्त्वाला मान्यता दिली तर पुरंदर तालुक्यातील मुंबईमध्ये कामाला असलेले हजारएक शेतकरी आपआपल्या गावी परतण्यास तयार होते. ह्या परतलेल्या शेतकऱ्यांना शेती लाभदायक ठरली तर आणखी पाच-सहा हजार तरुण सैतान-चौकीच्या गाळ्यातील खिळ्यावर टांगलेली आपली पिशवी उचलून आपआपल्या गावी जमीन कसण्यासाठी परतण्याची शक्यता होती. त्यासाठी २६ जानेवारीला मुंबईचा हा कार्यक्रम साळुंखेंनी आयोजित केला होता.


This was a unique case of reverse migration. मुंबईच्या चक्रव्यूहात अडकलेली माणसं, 'पाणीपंचायत' योजना फलद्रूप झाल्यास, मुंबई सोडून गावी परतणार होती. ह्यापूर्वी असं कुठं घडलेलं माझ्या ऐकण्यात किंवा पाहण्यात नव्हतं.

सानेगुरुजी उद्यानात सैतानचौकीमधील पुरंदरवासी जमले होते. नायगावच्या परिसरातील शेतकरी बांधवाचे अनुभव कान देऊन ऐकत होते. ज्यांना लिफ्टचं पाणी मिळालं होतं त्यांच्या उत्पन्नात झालेल्या वाढीची माहिती मनोमनी नोंदवीत होते. अनेकांच्या डोळ्यासमोर आपलं गाव, आपली जमीन–तिला मिळणारं पाणी, त्यातून बहरलेली ज्वारी, भुईमूग, कपाशी, बाजरी, भाजीपाला ह्यांचं एक मनोहारी दृश्य आकार घेत होतं; पण हे खरोखरी शक्य आहे का? असा अविश्वास देखील अनेक चेहऱ्यांवर जाणवत होता.

शहरातून खेड्याकडे उलटा प्रवाह! सर्वस्वी अशक्य वाटावी अशी घटना–पण सानेगुरुजी उद्यानात जमलेले हजार-पाचशे जण काही महिन्यांतच आपआपल्या गावी जाणार होते हे सत्य डोळ्यांसमोर दिसत होतं. विलास साळुंखेंनी आठ वर्षे भगीरथ प्रयत्न करून अनुभवातून जे सिद्धांत मांडले ते आता प्रत्यक्षात आकार

सौ. साळुंखे





राजुरीचे श्री. दगडोबा नाईक साने गुरुजी उद्यानात जमलेल्या संतानचौकीमधील पुरंदरवासीयांना नायगाव प्रकल्पाची माहिती देत आहेत. पुढे बसलेले श्री. विलास साळुंखे.

धारण करू लागणार असं वाटत होतं.

सरकारी यंत्रणा आणि राज्यकर्ते ह्या सिद्धांताना कितपत महत्त्व देणार हा मोठा यक्षप्रश्न मात्र अजून सुटला नव्हताच.

किडुकमिडुक विकून, बैलशेळ्या विकून, प्रसंगी दरमहा दरशेकडा दहा टक्के इतक्या जबरदस्त व्याजानं खासगी कर्ज काढून सामुदायिक उपसा जलसिंचन योजनेसाठी 'पाणीपंचायत' तत्त्वानुसार वीस टक्के भागभांडवल जमविणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्याला साळुंखेंच्या सिद्धांतांचं महत्त्व मनोमन जरी पटलं असलं तरी सरकारी यंत्रणा राबविणाऱ्यांना त्याचं महत्त्व जोपर्यंत पटत नाही तोपर्यंत संपूर्ण यश मिळणं महाकठीण !

ह्या यंत्रणेत व्यक्तिशः चांगले आणि तत्पर असे अनेक अधिकारी आहेत; पण ही यंत्रणाच अशी आहे की, पाहता पाहता ती हुशार आणि धडाडीच्या प्रामाणिक अधिकाऱ्याला नाउमेद करून टाकते. स्वतः पुढाकार घेऊन स्वतःच्या अधिकारकक्षेतील एखादा निर्णय घेणं हा वरिष्ठांचा घोर उपमर्द असा ह्या यंत्रणेचा शिरस्ता. कोण स्वयंप्रेरणेनं काम करणार ?

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी घालून दिलेली, गुलामांच्यावर राज्य करण्यासाठी आवश्यक असलेली, अविश्वासावर आधारलेली, किचकट कायद्यांच्या साहाय्यानं फक्त राज्यकर्त्यांना सोयिस्कर असे निर्णय घेण्याची अंगभूत प्रवृत्ती असलेली ही यंत्रणा मंत्र्याचा आदेश मिळताच मात्र तत्परतेनं कामाला लागते. स्वतंत्र विचारसरणीला इथं वाव नाही. त्यामुळेच स्वतःच्या डोक्यानं ही यंत्रणा सहसा कुठलाच विधायक कार्यक्रम प्रत्यक्ष राबविण्याच्या भानगडीत पडत नाही. उलट राज्यकर्त्यांच्या सोयीसाठी कुठल्या तरी कलमाचं खुसपट काढून, कुठल्या तरी प्राचीन कायद्याच्या उपकलमाचा संदर्भ देऊन एखादी साधी गोष्ट सुद्धा अत्यंत अवघड करण्यात ही सरकारी मंडळी तरबेज.

थोडक्यात म्हणजे 'पाणीपंचायत' तत्त्वप्रणालीतून ज्या कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष फायदा होणार होता, ज्यामुळे खेड्यांतून शहराकडे धावणाऱ्यांचा ओघ मंदावणार होता, इतकंच काय, जे शहरात आले होते ते देखील नोकरीचा राजीनामा देऊन शहर खाली करण्यास तयार होते—त्या सर्वांना हे सिद्धांत जरी पटले होते तरी मंत्रीगण आणि सरकारी यंत्रणा चालविणारे अधिकारी ह्यांना जोपर्यंत हे विचार समजत नव्हते तोपर्यंत प्रत्येक पुढचं पाऊल ठेचकळणार होतं.

मंत्र्यांना किंवा सचिवालयातील सरकारी मंडळींना सर्वसामान्य ग्रामीण जनतेच्या हिताचे काही मूलभूत विचार पटवून द्यावयाचे म्हणजे मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्यापेक्षा अवघड काम. सचिवालयात किंवा आमदारनिवास आणि मंत्र्यांचे राखीव बंगले ह्यातच सदोदित वावरणाऱ्या ह्या सर्व 'अधिकारी' मंडळींचे मातीशी नाते दुर्दैवाने तुटलेले असते. अर्थात त्यांची भाषा मात्र 'ग्रासरूट लेव्हल' 'तळागाळाच्या समस्या' वगैरे भारी असते. केवळ आकडेवारीवर विश्वास ठेवणारी ही अधिकारी मंडळी अनुभवाचे बोल क्वचितच ऐकतात.

सुदैव एव्हढंच की 'उडदामाजी काळे-गोरे' ह्या न्यायानं सरकारी यंत्रणेत देखील हाताच्या बोटावर मोजण्याइतके का होईना, संवेदनाशील आणि कर्तव्यतत्पर अधिकारी अधूनमधून भेटतात आणि त्यांच्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहाकार्यातूनच नायगावसारखा एखादा प्रकल्प, वाळवंटातील ओएसिसप्रमाणे निर्माण होऊ शकतो. एरवी इतरत्र जे बघायला आणि सर्वसाधारणपणे अनुभवायला मिळतं ते अतिशय भकास आणि मन उद्‌विग्न करणारं, असंच आहे.

¤

मागील वर्षी जून महिन्याच्या कडक उन्हाळ्यात मी, आदी पटेल ह्या मित्राबरोबर मराठवाड्याच्या दौऱ्यावर गेलो होतो. औरंगाबाद

जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यामधील काही खेड्यांची पहाणी करून तेथील ग्रामस्थांशी सविस्तर चर्चा करण्याची संधी ह्या दौऱ्यात मिळाली. स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे लोटल्यावर देखील ग्रामीण-भागाची दुर्दशा आटोक्यात आणता आली नाही हे पदोपदी जाणवलं.

आदी पटेलनं दौऱ्यासाठी जर्मन बनावटीची फोक्स्वॅगन ( पीपल्स् कार ) मिनीबस घेतली होती. दुसऱ्या महायुद्धात औद्योगिक प्रगती-मध्ये अव्वल दर्जावर असलेल्या जर्मनीनं बनविलेली ही गाडी म्हणजे चार चाकांवरील एक फिरतं घरकुल. मऊ गुबगुबीत सीटस्, खिड-क्याना पडदे आणि इतर सर्व सोयी. आपल्या फियाट किंवा अॅबॅसॅडर गाडीच्या अर्ध्या किंमतीत ( जर्मनीत ) मिळणारी ही गाडी येथील वातावरणात डोळ्यात एकदम ठसणारी.

सकाळी आठच्या सुमाराम आम्ही पहिली सभा वीरगाव ह्या खेड्यात घेतली. पिंपळाच्या सावलीत आदी पटेलनं फोक्सवॅगन उभी केली. गाडीला लागून, सावलीत दोन मोठे जमखाने पसरून सभा बसली.

पोरंसोरं, तरुण आणि म्हातारे गाडीला प्रदक्षिणा घालून, खिडक्यांमधून आत डोकावून मगच खाली बसत होते.

पावसाने मृग चुकवला होता. रखरखीत ऊन, निरांजनातील वातीसाठी लागणाऱ्या कापसाइतका देखील ढगाचा ठिपका आका-शात दिसत नव्हता. विलक्षण उकाडा, घामानं ओलाचिंब झालेला शर्ट पाठीला-पोटाला चिकटला होता. केसात धूळ, ओठ कोरडे.

कुणी तरी पितळेचे दोन-तीन तांब्ये भरून पाणी आणलं. मी आणि आदि पटेलनं तांब्या तोंडाला लावून त्या मचूळ मातकट पाण्यानं तहान भागवली. तांब्या खाली ठेवत असता कुणी तरी पुटपुटलं—

'वीरगावात काल्याची साथ हाये – कालच चार मानसांना वैजापूरच्या इस्पितळात पाठविलं—'

दुसरं कुणी तरी पुटपुटलं.

'गावची इहीर आटलीया— टचॅंकरचं पाणी रोज हिरीत सोडी-त्यात—त्यातूनच आला असल कालरा—'

आदीची माझी एकाच वेळी नजरानजर झाली. चटकन् दोघाचेही डोळे आकाशाकडे वळले. जो होगा सो देखा जायेगा. वीरगावचा कार्यकर्ता शांताराम पंदारे आमच्या हावभावाकडे पाहून खळखळून हसला. पाठोपाठ गावकरीही हसले. वातावरणातला सूक्ष्म ताण कमी झाला आणि गप्पागोष्टी सुरू झाल्या.

'तुमच्या महत्त्वाच्या अडचणी सांगा आणि त्या सोडविण्यासाठी काय उपाययोजना करावी असं तुम्हाला वाटतंय ते देखील सांगा—' मी विषयाला सुरुवात केली.

समोरच खूरमांडी घालून बसलेला, दुष्काळानं शरीरातील जान शोषली गेलेला एक वयोवृद्ध शेतकरी फाडकन् बोलला—

'आवो अडचणी पुष्कळ हायेत – सगळ्याच महत्त्वाच्या हायेत— पण माझी एकच अडचण तुम्हाला सांगतो. आता तुमची ही गाडी बघीटली. आतल्या शिटा बधिटल्या. त्ये पडदे— तुमचे कपडे... तर आमच्यापैकी प्रत्येकाला असली एक एक गाडी, तुमच्यासारखं चार-दोन कपडे, खोलीभरून धान्य आणि तिजोरीभरून पैसे का नसावेत? तुम्हाला हाये तसंच आम्हाला का नसावं ? '

सभेतील काही माणसं बुजरं हसली. आम्ही देखील ओशाळून हसलो. काहींनी आमच्या नजरा चुकवल्या, काहीच्या नजरा आम्ही चुकवल्या. वास्तविक कुणीच कुणाची नजर चुकविण्याचं कारण नव्हतं. प्रश्न विचारणारा वयोवृद्ध शेतकरी आमच्याकडे अविचलपणे आरपार पहात होता. त्याच्या डोळ्यांत असूया नव्हती. फक्त होता भेदक सवाल !

वीरगावचा एक तरुण— छातीचा सापळा, चेहरा खप्पड, खोल गेलेल्या डोळ्यांत अनेक दिवसांची भूक स्पष्ट उमटलेली, खुरट वाढलेली दाढी, फाटून चिंध्या झालेली पैरण आणि जागोजाग गाठी मारलेलं मळकं धोतर— सुकलेल्या ओठांवरून कोरडी जीभ फिरवत गळ्याच्या शिरा ताणून सांगत होता—

'जयप्रकाशनं सांगितलं ते ऐकून आम्ही इथं लोकसमिती तयार केली. आमच्यासारकी पोरं त्या लोकसमितीत हायेत. गावच्या लोकांना रोजगारीचं काम भेटतं का नाही म्हणून लोकसमितीनं प्रयत्न केला— त्यासाठी तहसीलदारला भेटलो. म्हणालो— बाबा, ह्या गावच्या लोकाना काम नाही— त्याना काम द्या. कधी डेप्युटी कले-क्टरपातोर आम्ही जातो. ते म्हंत्यें पाटवाल्याकडं जा. मग पाट-वाल्याकडं जातो. ते म्हंते आमचं अजून मंजूर नाही— अमकं नाही ढमकं नाही असं करत त्ये मागंपुढं करत्ये. मग एखाद दिवशी मजु-राला घेऊन आम्ही मोर्चा काढतो— काम मागायचा प्रयत्न करतो— नाही ऐकलं तर तुमची एस् टी. बंद, वैजापूरचं हाफीस बंद असं करतो. मग ते अधिकारी लोक काम देवू देवू म्हणते— चार-आठ दिवसांचा वायदा करते— पुन्हा काम नाही ते नाहीच!

'आता कवर आम्ही आदोलनं करायची—कवर जेलमधी अडकून


दूरध्वनी : ५९३०१९

दगडांच्या खाणीतून
थेट तुमच्या दाराशी ।

बांधकामासाठी लागणारे सर्व साहित्य
रास्त आणि वाजवी दरात आणि वेळेवर !

अश्विन अॅण्ड कंपनी
( रेल्वेचे मान्यवर कॉंट्रॅक्टर्स )

६, निकुंज, दम्माणि इस्टेटसमोर,
जुना मुंबई—आग्रारोड, ठाणे ४०० ००२

न्हायाचं. घरी ताराबळ. मग हेलपाटे. इथं मग गावगाडा तसाच रहातो. इथं पोटाला काय नाही– काय नाही. थोरले दोन भाऊ मुंबईला मजुरी कमावते– मी इथं कवर लोकसमिती करून झगडत राहू—'

बोलता बोलता एकाएकी तो तरुण गप्प झाला आणि हताशपणे गुडघ्याला मिठी मारून बसून राहिला. दगडासारखा !

पिंपळाच्या झाडावर चिमण्यांचा कलकलाट चालला होता. मांडी घालून बसल्यानं माझ्या पायाला रग लागली होती. जमखान्याखालचे दगड पुठ्ठ्याला बोचत होते. मी चाळवाचाळव करून पालथी मांडी घातली. दुसरं कुणी तरी बसल्याबसल्याच बोलू लागला–

'आम्हाला काम पायजे, पाट पायजे, शेतीला पाणी पायजे म्हणून मोर्चात आम्ही गेलतो चार दिवस जेलमधे–पण काय उपयोग झाला न्हाई. वर्सापूर्वी–आगष्टाच्या महिन्यात इकडच्या तलाठ्याची गाढवावरून धींड काढली लोकानी. मजुरांच्या भरतीसाठी लागणारी कार्ड त्यो देत न्हवता, मंग लोकं ग्येली त्याच्याकडं. तहसीलदाराकडनं ल्येटर आनलं होत–कार्ड द्या म्हनून–पन त्यो ऐकना. रोजगारहमीचं काम नसलं तर लोकं उपाशी पडणार. कार्ड असल्याबिगर काम न्हाई मिळणार-आणि तलाठी तर कार्ड देईना. मग झाली गावाची संघटना. धरला त्यांनी तलाठ्याला आणि बशिवला गाढवावर आन मिरवला त्येला गावातून. मग त्यानं केस केली लोकांवर. एकशेपाच लोकावर केस केली–तलाठ्यावर डाका घातला म्हणून दरवड्याची केस–आता ती हाये चालू–लोकं घालतात ख्येटे वैजापूरला. आता नवे तलाठी आल्येत त्ये मात्र गावाला धरून चालतात.'

'नवे तलाठी सातबाराला, वारसाच्या नोंदीला पैसे मागतात का ?' मी विचारलं.

जास्त काय मागत नाही–पण चालतंच थोडंफार आणि ते चालायचंच–स्वखुशीचा मामला असतो तो–बळजबरी नसती–' एक म्हातारा जागच्याजागी चुळबुळ करत बोलला. लोकसमितीच्या एका कार्यकर्त्यानं घसा खाकरला आणि काहीशा दबलेल्या आवाजात बोलायला सुरुवात केली–

'अहो, लोक घाबरतात बोलायला. आपण बोललो म्हणून अधिकाऱ्यास्नी कळलं तर लगेच काम बंद होईल अशी भीतो हाये लोकान्ला. हालत लई वाईट–पण सांगावं कुणापाशी–सांगितलं तर अधिकाऱ्यांचा राग–न बोललेलं बरं–'

दगडासारखा गप्प बसलेला मघाचा फाटका तरुण पुन्हा उठला आणि तिरिमिरीनं बोलू लागला. त्याच्या गळ्याच्या ताणलेल्या शिरा तट्ट फुगल्या होत्या. डोळ्यांत अंगार होता. त्याचबरोबर हा तरुण आता कोणत्याही क्षणी ओक्साबोक्सी रडणार असं देखील वाटत होतं–फुटलेल्या छातीनं तो वेदना ओकत होता–

'ह्ये शिकलेसवरलेले टेक्निकल लोकं, हे ओहरसीअर, हे इंजीनेर–आमचे भाईबंद–मुद्दामच काम बंद पाडत्यात. तालुक्याला ल्येटर येतात की, इकडं मजूरच नाही आणि इकडं मजुराला सागते की, कामच मंजूर झालेलं न्हाई आणि मग सुट्ट्या काढून जातात रजेवर निघून. आम्ही काय करावं इथं ? काम दिलं तर पैशाची मागंपुढं. काम लावून द्यायचे शंभरशंभर रुपये. कुणी मजूर बोलायला गेला की, लगेच त्याला कामावरून कमी करून टाकील्यात !'

'आता अ.पीबाणीमत्रला गरिबाच्यासाठी झोपड्या बांधण्याचा कार्यक्रम फेल गेला–इंदिरा गाधींचा दोष न्हाई–नोकरयंत्रणेनंच त्ये काम नीट होऊ दिलं न्हाई–झोपडीला साडेसातशे रुपये सँक्शन झाले तर ह्यानी दीडशे रुपये सुद्धा मटेरियल वापरलं न्हाई–सगळा कारभार टग्यांच्या हातात. गरिबाचा वाली कुणीच न्हाई–'

¤

महाराष्ट्र सरकारनं लोकांच्या कल्याणासाठी अमलात आणलेल्या रोजगारहमी योजनेतील गैरव्यवहाराच्या अनेक कथा ऐकून मन सुन्न झालं. अशा रोजगारहमीतून ग्रामीणविकास घडणार आहे का ? ह्या प्रश्नावर उलटसुलट विचार करत वीरगाव सोडलं आणि मौजे नादी हे गाव गाठलं.

मौजे नादी म्हणजे एक उध्वस्त गाव. चारी दिशांना पाहिलं तरी एकही झुडुप दिसणार नाही. वस्ती पंधराशेच्या आसपास. १९७२ पासून जमिनी नांगरल्या नाहीत. जमिनीची नुसती धूप होऊन राहिली. पाऊसच नाही !

गावाला रस्ता नाही. आडवळणाचं गाव. सुधारणा किंवा विकास नेहमी फक्त राजमार्गाच्या दुतर्फा होत असतो. मौजे नादीला रस्ता नाही त्यामुळे विकास नाही. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत गावातील सर्वच गोष्टींची धूप होऊन गेली. अस्थिपंजर माणसं, अस्थिपंजर जनावरं. दोन वेळच्या अन्नासाठी दाणा नाही. असलेले दाणे शिजवण्याइतका लाकूडफाटा नाही. जनावरांना खायला नाही. गौऱ्या लावण्याइतकं शेण देखील नाही ! मौजे नादीसारखी अनेक दुर्लक्षित खेडी असणार; पण सवड कुणाला आहे त्यांच्याकडे पाहण्याची ?

एक अतिशय वृद्ध गृहस्थ कापऱ्या आवाजात सांगत होता–

'आवो इथं दाट झाडी हुती–माळरानं हिरवी व्हती–म्या इथं हरणाचे कळप बघितले आहेत–'

मौजे नादीची मंडळी गाडीभोवती जमली. ओळखपाळख झाल्यावर एक मध्यमवयाचा शेतकरी सांगू लागला–

'मी गावचा सरपंच. सहा महिन्यापूर्वी गावात लोकसमिती स्थापन केली. वारसाच्या नोदीसाठी तलाठ्याला पैसे देणं बंद झालं. अधिकारी लोकांनी कामासाठी बेकायदा पैसे मागायचे बंद झालं; पण त्याचबरोबर आता आमच्या गावची सगळी कामंच बंद झाली...... आज तीस वर्सं आमचं गाव एकजुटीनं आहे–इथं दोन पार्ट्या कधीच


Phone : 447458

*With Best Compliments from:—*

**Amal Electrocrafts**

**Manufacturers of Offset Plate making and Process Equipments**

A/5 Sriram Industrial Estate,
G. D. Ambekar Road,
WADALA, BOMBAY – 400 031

# नवीन!

# ॲन्टिसिपेटेड होल लाईफ पॉलीसी.

**50%** पॉलिसीच्या मुदतींत ५० टक्के विम्याची रक्कम हप्त्याहप्त्यांनी परत मिळते.

**100%** आपल्या कुटुंबाला सर्वकाळ विम्याचे १०० टक्के संरक्षण मिळते.





## दुहेरी फायद्याची आकर्षक योजना.

- **पॉलिसीच्या मुदतींत ५० टक्के विम्याची रक्कम निश्चितपणे परत मिळते.**
- **पॉलिसीची मुदत संपल्यानंतरही विम्याचे १०० टक्के संरक्षण चालूच रहाते.**

आपण २० किंवा २५ वर्षांची पॉलिसी घेऊ शकतां. उदाहरणार्थ जर वयाच्या २५ व्या वर्षी २० वर्षे मुदतीची पॉलिसी घेतली तर ह्या ॲन्टिसिपेटेड होल लाईफ पॉलिसी-खालीं दोन वैशिष्ट्यपूर्ण लाभ मिळतात.

एक म्हणजे २० वर्षांच्या मुदतींत हप्त्यांनी परत मिळणाऱ्या पैशांतून आपण आपल्या तात्कालिक गरजा भागवूं शकतां. दुसरा लाभ म्हणजे विम्याचे हप्ते भरण्याची मुदत संपल्यानंतरही आपल्या कुटुंबाला संपूर्ण आणि सर्वंकष असे विम्याचे संरक्षण मिळतच रहाते.

**३५ वर्षे वयाच्या व्यक्तिनें २० वर्षे मुदतीची रु. २५०००/- ची पॉलिसी जर ह्या योजनेखालीं घेतली तर त्याला कसकसे फायदे मिळतात पहा.**

वयाच्या ४० व्या वर्षी रु. ३१२५/- परत मिळतात.

वयाच्या ४५ व्या वर्षी रु. ३१२५/- परत मिळतात.

वयाच्या ५० व्या वर्षी रु. ३१२५/- परत मिळतात.

वयाच्या ५५ व्या वर्षी रु. ३१२५/- परत मिळतात.

पॉलिसीची मुदत संपल्यानंतरही आपला मृत्यू ओढवल्यास आपल्या कुटुंबाला पूर्ण विमा रकमेचा लाभ मिळतो.

वीस वर्षांच्या मुदतींत किंवा त्यानंतर केव्हांही विमेदाराचा मृत्यू ओढवल्यास विमेदाराला त्यापूर्वी परत केले गेलेले हप्ते विचारांत न घेता वारसांना विम्याची संपूर्ण रक्कम बोनससह मिळते.

ह्या आगळ्या पॉलिसीमुळें आपल्या कुटुंबाला दुहेरी लाभ मिळूं शकतो. म्हणून आपण ॲन्टिसिपेटेड होल लाईफ पॉलिसी आग्रहपूर्वक मागा. आपल्या एल आय सी एजन्टशीं किंवा नजिकच्या शाखा कार्या-लयाशीं संपर्क साधा.

**भारतीय आयुर्विमा महामंडळ**

RADEUS/LIC/SP-37

नव्ह्त्या आणि होणार नाहीत–ग्रामपंचायत आणि लोकसमिती एक आहे; पण आता आम्हाला वाटाय लागलंय की ह्ये लोकसमिती स्थापन झाल्यापासून आमची जास्तच अडवणूक व्हायला लागलीया–सरकारी कर्मचारी तर म्हणतातच–तुमची लोकसमती आमच्या *कामात बिघाड आणते म्हणून आम्हाला तुमच्या अडचणीकडं लक्ष* देता येनार न्हाई–आणि आज सहा महिने गावाला काम नाही!

'हे अधिकारी मला म्हणतात–तुम्ही गावचे सरपंच. तुम्ही गावचे मालक. तुम्ही आमच्या कानात सांगायचं; पण तुम्ही लोकसमितीच्या पोराचं ऐकता. गाव तुमच्या ताब्यात नाही मग आम्ही तुमचं काम कसं करणार?

'अहो, ह्याच्या कानात मी पुष्कळ सांगून पाहिलं. तहसीलदाराला समजावून सांगितलं. गाव हवालदील झालेल हाये. कामाचा प्रश्न सोडवा. त्ये बरं बरं म्हणतात. अमुक तारखेला सुरू करू म्हणतात–पण होत काईच न्हाई. शेवटी वीरगावाला आम्ही कलेक्टरला घेरावो घातला. तेव्हा आमचे प्रश्न त्यानी तात्पुरते सोडवले. पुन्हा अडचणी तशाच. आंदोलनं करून पाहिलं–सत्याग्रह करून पाहिलं...सगळ गावच गरीब–पुढारी कुणीच नाही–इथं रिकामं कोणी न्हाई. टिकाव घेतला की जातात श्रीरापूरच्या हद्दीत कामाला–तरी मोर्चे काढले, घेरावो घातले–सारा गाव गरीब. त्यामुळं एकी असूनबी सरकारवर दबाव येत नाही. आंदोलन केलं तर आम्ही भुके मरतो. आता आम्ही ठरवलंय आमचा जर विकास होत नाही तर बहिष्कार टाकायचा. जिल्हा परिषद निवडणुकाच्या वेळी गावच्या वेशीला आम्ही शेणाची टोपली टांगली–सरकारवर बहिष्कार टाकायचा असा ठराव इथं *दवंडी देऊन एकमुखी पास झाला–आमचे आमदार झोपा घेतात*–कुणालाच आम्ही पाठिंबा देणार नाही. इथून पुढ कुठल्याही सरकारी अधिकाऱ्याला गावात येऊ नाही देणार–सारा–पट्टी देणार नाही–काय सरकारचं असेल ते सर्व बुडविणार–तुम्ही नकाच येऊ आमच्याकडे–आम्ही मरू, भूकबळी होऊ नाही तर भूकंप होऊन गाव गाडलं जाईल–शासनाचा आम्हाला संबंधच नको–'

सरपंचाची ही वाक्यं काळीज चिरणारी आहेत. भारतामधलं एक खेडं मरणाच्या दारावर आहे आणि मरण सुद्धा कसं तर आख्खं गाव एकमुखी आक्रोश करून जोहार करायला तयार झालेलं–'भारत सरकारशी आमचा संबंध नाही!–'

*एखादा भारतीय अमेरिकेमध्ये जाऊन, पैशाच्या लालसेनं, एखाद्या* सामान्य अमरिकी गोऱ्या चामडीच्या पोरीबरोबर लग्न करून, स्वत:चं भारतीय नागरिकत्व गहाण ठेवून त्या बदल्यात दुय्यम दर्जाचं अमेरिकी नागरिकत्व स्वीकारतो तेव्हा यातना होतात. इथं तर भारतामधलं गोदावरीच्या परिसरातलं एक खेडं–गोदावरीच्या काठ म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचं माहेर–एकमुखानं सांगतं की आम्ही भूकबळी होऊ, भूकंपात गाडले जाऊ–पण हे शासनकर्त्या, तुझा आम्हाला आणखी उपद्रव नको–'

ह्या मौजे नादीनं माझ्या मनात एक विचित्र पोकळी निर्माण केली. मौजे नादीसारखी हजारो खेडी असतील. राज्यकर्ते, शासनकर्ते ह्या खेड्यांच्या समस्याकडे अजून किती दिवस कानाडोळा करणार? ह्या ज्वालामुखी असाच धुमसत राहिला तर? ह्याच मौजे नादीमधील एका मुसलमान महिलेनं माझी कॉलर पकडून मला गदागदा हलवीत विचारलं होतं–

'मोटारीत बसून येता–अडचणी काय–अडचणी काय म्हणून इचारता–काय करायचंय तुम्हाला आमच्या अडचणी ऐकून–इथं इहीर आटलीया–बाया पाणी भरायला जावून पडून मरत्यात–पाट खणायला गेलं तर बायामाणसास्नी पोरं घेऊन जावं लागतं–त्यांची *काय सोय हाये का तिथं–उन्हात कोळून भाजीवाणी करपून जात्यात* आमची पोरं–इथं गावात गिरण न्हाई–दळणाची सोय न्हाई–आठ आठ मैल रोजगारीवर रान तुडवत जायचं–आन घरी येऊन दळत बसायचं–आनी आता व्हतं ते काम बी बंद झालं–आम्ही सायबाच्या मोटारीला आडवे झालो–घेरावो घातला–तो म्हणाला पंधरा दिवसात काम देतो–पण कुठलं काय–अवो, गरीब–दुबळ्याला काम नको काय–आम्ही काय फुकटचं भीक मागत नाही–काम मागतो–आनी तुम्ही इथं येऊन निस्तं इचारा अडचणी काय–थू त तुमच्या'
□

मी मराठवाड्याचा दौरा केला तेव्हा दिल्लीमध्ये मोरारजी देसाई ह्यांची जनता राजवट होती. त्यानंतर सरकार बदललं–पण मौजे नादीचा प्रश्न काही सुटला नसेल ह्याची खात्री आहे. मध्यवर्ती सरकार कुणाचेही असलं तरी त्याचा परिणाम ग्रामीण भागातील समस्या सोडविण्यासाठी फारसा होत नाही हे तीस वर्षांच्या अनुभवातून सिद्ध झालंच आहे.

मुंबईमध्ये विलासराव साळुंखे ह्यांच्याबरोबर चर्चा करीत असताना मला मौजे नादीची तीव्र आठवण झाली. गोदेच्या काठावरील ह्या गावासाठी पाणीपंचायतच्या तत्त्वावर एखादी उपसाजलसिंचन योजना उभी नाही का करता येणार?–निश्चित करता येईल. त्यातून मौजे नादीचा प्रश्न कायमचा सोडविता येईल–पण शासन सहकार्य करेल का?

मला भारतामध्ये परत येऊन अडीच वर्षं झाली. ह्या काळात माझा शासनाच्या अधिकाऱ्यांशी जो काही थोडाफार संबंध आला तो अनुभव फारसा कटु नव्हता आणि अजूनही नाही.

गेली अडीच वर्षं मी आणि माझी बायको महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून फिरत आहोत. अनेक योजनाचा आम्ही केवळ व्यक्ती ह्या नात्यानं स्वतंत्रपणे अभ्यास केला आहे.

हवेली तालुक्यामधील बकोरी ह्या गावी आमचं दोघाचं जाणंयेणं वारंवार असतं. पुणे–नगर रस्त्यावर, पुण्यापासून बावीस किलो

*With Best Compliments from :—*

**H. NAGINDAS & CO.**

46, Old Hanuman Lane,
3rd Floor, R. No. 54,
Bombay 400 002

मीटर अंतरावर हे खेडं वसलं आहे. गावाला रस्ता नाही, वीज नाही, पोस्टाची पेटी नाही. हे गाव ' चुकलेली बकोरी ' ह्या नावानं प्रसिद्ध आहे. हे गाव म्हणे शेतसाऱ्याला बारा वर्षं चुकून विसरलं गेलं होतं.

दोन वर्षांपूर्वी ह्या गावात गेलो तेव्हा मौजे नादीच्या धर्तीवर प्रथम चर्चा झाली. रोजगारहमीच्या कामासाठी लोकांना बारा पंधरा किलोमीटर रोज चालावं लागत होतं. लोक हैरण झाले होते. त्यांना स्वत.च्या गावातच नाला–बंडिंगचं आणि ताली बांधण्याचं काम हवं होतं; पण त्यांचं ऐकणार कोण ? असा त्यांना प्रश्न पडला होता.

' गावातच काम द्यावं ' अशा प्रकारचा एक विनंतीअर्ज संपूर्ण गावाच्या सहीआंगठ्यानिशी आम्ही हवेलीचे तहसीलदार शेटे ह्यांच्याकडे नेऊन दिला. अर्ज वाचून तहसीलदार म्हणाले, तुम्ही पंधरा दिवसांनी या मी सर्व करून ठेवतो. आम्ही बकोरीच्या लोकांना तसा निरोप दिला. लोक म्हणाले, तहसीलदार नेहमी असंच सांगतात; पण काही करत नाहीत !

पुण्यातील माझे अनुभवी मित्र देखील म्हणाले, ' तू ह्या सरकारी अधिकाऱ्यांवर विश्वास नको ठेवू–रेव्हेन्यू खात्यात तर पैशाशिवाय काही काम होत नाही–तुला ह्याचा अनुभव नाही–बकोरीचं गाऱ्हाणं वर्तमानपत्रातून मांड–पाहिजे असल्यास आम्ही एखादा जळजळीत लेख लिहितो...एरवी शासन तिकडे लक्ष देणार नाही–'

मी माझ्या मित्रांना लेख वगैरे न लिहिण्याबद्दल विनंती केली. त्याचप्रमाणे आंदोलनं, मोर्चा आणि घेरावो ह्यावर माझा स्वव:चा फारसा विश्वास नाही. कुठल्याही शासकीय अधिकाऱ्याशी अरेरावीनं वागणं मला जमत नाही, पटत नाही. अगदी तलाठ्याच्या ऑफिसमध्ये त्यांनी ' बस ' म्हणून सांगितल्याशिवाय मी खुर्चीवर बसत नाही–कारण ते त्यांचं ऑफिस आहे. त्या ऑफिसला काही मानमर्यादा आहे. तलाठी व्यक्ती म्हणून कसा का असेना अधिकारी म्हणून जर गैरव्यवहार करत असेल तर त्याबद्दल योग्य त्या अधिकाऱ्याकडे रीतसर तक्रार नोंदवावी, ह्या मताचा मी आहे. सांगण्याचा उद्देश एव्हढाच की बकोरीचं गाऱ्हाणं एकदम सरळ वर्तमानपत्राकडे नेण्याअगोदर शासनासमोर त्यांच्याच पद्धतीनं प्रथम मांडावं असं मी ठरवलं.

अर्ज दिल्यापासून पंधरा दिवसांनी मी आणि बायको हवेली तहसील ऑफीसमध्ये गेलो. श्री. शेटे ह्यांच्या नामफलकाऐवजी दुसराच बोर्ड लावलेला दिसला. आम्ही चरकलो. तहसीलदारांनी बरोबर बनवलं, असं वाटलं. कारकुनाकडे चौकशी करता श्री. शेटे ह्यांची बदली झाल्याचे कळले. आमचे दोघांचे चिंतातुर चेहरे पाहून कारकुनाला दया आली असावी. त्यांनी कामाच्या स्वरूपाची चौकशी केली. आम्ही बकरीची कथा ऐकवू लागलो. इतक्यात शेजारचा कारकून म्हणाला.

' तुम्ही परुळकर का ? शेटेसाहेबांनी तुमच्यासाठी एक फाईल आणि चिठ्ठी ठेवली आहे–' फाईल माझ्या हाती सोपवत तो पुढे म्हणाला– मागचा संबंध आठवडा साहेब बकोरीचं काम जातीनं करत होते–वरच्या अधिकाऱ्यांची मंजुरी मिळवून त्यांनी कागद सॉइल कंझरवेशन ऑफिसमध्ये स्वत: पोचवलेत आणि तुम्हाला




daCunha-BOI-62 MR.

महाजनसायबांना भेटायला सांगितलंय–'

आश्चर्याच्या गोड धक्क्यानं काहीसे तरंगतच आम्ही महाजन-साहेबाचं ऑफिस गाठलं. त्यांनी सांगितलं की गडबड न करता आम्ही जर आणखी तीन महिने थांबलो तर ते बकोरीसाठी सविस्तर योजना तयार करतील आणि वर्ष–दोन वर्षं पुरेल इतक्या कामाची आखणी करतील. आम्ही त्यांचा सल्ला मानायचं ठरवलं. त्याप्रमाणे बकोरीच्या लोकाना समजावून सांगितलं.

बकोरीचे ग्रामस्थ आणि पुण्यातील मित्र आमची थट्टा करू लागले. सरकारी टोलवाटोलवीचा आम्हाला चांगला अनुभव येणार ह्याबद्दल सर्वांची खात्री पटली

–पण त्यांचा अंदाज चुकला. बरोबर तीन महिन्यांनी सॉइल कॉंझरव्हेशनचे श्री. महाजन आणि बदलून आलेले तहसीलदार श्री. भालेराव ह्यांनी बकोरीत काम सुरू केलं. गेल दीड वर्ष हे काम चालू आहे आणि एका दिडकीची अफरातफर त्यात नाही असे बकोरीचे ग्रामस्थ छातीठोकपणे सागतात.

उडदामाजी काळे गोरे...सर्व सरकारी अधिकारी वर वर्णन केलेल्याप्रमाणे नसतील–पण जे काही थोडे आहेत ते तत्परतेने काम करू शकतात हे काय कमी झालं !

¤

वीरगाव, मौजे नादी, बकोरी...ह्या गावांतील अनुभवाच्या पार्श्वभूमीवर विलासराव साळुंख्याचे विचार ऐकताना नायगावचा त्यांचा प्रयोग प्रत्यक्ष जाऊन पहाण्याची जिज्ञासा निर्माण झाली.

२६ जानेवारी १९८० रोजी सायंकाळी सानेगुरुजी उद्यानात भरलेली, सैतानचौकीमध्ये रहाणाऱ्या पुरंदरवासीयांची सभा संपली तेव्हा पाणीपचायत सामुदायिक उपसाजलसिंचन योजना आणि त्यामुळे शहरातून खेड्याकडे उलटा वळणारा ग्रामीण तरुणांचा ओघ ह्याचा पुढील महिन्यात अभ्यास करण्याचा निश्चय मी विलासरावांच्याकडे बोलून दाखवला. ते सागू लागले–

'मायग्रेशन का होतंय ह्याचा कुणी खोलवर विचारच करत नाही. हे सगळे लोक सुखासुखी आपले संसार सोडून, आपलं घरदार सोडून, शेतजमीन सोडून मुंबईत केवळ हौसे-मौजेसाठी येतात का ? आर्थिक विकास फक्त शहरांचा घडतोय–शहरवासियांचा घडतोय. खेड्यातील माणसाच्या आर्थिक विकासाकडे लक्ष आहे कुणाचं ? त्याच्यासाठी योजना म्हणजे प्रौढशिक्षण, कुटुंबनियोजन, मलेरिया-निर्मूलन-बालवाडी...ह्या योजना महत्त्वाच्या नाहीत असं मी म्हणत नाही, पण त्यांच्या आर्थिक विकासाचं काय ? जिथं आर्थिक विकास घडतोय तिथं प्रत्येक माणूस धाव घेणार. ह्यात अनैसर्गिक असं काही नाही. जोपर्यंत आर्थिक विकास म्हणजे उद्योगधंदे आणि ते वाढले म्हणजे बेकारीचा प्रश्न सुटला असं गणित सर्वमान्य आहे तोपर्यंत खेड्यातून शहराकडे माणसांचा ओघ चालूच रहाणार. ग्रामीण भागात शेतकऱ्याला जर साधनं उपलब्ध झाली तर कोण मरायला तुमच्या शहराकडे येणार आहे ? कारखानदाराना मजूर मिळविण्यासाठी ग्रामीण लोकांना प्रलोभनं दाखवावी लागतील; आतासारखं ते आपण होऊन सहजासहजी येणार नाहीत. त्याना खेचून आणावं लागेल. सध्याचं मायग्रेशन हे forced मायग्रेशन आहे-परिस्थितीच्या दबावाखाली घडणारं स्थलांतर. नाइलाज म्हणून लोक गाव सोडतात.'

¤

सानेगुरुजी उद्यानात जमलेल्या काही मंडळीच्याबरोबर आम्ही सैतानचौकी गाठली. तिथले काही फोटो घ्यायचे आहेत अशी एका मुलाकडून अगोदरच सूचना धाडली होती.

सैतानचौकीमधील एक खोली. खोली कसली, पत्र्याचं खोपटं. सहा बाय आठचं. त्याला देखील पोटमाळा. निर्जीव कॅमेऱ्याच्या भावनारहित लेन्सला देखील ह्या खोलीचं 'वैभव' प्रामाणिकपणे टिपणं अशक्य. मुंबईतील ह्या 'संसाराचे' फोटो काढण्याच्या कल्पनेनं बायकोचं मन संकोचलं. दारिद्र्य, गर्दी, झोपडपट्टी, घाण ह्या गोष्टी आम्हा दोघाना अजिबात अपरिचित नाहीत–पण सध्याकाळी सानेगुरुजी उद्यानात जे ऐकलं होतं त्यावरून सैतानचौकीत अडकलेले हे संसार गावातल्या खुल्या वातावरणात सुबकपणे मांडता येतील हे पटलं होतं. त्या प्रत्यंतरानंतर ही खोली पहाणं हा अनुभव जीवघेणा होता.

स्वतंत्र खोली असं भारदस्त नाव असलं तरी जे पहात होतो ती एक पत्र्याची साधीसुधी बारकी खोपी होती. पोटमाळ्यावर तीन लेकरं झोपली होती. त्यापैकी एक अगदीच तान्हं-अंगावरच्या दुधाचं–काहीसं रोगट दिसणारं. इतर दोघही तशीच. खुजट वाढीची.

खोलीसमोर खुलं गटार. त्यातून दुर्गंधी, खोलीचं स्वरूप तसं सार्वजनिकच. माणसाची सतत वर्दळ. प्रत्यक्ष खोलीत कुणी परका नसला तरी खोलीच इतकी उघड्यावर की तिथं काही खासगी घडणं अशक्यच. खोलीला लागून तशाच प्रकारच्या असंख्य खोल्या आणि सर्वत्र माणसं आणि मुलं.

ज्या खोलीत मी पाटावर अवघडून बसलो होतो तिच्या भिंतीवर पत्र्याचं एक शेल्फ होतं. त्यावर कुठल्याशा देवाचा, गंधटिळ्यामुळं ओळखू न येणारा फोटो अडकवला होता. उदबत्तीच्या धुरानं कडा पिवळ्या झालेल्या देवाच्या फ्रेमला कागदी फुलाचा हार घातलेला. शेल्फच्या खालच्या कप्प्यात पितळेचे चार डबे, एक स्टेनलेसचा डबा, ॲल्युमिनियमची भांडी, पळी, झारा आणि सटरफटर. शेल्फखाली दोन तीन पितळेची मोठी भांडी आणि दहा-पंधरा ताटवाट्यांचा ढीग.

खोलीच्या कोपऱ्यात, पेटलेल्या स्टोव्हच्या समोर खोलीची मालकीण. सपाट छातीची, खोल डोळ्याची, गालफडं वर आलेली खाद्यांची हाडं स्पष्ट दिसणारी. निस्तेज. तिच्या अंगावर नायलॉनचं विटलेलं पिवळंजर्द पातळ. त्याला प्लास्टिकच्या नकली जरीची


*With Best Compliments from.—*

**Allied Electronics Corporation**

Office : 94, Kansara Chawl,
Kalbadevi Road, Bombay–400 002

| PHONE : | GRAM : | TELEX : |
|---|---|---|
| 335294 | Bakulbaugh | 011/3897 |
| 327510 | Bombay | Allied |

Phone : 447458




**त्या सोनियाच्या दिवसाचीं सोनपाऊले आजपासूनच उमटू द्यात.**
**पालकांनो ! त्यासाठी लगेच स्टेट बँकेकडे आपली पावलं वळवा.**

आपल्या चिमण्या बाळांचं उज्ज्वल भवितव्य हेच तर असतं आईवडिलांचं मधुर स्वप्न. या स्वप्नरंजनात त्यांचं भान हरपतं आणि कळतसुद्धा नाही की, काळपक्षी किती वेगाने उडत चाललाय. किती झपाट्याने उद्याचा प्रत्येक दिवस "आज" होऊन उगवतोय. मग त्यांना उपरती होते की उराशी बाळगलेल्या स्वप्नाचा चक्काचूर झालाय. फारच उशीर झालेला असतो. या स्वप्नभंगाचं कारण म्हणजे दूरदृष्टीचा अभाव आणि योजनाबद्धतेची वाण.

आमच्या स्टेट बँकेकडे जितकी स्वप्ने तितक्या योजना आहेत. त्या म्हणजे बचत खाते (सेव्हिंग अकाउंट), मुदतीची ठेव (टर्म डिपॉझिट), आवर्ती ठेव योजना (रिकरिंग डिपॉझिट स्कीम), पुनर्गुंतवणूक योजना (रिइन्व्हेस्टमेंट प्लान), बारमाही निवृत्तीवेतन योजना (पेरेनिअल पेन्शन प्लान), जनता ठेव (जनता डिपॉझिट) आणि मुलांचे खाते (मायनर्स अकाउंट) यापैकी कोणतीही निवडा.

अधिक माहितीसाठी स्टेट बँकेच्या नजीकच्या कार्यालयात या.

बचतीसाठी स्टेट बँक
भारताची सर्वात मोठी बँक, जिची ५,२०० हून अधिक कार्यालये आहेत.

**स्टेट बँक**

CHAITRA-SBI-626 MAR

उसवलेली किनार, मॅचिंग रंगाचं; पण घामानं काळपटलेलं पिवळं ब्लाऊज. अंबाडा, त्यावर वेणी, गळ्यात मंगळसूत्र आणि नकली मण्यांची माळ. एका हातात प्लास्टिकच्या आणि काचेच्या बांगड्या, दुस-या मनगटावर घड्याळ. आम्ही फोटो काढायला येणार ह्याची आगाऊ सूचना असल्यामुळं तोंडाला स्नो-पावडर. कुंकवाच्या जागी टिकली-तीदेखील प्लास्टिकची.

तिच्या शेजारी, तिच्याच वयाचा–साधारण पंचविशीचा रोगट दिसणारा तरुण. तिचा नवरा. खोलीचा मालक. निळी बेलबॉटमची पॅंट आणि टेरिकॉटचा गुलाबी मॅनिला–मानेशी कॉलरजवळ मळलेला. तेलानं थबथबलेल्या केसांचा त्यानं रेखीव भांग पाडला होता, कपाळ सगळं मुरमाच्या पुटकळ्यांनी भरलेलं. चेहऱ्यावर एक ओशाळवाणं हसू घेऊन, तो काहीसा अवघडल्यासारखा बायकोशेजारी पाटावर बसून होता.

मला पाटावर नीट मांडी जमेना. पाट लहान, माझं बूड मोठं. टाइट जीन्स. मांडीच घालता येईना. पाटावर बॅलन्स करणं अवघड म्हणून मी पाट सारून जमिनीवर बसू लागलो–तर मालकाची धांदल उडाली. जमिनीवर नको म्हणत घाईघाईनं पोटमाळ्यावर झोपलेल्या मुलांच्या खालची सतरंजी ओढून काढू लागला. तान्ह्या लेकरांनी सतरंजी ओली केलेली मला स्पष्ट दिसत होती. मी मालकाला अडवलं. उगीच मुलांना जागं करू नका म्हणून जमिनीवरच मांडी घालण्याचा पवित्रा घेतला. तेवढ्यात बाहेर उभ्या असलेल्या एका पोरानं शेजारच्या खोलीतील पत्र्याची गंजलेली खुर्ची आणून दरवाज्यात ठेवली.

मालकानं एका मळक्या फडक्यानं खुर्ची पुसली आणि आग्रहानं मला तिच्यावर बसवलं. मी खुर्चीत ओशाळल्यासारखा बसलो. गटारातील पाण्यात पाय बुडवून खेळणारं एक बारकं पोरगं दात विचकत माझ्याकडे पाहून खिदळत म्हणालं, ' अरे ये तो नकली हीरो है–' इतर पोरं फस्फसून हसली. खोलीच्या मालकानं त्यांना अर्वाच्य शिव्या घालून दूर पिटाळलं. मी अवघडलेला. मालकीण भांड्यातला चहा गाळताना पुटपुटली–

' लई उनाड इकडची पोरं. वळणच न्हाई ! '

' मालक पुन्हा अवघडून पाटावर बसला. बशीतून भुरकून चहा पिऊ लागला. मी त्याच्या बायकोला प्रश्न विचारला –

' मुंबईला येऊन किती वर्षं झाली ?'

' झाली सात-आठ. '

' गावाकडे जमीन आहे का नाही ?'

' आहे की–'

' मग गावाकडे परत जाणार की मुंबईतच कायम रहाणार ?'

' गावाकडं जाऊन खायाचं काय ? मुलांच्या शिक्षेणाचं तिथं जाऊन काय करायचं ? तिथं कसलीही सोय आहे का माणसांनी रहाण्यासारखी ? साधा लाइट पण न्हाई. उन्हाळ्याच्या टायमाला व्हिरी आटलेल्या. प्यायच्या पाण्याची अडचण. घागरी घेऊन मैल मैल रखडायचं. इथं काय वाईट म्हनून तिथं परत जायचं...' इथं स्वतंत्र घर हाये. पगार हाये वेळच्या वेळेला. गावाकडं जाऊन काय करायचंय ? त्या उजाड माळरानात दोन वेळची भाकरी तरी सुटल का ? तिथं सगळं मागासलेलं...मुलांचं कसं काय निभायचं ?'

' पगार किती मिळतो तुमच्या मालकांना ? '

' मला खर्चाला म्हैना तीनशं देतात – '

' भागतं तेवढ्यात ? '

' कसं भागणार – म्हागाई काय कमी हुती आहे – '

– वाढतीच आहे सारखी. घाजण माझ्याकडं खानावळीला हायेत. त्यातून बचत होते थोडी पैशाची. तसं कमी काय पडत नाही. मुलांना एक टायम दूध, शाळेची फी, दवापाणी, कपडालत्ता सगळं भागतं –'

' गावात गेल्यावर तीनशेपेक्षा जास्त मिळाले तर ?'

' तिथं कुठून मिळायला–गावात पैसा कुठून हातात पडायला ?'

' समजा, तुमच्या शेतीला पाण्याची सोय झाली...दोन-अडीच एकर बागायत झाली...'

मी काही तरी वेड्यासारखं बोलतोय ह्या जाणिवेनं माझ्याकडे काहीशा सहानुभूतीनं पहात किंचित हसत ती म्हणाली –

' साहेब, तुम्हाला आमच्या गावची कल्पना नाही – तिथं कुठली हो शेतीच्या पाण्याची सोय ! नदी नाही, धरण नाही. पाट नाही – मग पाणी येणार कुठून ? – सगळा दुष्काळी भाग –इथं काही वाईट न्हाई –'

आणि मग कपबशा उचलून विसळत ती स्वतःशीच पुटपुटली –

' पाण्याची सोय असती, दोन एकर बागायत असती तर तुमच्या मुंबईत मरायला कोण आलं असतं–इथं जगणं सोपं का आहे – लई अवघड ! '

¤




# नाना पाटोळे, ढवाळ, देवराम सदाशिव गोलांडे....

विलासरावांची जीप खंडाळयाचा घाट पार करीत होती. विलासराव पोटतिडिकेनं बोलत होते–

'आणखीन पुढं गेल्यावर, पुण्याजवळ कामशेट इथं पवनानदीवर सरकारनं पाच-सहा कोटी रुपयांचं धरण बांधलं आहे. बारमाही पाण्याचा साठा आहे. परिसर सगळा डोंगराळ. त्यामुळं धरणातून पाट काढता येत नाही. जमिनी लहान आहेत. डोंगरउताराच्या. म्हणून सरकारनं खाली बंधारे बांधलेत आणि प्रत्येक बंधाऱ्यावर पाचपाचशे हॉर्सपॉवरच्या मोटारी बसवून लिफ्टस् केली आहेत. पाच वर्षं झाली– पण वीस टक्के पाण्याचा देखील वापर होत नाही आणि जो होतो तो शेतकऱ्याला नुकसान देणारा. त्यामुळं तिकडचा शेतकरी म्हणतोय भीक नको पण कुत्रा आवर– पाणी नको आमची जमीन वाचव–'

'तिथं काय आहे– पावळयात कुणालाच पाणी नको असतं– भातांचं पीक. पाऊस भरपूर. पावसाळा संपला की सरकार म्हणतं लिफ्टचं पाणी वापरा. उन्हाळी भात लावा. त्यामुळं काय झालंय तर आता उन्हाळी भाताचं पीक तर येतच नाही; पण पावसाळी भाताचं देखील वाटोळं झालय !–'

'हे लिफ्टच पाणी येतं डोंगरउतारावरून-ज्याची जमीन वर आहे त्याला भातशेतीच्या जुन्या सवयी- पाणी सोडायचं म्हणज जमीन भिजवायची– मग ते उन्हाळी भात असो नाही तर पावसाळी– मग हे वरचं पाणी खालच्या उतारावरच्या जमिनीत मुरत रहातं– आणि आता सगळया जमिनींना दलदल सुटली आहे– निचरा नाहीच. उताराखालच्या लोकाचं प्रचड नुकसान होतंय– अशी ही सरकारी योजना–'

'एकूण सत्तावीस लिफ्टस् आहेत– पाचपाचशे हॉर्सपॉवरची– तिकडचा शेतकरी मात्र वैतागलाय– तो म्हणतोय नायगावच्या धर्तीवर पाण्याच वाटप करा !–'

'ज्याच्या उताराखालच्या जमिनी खराब झाल्यात ते शेतकरी डोंगरमाथ्यावरच्या आपल्या जमिनी कसण्याचा प्रयत्न करत आहेत– पण तिथं मात्र सरकार लिफ्टनं पाणी पुरवत नाही. म्हणून ते शेतकरी वीस टक्के पैसे जमा करून पाणीपंचायत तत्त्वावर योजना आखायला तयार आहेत–'

'थोडक्यात काय तर शभर टक्के पैसे खर्चून सरकारनं उभी केलेली योजना बंद पडली आहे. ह्यातून एक गोष्ट स्पष्ट दिसते की सरकारकडून फुकट मिळालेली योजना फलदायी ठरत नाही. लोकांना जोपर्यंत योजना आपली आहे, आपला प्रत्येकाचा घामाचा पैसा त्यात गुतलाय ह्याची जाणीव होत नाही तोपर्यंत हे असंच चालायचं- लोकांना असं वाटल पाहिजे की, जोपर्यंत आम्ही स्वत: वीस टक्के पैसे गोळा करत नाही तोपर्यंत आमचं लिफ्ट होताच कामा नये– तरच ते लिफ्ट नतर यशस्वी होणार–'

¤

पुण्याला पोहचताच मी तारीख निश्चित केली आणि तातडीनं नायगाव गाठलं. पाझरतलावाच्या बांधावर पन्नाशीचे एक गृहस्थ भेटले स्वत.ची ओळख करून देत ते म्हणाले–

'माझं नाव नारायण महादेव पाटोळे. इथ एक वर्षापासून आलो आहे. माझं सगळं आयुष्य मुबईत गेलं. सहा महिन्यांचा असताना शेजारच्या खेडयातील आजोळी गेलो. नऊ वर्षंपर्यंत तिथंच राहिलो. मराठी चौथीपर्यंतच शिक्षण त्या खेडयातच झालं तिथून मुबईला गेलो तो पन्नाशी उलटेपर्यंत तिथच. शिक्षण मुबईत पूर्ण केलं, नोकरी मुंबईत केली– बेस्टमध्ये कंडक्टर म्हणून लागलो. बढती मिळत स्टार्टरचा हुद्दा गाठला. पगार जवळजवळ हजार रुपये मिळायचा. रिटायर होण्याची वाट न बघता एक दिवस राजीनामा दिला. मुंबईला रामराम ठोकला आणि सरळ इथं नायगावला आलो !

'वयाच्या पंधरा–सोळाव्या वर्षापासून बेचाळीसच्या चळवळीचे मनावर संस्कार झाले तेव्हापासून राजकीय चळवळीमध्ये कार्य करावं अशी भावना वाढली. श्रमजीवी गरिबांसाठी खूप धडपडावं असं वाटायचं. त्यातून कामगारचळवळ, सामाजिक चळवळ ह्यात मी काम करू लागलो. मी मनोभावे कार्य करीत होतो; पण नतर ह्या सर्व चळवळीमध्ये अतिशय गलिच्छ स्वरूपाचं शहरी राजकारण घुसलं तेव्हा मात्र त्या वातावरणाला मी विटलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गाने चालणारा मी मनुष्य. मला संकुचित वृत्तीचं स्वार्थी राजकारण मानवेना.तशातच शहराची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली. राहणीमानाचा दर्जा घसरत चालला, स्वच्छ हवा नाही, शातता नाही– ह्या साऱ्याचा परिणाम म्हणून शहरी लोकाची मनं संकुचित बनत चालली– स्वार्थ वाढू लागला–

'ज्या वेळी मला नायगावला चालू असलेल्या पाणीपंचायत कार्यक्रमाची कल्पना मिळाली तेव्हा मी प्रत्यक्ष येऊन ते कार्य पाहिलं. साळुंखे पति-पत्नीचे विचार ऐकले. पोपट अण्णा खेसे, विठ्ठल होले ह्यांच्याशी चर्चा केली आणि माझी खात्री पटली की, मुबईत नोकरी करून मी जे हजार रुपये मिळवतोय तितकेच मला इथं माझी जमीन कसून मिळणार असतील तर मुबईत धक्के खात जगण्यापेक्षा इथ स्वतंत्र राहिलेलं निश्चतच चागलं ! म्हणून मी राजिनामा दिला आणि नायगावला स्थायिक झालो.

'माझी एकूण साडेसात एकर जमीन आहे– पूर्वापार चालत आलेली. मी स्वत: खरेदी केलेली नाही. मी मुबईला असताना चुलते जमिनीकडे पहायचे; पण उत्पन्न अगदी कमी.सर्व काही पावसावर अवलंबून असल्यामुळे एकरी जास्तीत जास्त वीस किलो धान्य हाती पडायचं. आता हळूहळू सुधारणा होते आहे. गेल्या वर्षी एकरी पन्नास किलो झालं. आता यंदा तीनशे किलो सहज निघेल.

'मला इथं आल्यावर मूळ उद्देश समजला तो असा-आज खेड्या-खेड्यातून माणसं शहराकडे धाव घेत आहेत; पण जर पाणीपंचायत तत्त्वाप्रमाणे पाण्याचं समान वाटप ग्रामीण भागातून करता आलं तर शहराकडे जाणारा हा ओघ थाबवता येईल. खेडी उत्पादक होतील. मला स्वत:ला तरी हे मनोमन पटल आहे आणि मी स्वत:ला ह्या

कामाला वाहून घ्यायचं पक्कं केलं आहे. मजजवळ धन नाही; पण तनमन अर्पून मी हृयात सहभागी झालो आहे.'

मुंबईमधील हजार रुपयाची नोकरी सोडून दुष्काळी भागातील आपल्या जमिनीत सोनं पिकविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या नाना पाटोळचांचा आत्मविश्वास पाहून माझं मन सुखावलं. नानांशी गप्पा मारत मी 'ग्रामगौरव प्रतिष्ठान पाणीपंचायत नायगावच्या फार्ममधून फेरफटका मारला. पन्नास एकरांच्या उजाड माळरानाचा संपूर्ण कायापालट झाला होता. फार्मच्या शेवटी डोंगरउताराला पाचसहाशे झाडं दिमाखानं डुलत होती. आणखी काही वर्षांतच इथं जंगलासारखी दाट झाडी पहावयास मिळणार हृयाची खात्री पटली. विलासरावांचे शब्द आठवले–


'आता हल्ली आपण इंधनाची समस्या वगैरे जे ऐकतो ही निव्वळ फसवणूक आहे. गोबरगॅस वापरा, सौरशक्तीचा वापर हे सगळं चुकीचं आणि अवास्तव आहे. ग्रामीण भागातील खरी समस्या माहीत नसलेल्या शहरी लोकांच्या डोक्यातून बाहेर पडणाऱ्या हृया सगळ्या रम्य गुलाबी कल्पना आहेत. इथं मी गोबरगॅस केलाय पण दुसऱ्या कुणीतरी त्यासाठी पैसे खर्चलेत म्हणून. मी साधा शेतकरी असतो आणि मला कुणी जर गोबरगॅस कर म्हणून सांगितलं असतं तर मी अजिबात मान्य केलं नसतं.

'आमच्या इथं हा गोबरगॅस आहे. त्याला आम्ही खताचा छोटा कारखाना म्हणतो–तो त्याचा मुख्य उपयोग हे मला मान्य आहे. आता तुम्ही आजूबाजूला जी मोठी झाडं पहाता ना ती आम्ही आठ वर्षांपूर्वी लावली आहेत; पण हृया झाडांच्यामध्ये ज्या बाभळी दिसतात, लिंब दिसतात, ते आपोआप आले आहेत. जेव्हढी झाडं आम्ही लावली तेव्हढीच निसर्गातून आपोआप जन्माला आली. निसर्गाचा नियमच तसा आहे. हृयाचा अर्थ एव्हढाच की, एकदा ecology रुजवता आली तर काही काळातच निसर्गाचा समतोल साधणं शक्य होतं. आज ग्रामीण भागात सर्वत्र निसर्गाचा तोल बिघडला आहे आणि त्यातूनच जमिनीची धूप, अनियमित पाऊस, इंधनाची टंचाई हृया समस्या निर्माण झाल्या आहेत; पण त्याला उत्तर गोबरगॅस होऊ शकत नाही....

एका गोबरगॅसवर दोन हजार रुपये खर्च करायचे तेच जर अग्रक्रमाने जलसिंचनावर वापरले तर ग्रामीण भागातील ecology चा समतोल साधता येईल. जवळच्याच भागातील एका पाणीपंचायत लिफ्टचं उदाहरण घ्या. दहा कुटुंबांच्या एका छोट्या लिफ्टमुळं दहा एकर जमीन भिजणार आहे. त्या दहा एकरात कपाशी लावली तर किमान उत्पन्न तीस हजार रुपये मिळू शकेल. अहो, एका कुटुंबानं अर्धा एकर जरी कपाशी केली तरी त्याला उत्पन्न तर मिळतंच पण कपाशीच्या ज्या काटक्या उरतात त्यांचा जळणासाठी उत्कृष्ट उपयोग होतो. तीच गोष्ट बांधावर लावलेल्या एरंडीची. एक एकराच्या बांधावर सहज हजार एरंडाची झाडं लावता येतात. बियांपासून उत्पन्न मिळतं आणि झाडाचा सर्पणासाठी उपयोग होतो. म्हणूनच ग्रामीण समस्यांना उत्तर म्हणून एकदम गोबरगॅस-योजना अग्रक्रमानं राबविण्याचं ठरवलं तर चुकीचं ठरेल.अग्रक्रम पाण्याला. पाणी, माणूस आणि जमीन हृयांचं गणित महत्त्वाचं. इतर गोष्टी पूरक आणि सहाय्यक; पण अग्रक्रम पाण्याच्या समान वाटपाला तरच ग्रामीण समस्या सुटतील.'

नायगावच्या परिसरात भटकत भटकत मी एका वस्तीवर जाऊन पोहचलो. एका झोपडीसमोर चार–पाच मंडळी गप्पा मारीत होती, त्यांच्यात जाऊन बसलो. त्यापैकी एकजण भिवा शिरपती ढवाळ सांगू लागले–

'मी बारा वर्षांचा होतो त्या टायमाला म्हुंबईला गेलो. म्या बरेच दिवस तिकडे काढले. तिथच मला पाच-सात मुलं झाली–म्हंजे दोन मुली आन् पाच मुलगे. मुलांचं शिक्षण मुंबईतच केलं. आता दोन–अडीच वर्ष झाली मी गावाकडे परत आलोय. आमची चार एकर जमीन आहे. त्या जमिनीला पाण्याची काही सोय नाही. मग नायगावच्या संस्थेचं काम पाहिलं आणि त्याप्रमाणे आम्ही ढवाळमंडळी आणि इतर शेतकऱ्यांनी मिळून एक स्कीम तयार केली.

आता ती पूर्ण देखील झाली. चार-आठ दिवसात पाणी सुटल सगळ्यांच्या जमिनीला...

...मुंबईला आम्ही सायनला झोपडपट्टीत रहात होतो. दहा बाय बाराची खोली. त्यामध्ये आम्ही दोघं, पाच मुलगे, त्यांची कुटुंबं आणि मुलं असे सगळे मिळून सोळा जण रहात होतो—मुंबईत आमचा व्यवसाय मोचीकामाचा, कमाई तशी बऱ्यापैकी. पोटाला कमी पडायचं नाही. आता इथं लिफ्टाची सोय झाल्यावर चौथा आणि पाचवा नंबरचा मुलगा आपली कुटुंबं घेऊन गावाकडे परतणार आहेत.

'एकूण सोळा सभासदांनी मिळून ही स्कीम केली आहे सगळी मिळून सव्वीस एकर जमीन भिजेल. आम्ही एकरी तीनशे रुपयेप्रमाणे पैसे जमा केले. कुणी जनावरं ओपली, कुणी शेळ्या ओपल्या, कुणी खाजगी कर्जावर रक्कम काढली आणि वीस टक्के पुरी केली. पन्नास टक्के सरकारकडून सबसिडी मिळाली आणि उरलेली तीस टक्के नायगावच्या संस्थेनं बिनव्याजी कर्ज म्हणून दिली. ह्या लिफ्टांत एकूण नऊ हरिजन सभासद आहेत. लिफ्टाच सगळं काम म्या पाहिलं. आगदी आखणीपासून ते हिशेबापर्यंत—मला लिवता-वाचता येत नाही; पण सगळ वेवस्थित व्हायें—पायजे तर तुम्ही प्रत्यक्ष बघा—'

ढवाळाच्या शेजारचा मिस्किल डोळ्यांचा एक म्हातारा माझ्याकडून काडयापेटी घेऊन बिडी पेटवत म्हणाला :

'आम्ही शेजारच्या गावचे. आमच्याकडे अजून अशी योजना नाही. परवाच्या पावसाचं आमचं सगळं पाणी नुसतं वाहून गेलं. किती तरी पाणी फुकट गेलं. इथं नायगावात मात्र साळुंख्यानी ह्येच पाणी अगदी पद्धतशीर अडवून ठेवलय! नायगावच्या ह्या पाण्याच्या योजना पाहिल्या का आमच्या इथल वाहून जाणार पाणी बघताना लई चुटपुट लागते. सात-आठ वर्षांपासून साळुंखे इथं खपतायेत—पण सुरुवातीला काय आमचा त्यांच्या कामावर विश्वास नव्हता—व्हय खरं ते सांगितलेले बरं—खोटं बोलण्यात काय फायदा? साळुंखे स्वतः फसणार आणि दुसऱ्याना लुबाडणार अशीच आमच्या मनाची धारणा होती. पावसाचं पाणी अडवून अशी कुठं शेती होतेय का? असच आमचं म्हणणं होतं. अगुदर कुठ असलं बघितलेलन न्हाई मग विश्वास तरी कसा ठेवायचा? आता मात्र गेली दोन वर्षं इकडची प्रगती प्रत्यक्ष डोळ्यानी बघितल्यावर आमचे डोळे उघडलेत. सगळा विचार आता स्पष्ट झाला... कालचा पाऊस आमच्याकडं नुसता वाहून फुकट गेला...आता मात्र आम्ही ताबडतोब योजना हाती घेणार—आता कसला संशय उरला नाही—'

ढवाळ मंडळीचं लिफ्ट पाहून संस्थेवर परत आलो. कडकडून भूक लागली होती. समोर गरम गरम बाजरीची भाकरी, वांग्याची भाजी, मिरचीचा ठेचा आणि कांदा बघून तोंडाला पाणी सुटलं. जेवताना विलासराव सांगत होते—

'शेतकऱ्याला स्वतःच्या परिसराची बिनचूक माहिती असते. त्याचा अनुभव दांडगा असतो; पण तो अनुभव वापरायचा कसा हे त्याच्या ध्यानात येत नाही 'तुझे असुनी तुजपाशी' अशी त्यांची स्थिती असते. कुठं बंधारा घातला पाहिजे, कुठं नाला अडवता येणं शक्य आहे, तलावाला कुठली साइट योग्य आहे हे सर्व त्याला माहीत असतं... हळूहळू त्याच्याकडूनच ही सर्व माहिती काढून घेता येते त्याला एकदम सर्व काही सांगता येणार नाही...


'आता ह्या परिसरातील शेतकऱ्यांच्या ध्यानात एक गोष्ट पक्की आली आहे. वैयक्तिक प्रयत्नातून पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. विहीर खोदणं, त्यावर डिझेलचं इंजिन किंवा विजेची मोटार बसवणं हे सर्वसामान्य शेतकऱ्याला परवडणारं नाही. ते पाणी किफायतशीर ठरणार नाही. म्हणून सध्या तरी पर्याय एकच. सामुदायिक उपसाजलसिंचन. पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच नियोजन, त्याचं माणशी अर्धा एकर ह्या हिशोबानं वाटप आणि त्यासाठी लोकांनी वीस टक्के जमा करून आखलेली योजना. हा प्रयोग आता अनेक ठिकाणी यशस्वी झालेला आहे. त्याचा आता योग्य रीतीने प्रसार करता आला पाहिजे.

"आतापर्यंत महाराष्ट्रातील दुष्काळी भागात पाण्याच्या बाबतीत सरकारी योजनांतून जे काही सामुदायिक प्रकल्प हाती घेण्यात आले ते सर्व अयशस्वी झाले आहेत. कोल्हापूर-सांगली भागात मात्र हेच प्रकल्प अत्यत यशस्वी झाले आहेत. आमच्या राजकीय नेतृत्वानं दुष्काळी भागात हे प्रयोग का फसले ह्याचा अभ्यासच केला नाही. ते यशस्वी करण्याचे प्रयत्न देखील केले नाहीत. उलट सामुदायिक उपसाजलसिंचन योजना नेहमीच अयशस्वी होतात म्हणून यापुढे अशा योजनाच करू नयेत असा प्रचारही नेतेमंडळी करू लागली. नायगावला आम्ही ह्याच योजना कशा रीतीने यशस्वी होऊ शकतील ह्याचं प्रात्यक्षिक करून दाखविलं आहे. पाणीपंचायतच्या योजनामध्ये लोकांचा सहभाग अगदी सुरुवातीपासून असतो हेच त्या यशाचं रहस्य आहे...

'—ढवाळाचं लिफ्ट तुम्ही पाहिलंतच. नाना पाटोळचांचं लिफ्ट देखील पूर्ण होत आलं आहे. आता ह्या हरिजन किंवा मागासवर्गीयांमध्ये एक भावना रुजली आहे. किंबहुना रुजविली गेली आहे. त्यांना वाटतं सगळं सरकारनं फुकट करून द्यावं. इथं नायगावच्या परिसरात सगळ्या हरिजनाच्या जमिनी आहेत. भरपूर जमिनी आहेत; पण त्याचा उपयोग काय? एकरी वीस किलो धान्य देणारी जमीन किफायतशीर तर ठरत नाहीच उलट बोजा होऊन बसते. आता इथं हरिजनाचे दोन लिफ्ट पूर्ण झाले आहेत तेव्हा कुठे आजुबाजूच्या हरिजनमंडळींना आत्मविश्वास वाटू लागला आहे. दुसऱ्या कुणाचं उदाहरण त्यांना पटलं नसतं. ते म्हणाले असते, हे काय मोठेच लोक आहेत, त्यांचं लीफ्ट किफायतशीर ठरलं तर नवल काय! पण जेव्हा आपल्यासारख्याच हरिजनमंडळींचं लिफ्ट होऊ शकतं हे, ते पहातात तेव्हाच मग त्यांची खात्री पटते.'

विलासरावांशी बोलताना एक गोष्ट वारंवार जाणवते ती म्हणजे सखोल अभ्यास. पाण्याच्या अनुषंगानं घडू शकणाऱ्या सामाजिक बदलाचा सारासार विचार ह्या माणसानं केला आहे. एखाद्या तत्त्वानं झपाटून गेल्यावर देखील डोळसपणे चौफेर ध्यान ठेवून कार्य कसं करायचं हे विलासरावांच्याकडून शिकण्यासारखं आहे सर्वसाधारणपणे तत्त्वानं झपाटलेली माणसं हेकटवृत्तीची असतात. दुसऱ्यांच्या अनुभवाच्या बोलाची त्यांना किंमत नसते. विलासरावांची वृत्ती विद्यार्थ्याची आहे. नुसते उपदेशामृत पाजायची त्याना सवय नाही.

बाजरीच्या भाकरीवर यथेच्छ ताव मारून



गावकऱ्यांना आपल्या परिसराची
अचुक माहिती असते.
श्री. विठ्ठल होले बंधाऱ्याची जागा निवडताना...

¤

मी उठलो. आतील मोरीवर हात धुण्यासाठी तांब्या भरला आणि बिचकलो. हळूच मोरीतून बाहेर आलो आणि समोरच्या कोवळ्या बाभळीखाली हात धुऊन चूळ टाकली. इथं आलं की हे आपोआपच असं घडतं.

ओसरीवर एक वयोवृद्ध शेतकरी माझीच वाट पहात थांबला होता. नाना म्हणाले, 'तुम्हाला माहिती विचारायची आहे. काही म्हणून आलो–'

'तुम्ही मुंबईला होता ना...त्याबद्दलच विचारायचं आहे–' मी सिगरेट पेटवत म्हातारबाबांच्या शेजारी बैठक मारली.

'माझं नाव गोलांडे. देवराम सदाशिव गोलांडे...तर सांगायची गोष्ट म्हंजी आता त्या मुंबईत काय खरं न्हायलं न्हाई. ही तरुण पोरं तिथं जायचं म्हणत्यात; पण आता तिथं अर्थ नाही.बरं; पूर्वीचं आम्ही सांगून बी त्याचा आता काय उपयोग नाही. तुमचा इस्वासच बसणार न्हाई. साधं खानावळीचं उदाहरण घ्या, मी सात रुपये ह्यांना खानावळीचं देत हुतो, अन् मटणाचा योक रुपया जादा. आता निस्तं खानावळीचं एकशेदहा रुपये बसतात. पूर्वीच्या आणि आताच्या परिस्थितीत लई मोठा फरक!

'पगार माझा सुरुवातीला अठरा रुपये होता. बत्तीस वर्स मीलमधे काढली. आल्या ह्यांन्याचा पगार अठरा रुपये! त्यातले सात खानावळीला, मटणाचा वेगळा–तशातच मला तालमीचा नाद–मग तीन रुपये तालमीला भाडं द्यायला पायजे का नको–तर ते तीन. आन् ज्या ठिकाणी आपण झोपायचं किंवा इसरांती घ्यायची–म्हंजे गाळा–त्याला ह्यांन्याचं भाडं काय असल? अवघे पाच आणे–किती? –फक्त पाच आणे. ही बघा पूर्वी म्हंजे एकोणिसशे अडतीस सालची गोष्ट सांगतोय तुम्हाला...आता तुम्हीच ह्यावर इचार करा–

'मी म्हुंबईला तेहतीस साली गेलो आणि चौसष्ट साली परत गावाकडे आलो–तो कायमचाच; लई झाली मुंबईची नोकरी. एका पावण्याच्या ओळखीनं गेलतो. गेल्याबरोबर भाऊच्या धक्क्यामर हमालीचं काम मिळालं; अर्धा दिवसच केलं. दोन रुपये रोकड मिळाले; पण आपुन निश्चय केला हमालीत मरायचं न्हाई. माझं वय सोळा वर्सांचं–कवर येड्यासारख्या गोन्या टाकीत न्हायचं!

'गावातला एक माणूस कुर्ल्याच्या मिलमध्ये कामाला होता. मी त्याला म्हटलं मला ह्ये काम शिकीव. त्याच्या हाताखाली बांधूनच गेलो मी आणि धा महिन्यात मला काम शिकीव असा आग्रह धरला. धा महिन्यांचा पगार तू घे, मला पैसा नको फक्त जेवणाची आन् राहण्याची सोय बघ, अशी त्याच्याबरोबर बोली केली. धा महिन्यांनंतर त्यांनी नोकरीला लावून दिलं आणि तवापास्नं मी पगार घ्यायला लागलो.

'तवा परिस्थिती वेगळी हुती. रस्त्यानं माणूस चालला तरी त्याला मीलमधे बोलावून घेत होते; पण आता मुंबईला रस्त्यातून अगदी शिकलेला एम्ए पास जरी चालला असल तरी त्याला कुणी हाका मारत न्हाई!

'काम शिकत होतो तोपर्यंत न्हायला चुलत्याकडं. त्याचं बिन्हाड हुतं. त्याच्या ओरवणात झोपायचं. आन् मग जसं काम लागलं तसं स्वतंत्र आसरा शोधला. गाळ्यात सोय केली. चौसष्ट साली काम सोडलं तेव्हा गाळ्याच्या जागेला ह्यांना अडीच रुपये भरायचो. आता लई महाग!

'–अहो मुंबईपेक्षा इथं राहणं केव्हाही चांगलं. तिथं हवा नाही. हमेशा उष्णता. खेडेगावात रहाणारं माणूस जितके दिवस टिकेल तितके दिवस मुंबईच्या हवेला टिकणार न्हाई. शेतीला पाण्याची सोय झाली तर धान्या माणसानं तिकडं मुंबईकडे अज्याबात फिरकू सुद्धीक न्हाई असं माझं सोताचं मत आहे.

'–पोटासाठी आम्ही तिकडे गेलो हे खरं; पण संसाराचा विस्कोट. इथं बायकु नुस्ती नवऱ्याच्या नावानं कपाळाला कुंकु लावून एकटी. बारा ह्यांन्यांनी एकदा नवऱ्याची गाठ पडणार–ते देखील दरवर्षी हमखास म्हणून निश्चित काय सांगता येत नाही. तसं पाहिलं तर नवरा असून बी बायको रंडकी असल्यासारखीच!

'मुंबईला बायकु न्यावी म्हटलं तर खोल्या न्हाईत. म्हजे आताची परिस्थिती सांगतो. आमच्या येळेला मुबलक खोल्या. म्हैन्याचं दोन रुपये टाकलं की मालक आपण होऊन पायजे ती खोली उघडून दावायचा. पसंत न्हाई पडली तर दुसरा मालक हाताला धरून

आपल्याकडच्या खोल्या दावायला न्यायचा– आपल्याला पसंत पडेल ती खोली घ्यावी– अशी सोय तवा-आता ह्ये शक्य न्हाई.

'मुंबईच्या सैतानचौकीत मी जवळजवळ बावीस वर्सं काढली; पण आताची सैतान-चौकी आन् तवाची ह्यात फरक हाये– तवा इतकी मानसं न्हवती. आता माणसं झोपली का त्यांच्यामधून मुंगीला बी जायला वाट सापडायची न्हाई–

'आवो– हा दुष्काळी इलाखा.पावसाच्या शेतीवर निभायचं न्हाई म्हणून माणसं गाव सोडून म्हुंबईला जायची धंद्यासाठी. आता ह्या लिफ्टाच्या योजना पुऱ्या झाल्या, शेतीला पाणी मिळालं की मग कोण न्हाणार मुंबईला? पटापटा सगळे परत येणार!

'आता आणखी इतिहास सांगायचा म्हटलं तर. ह्या इथं पांडेश्वर गाव हाये का न्हाई– त्याच्याजवळ रोमनवाडी हाय बघा– तर त्या रोमनवाडीचा झेंडेमास्तर...शिवराम झेंडे हा ह्या भागातला पहिला माणूस! मुंबईच्या मीलमधे कामाला– तिथच साच्या-वर शिकून मास्तर झाला –पंचवीस खात्यावरचा मास्तर होता शिवराम झेंडे– मग मास्तर आपल्या गावचा तर चला आपण बी जाऊ म्हणून तालुक्यातील समदी माणसं मुंबईला झेंडेमास्तरकडे, आन मास्तर देखील गावाकडच्या मानसांना हाताला धरून पद्धतशीर शिकवायचा. मास्तर न्हायला सैतानचौकीला म्हणून सगळी इकडची माणसं बी न्हायला तिथच– तवाधरनं–म्हंजी एकोणीसशेवीस सालापासून पुरंधरचं आणि सैतानचौकीचं नातं.

'ज्याचं बिऱ्हाड असल त्याची बाई खानावळ चालवायची. एक बाई तीस माणसं सकाळ–संध्याकाळ दोन टायमाला जेऊ घालायची. तीनतीनशे भाकऱ्या बडवायची सकाळसांच्याला. अजून देखील तसंच आहे. फरक म्हणजे स्वस्ताई आणि आताची म्हागाई काही बाया कटाळून गावाकडं निघून जायच्या काही जणी नवऱ्याकडं न्हाया मिळंतय म्हणून आशेनं थांबायच्या– ज्याचं जसं जमल तसं चालायचं.

'आता सगळंच कठीण झालंय. गाळचात सतरंजीची पट्टी टाकाया हजार-पाचशे पागडी, नोकरीला लावायचे दोन हजार–ते बी कायम नाही. बदली कामावर– खोलीमध्ये बिऱ्हाडाला स्वतंत्र कोपरा पायजे तर पाच हजार- स्वतंत्र खोली तर आता कुणाला परवडण्या-सारखी न्हाईच– असली जिंदगी. तरी देखील काहीजण मुंबईच्या नादानं जातातच. आमच्या वेळी काही फार मोठं स्वर्गाचं सुख नव्हतं– पन आताच्यासारखा नरकवास नक्कीच नव्हता– अहो, पाच आणे शेर मटण होतं– आज सोळा रुपये किलो– किलोभर मटण शिजवायची ताकद हाये का कुनाला आताच्या काळात ?'

'आताची सैतानचौकी ही काय आता मानसानी न्हायची जागा उरली नाही. अभिमानानं जगायची ती जागा न्हवं. पूर्वी एखादा जेव्हा ओळखीनं मुंबईत नोकरी लावून द्यायचा तेव्हा त्ये इकडच्या मानसावर खरोखरी उपकार व्हायाचे– परिस्थितीच तशी– पण आता वाटतंय की नोकऱ्या लावणारे दलाल लई पाप करतायत म्हणून. इकडच्या मोकळ्या हवेतून तरुण पोरं नादावून न्यायची आणि त्यांना सैतानचौकीत कोंडायचं हे पातक हाये; पण आपलं कोण ऐकतोय?

'आता काय झालंय नुसतं नोकरीचा नाद न्हाई तर शिनेमाचा पण हाये म्हणून मुंबई. तोंडाला लाली, स्नोपावडर, सोप आन् कपडे ह्याच्यासाठी मुंबई आणि तिकिटाला पाच-पाच रुपये खर्चून सिनेमे बघायचे. स्वच्छ हवा नाही, खायला धड नाही. पाव अन् मिसळभाजी–शरिराचं वाटोळं– अहो, कपड्यांची छानछोक शोभून तर दिसाया पायजे का नको? अहो, खोगीर घालायचं तर घोडं तेज पायजे. फ्याशनची कापडं करायची तर आतली बॉडी स्ट्राँग नको का?– कोंबडीच्या पायागत आताच्या पोरांची मनगटं. सुकलेल्या बोंबलागत हडकुळं शरीर. ती तसली कापड शोभून तर दिसाया नकोत का? काय खरं न्हाई-पूर्वीचं काही सुदीक न्हायलं न्हाई त्या मुंबईत!–'

camel
Water Colours
Poster Colours
Oil Pastels
Wax Crayons
Geometry Box
Camlin Unbreakable Pencils



CAMLIN PVT. LTD.
Art Material Division Bombay 400 059.

# आपणच येकट्यानी हे पानी कसं काय वापरायचं ?

सात फेब्रुवारी एकोणिसशेऐंशी. मुंबई. मुख्यमंत्र्याचा सह्याद्री बंगला. भव्य मीटिंगरूममध्ये भलंमोठं लंबगोलाकार टेबल. त्याच्याभोवती पन्नासाहून अधिक खुर्च्या. टेबलाच्या एका बाजूला श्री. शरदराव पवार, श्री. निहाल अहमद, श्री. गणपतराव देशमुख, श्री. एन. डी. पाटील आणि गोविंदराव आदिक असे मातब्बर मंत्रीलोक. त्यांना लागून त्यांच्यापेक्षा मातब्बर आणि मुरलेले वेगवेगळया खात्यांचे सचीव.

टेबलाच्या दुसऱ्या बाजूला, नेते आणि अधिकारीमंडळीच्या समोर विलासराव, कल्पनाताई, पोपटअण्णा, विठ्ठल, नाना पाटोळे आणि शंभर-सव्वाशे शेतकरी. माझी बायको सरोजा मीटिंगचे फोटो काढत टेबलाभोवती फिरत होती. नायगावचा तरुण पण अनुभवी कार्यकर्ता विठ्ठल होले समोरच्या मंडळीच्या डोळयाला डोळा देऊन म्हणत होता –

'तुमची सगळयांची नाव काय मला माहीत नाही. काही जणाचे मी पेपरात फोटो बघितले आहेत; पण आत्ता नक्की नावं लक्षात येत नाहीत— एक मात्र मला माहीत आहे. तुम्ही सगळे मोठे लोक आहात. निर्णय घेण्याचे अधिकार तुमच्यापाशी आहेत आणि म्हणूनच आम्ही दुष्काळी भागातील सर्व शेतकरी तुमच्यापाशी काही मागण्या मांडणार आहोत आणि तुम्ही त्यावर निर्णय द्याल अशी आम्ही आशा बाळगून आहोत.'

शरदराव पवारानी विठ्ठलला खूण करून थांबवला आणि ते म्हणाले, *'तुमच पहिलं म्हणणं मान्य आहे. आधी आम्ही सगळे* स्वत.ची नावं सांगून ओळख करून देतो– मग मीटिंग सुरू करू या!'

त्यानंतर प्रत्येक मंत्र्यानं आणि सचिवानं स्वतःचं संपूर्ण नाव आणि खातं सागितलं. जमलेली शेतकरी मंडळी गंमत वाटून हसली. वातावरणातला तणाव कमी झाला आणि चर्चेला सुरुवात झाली.

ह्या मीटिंगची पूर्वतयारी म्हणून मी आणि बायकोनं नायगावच्या परिसरात भटकून खूप फोटो काढले होते. त्याचे मोठे एनलार्जमेंटस् करून त्याद्वारा नायगावच्या प्रकल्पाचं स्वरूप, सरकारी अडचणी, सरकारी नियत्रणातून अयशस्वी झालेली नाझऱ्याची योजना वगैरे गोष्टी ह्या मंत्र्याच्या समोर– विशेषत: सचिवाच्या समोर-दृश्य स्वरूपात मांडण्याचा आमचा प्रयत्न होता. ह्या बडया लोकाना ग्रामीण भागात प्रत्यक्ष फिरून तेथील अडचणी समजावून घेण्याचा योग क्वचितच येतो. सर्वसामान्यपणे डांबरी सडकेच्या आसपासच्या खेडयातील धुळीचाच फक्त ह्यांच्या चरणकमलांना स्पर्श होतो. तो देखील निवडणुकीच्या वेळी आणि पायाभरणी, कोनशिला वगैरे समारंभासाठी. मंत्र्याची ही सवय ध्यानात घेऊन चतुर मंडळी बहुतेक विकासप्रकल्प हे राष्ट्रीय महामार्गाच्या आसपास उभे करतात. असे प्रकल्प पहायला जाणं सोयीचं असतं. महामार्गाच्या दुतर्फा शोभा देखील वाढते आणि जलद वेगानं मोटारीतून जाता जाता प्रगतीचं दर्शन घडू शकतं.

आता नायगाव हे आडवळणाचं गाव. राजुरी, पिलानवाडी, पाडेश्वर, कोथळे, रिसेपिसे किंवा हवेली तालुक्यातील बकोरी ही तर अतिशय अडचणीच्या जागेची गाव. जीप जाणं सुद्धा मुष्कील; मग इथे मंत्री किंवा शासकीय अधिकारी कसे काय येणार? म्हणूनच ह्या सर्व भागाचे फोटो काढून ते दाखवून ह्या बडया मंडळीना 'पाणी-पचायत' चं तत्त्व समजावून सागण्याचा आम्ही खटाटोप केला होता. प्रयत्न बऱ्याच अंशी सफल झाला. श्री. शरदराव पवारानी संपूर्ण चार तास– होय चार तास– लक्षपूर्वक चर्चा ऐकली. अनेक प्रश्न विचारले. त्यांच्या प्रश्नाना पुण्याचे जिल्हाधिकारी श्री. अजित निंबाळकर यानी अतिशय समर्पक आणि चपखल उत्तरं दिली. विशेष म्हणजे ह्या मीटिंगपूर्वी श्री. निंबाळकर संपूर्ण नायगाव-परिसराचा दौरा करून तेथील परिस्थितीचं अवलोकन करून आले होते. लोकाचे प्रश्न त्यानी अत्यंत प्रभावीपणे मंत्रिमंडळासमोर माडले. पाणी-पचायतच्या तीन महत्त्वाच्या मागण्या होत्या :

**१. माणशी अर्धा एकर ह्या समान वाटपाच्या तत्त्वाने पाणी मिळणार असेल तर अशा सामुदायिक योजनांना सध्या मिळत असलेल्या ५० % ऐवजी ८० % अनुदान द्यावे व ते सुलभतेने देण्याची पद्धत असावी.**

**२. या योजनांना लागणारी वीज महाराष्ट्र विद्युत-मंडळाने प्राधान्याने द्यावी व त्याकरता सध्या अस्तित्वात असलेले नियम या योजनेला बंधनकारक असू नयेत.**

**३. पाटाचे व उपसा-जलसिंचनाचे पाणीवापराचा खर्च एक होण्यासाठी विजेच्या दरात योग्य ती सूट द्यावी.**

ह्या सूचनांवर सहानुभूतीने विचार होईल असे आश्वासन शरदराव पवारांनी दिले. नायगावच्या परिसरात आखण्यात आलेल्या योजनाना चार लाख पंच्याऐंशी हजाराचा चेक त्यानी अनुदान म्हणून दिला आणि सभा संपली.

ह्या मीटिंगनतर अवघ्या आठवडयाभरात पुलोद सरकार विसर्जित झाले आणि महाराष्ट्रात राज्यपालाची राजवट सुरू झाली.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकाच्या वेळी नायगाव पाणी-पंचायतने आसपासच्या ग्रामीण भागातून आवाहन केले होते–' मतदान करा–जास्तीत जास्त मतदान करा–कुणालाही मत द्या–कुठल्याही पक्षाला किंवा व्यक्तीला मत द्या–पण मतदानाचा हक्क जरूर बजावा !' अशी विनंती पाणीपंचायतीचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन मतदारांना करीत होते. हे करण्यामागे एक विशिष्ट उद्देश होता. सरकारवर दबाव आणण्याचा एक मार्ग म्हणजे मतदानावर बहिष्कार. त्याऐवजी जास्तीत जास्त मतदान करून पाणीपंचायतचा विचार भावी सरकारपुढे माडण्याचा हा एक अभिनव प्रयोग होता राजुरी ह्या गावाने सत्तर टक्के मतदान केले तर बकोरी ह्या गावाने नव्वद

With Compliments from

# Reliance Textile Industries Limited

**Court House, Dhobi Talao**

**Bombay-400 002**

## VIMAL

**Suitings, Shirtings, Sarees & Dress Materials, India's Widest Range of Synthetic and Blended Fabrics**

Beautiful Collections in Qualities Like Terex, Triwol, Snowball, Supertex, Perkini, Veronica Etc.

*Manufacturers of :*

" TEXAFIT " a texturised bulk stabilised yarn in all Deniers, Single and Double

MILLS RETAIL SHOWROOMS

LINKERS
Linking Road,
KHAR
BOMBAY

LAFFANS
Veer Nariman Road,
FOUNTAIN
BOMBAY

**Office :**

*Phone* : 310002/5
*Cable* : " RELCOMCOP "
*Telex* : 11-2950 VMAL IN

**Mills :**

*Phone* : 82350
*Grams* : " VIMFAB "
*Telex* : 012 337

MILL : 103-106, INDUSTRIAL ESTATE,
NARODA P. O.
AHMEDABAD-382 330

टक्के इतके विक्रमी मतदान केले. उद्देश एकच. नव्या सरकारनं पाणीपंचायतीचे विचार समजावून घेण्याचा प्रयत्न करावा.

¤

बॅ. अबदुल रहमान अंतुले ह्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून नाव जाहीर झाले तेव्हा मी नायगावच्या परिसरात होतो.

रोजगार हमीच्या कामानं उन्हात रापलेल्या विशीच्या घरातला एक सुशिक्षित ग्रामीण तरुण तळमळीनं सागत होता–

' विलासराव साळुंख्या 'च्या ' पाणीपंचायत ' या मासिकावर एक चित्र आहे बघा तराजूचं. जड पारड्यात असकरी शेतकरी आणि हलक्या पारड्यात आम्ही सगळे दुष्काळी शेतकरी. नव्या मुख्य मंत्र्यानी ह्या चित्रातील माहिती समजावून घेतली पाहिजे. महाराष्ट्राला हे मुख्यमंत्री नवीन–*आम्हाला तरी त्याची ओळख नाही–* त्याच्याबद्दल काही माहिती नाही. त्यानीच आपली ओळख करून द्यायला पाहिजे–

' सपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर सर्वत्र ह्या तराजूसारखंच चित्र दिसेल. शहराची वाढ, कारखान्याची वाढ असंच नव्या सरकारचं धोरण असू नये. त्यानी पाणीपंचायतच्या कार्यक्रमाचा विचार करावा अस आम्हाला वाटतंय. खरं म्हणजे सगळ्या पक्षाच्या आमदारांना पाणीपचायतची योजना समजावून दिली पाहिजे. नुसतं नव्या मुख्यमंत्र्यांना हे समजावून देऊन भागणार नाही. त्याना पटून त्यानी धोरण आखलं तरी विरोधी पार्टी अडचणी निर्माण करणारच. विरोधी पार्टी म्हणजे सतत विरोधच करायचा असा ह्या राजकरणी लोकांचा शिरस्ता आहे. मग आपण कशाला विरोध करतोय ह्याच्याकडे कुणी लक्ष देणार नाही. कुटुबनियोजनाच्या कार्यक्रमाचं ह्या विरोधानच *वाटोळं केल.* शरदराव पवाराना पाणीपंचायतचा विचार तत्त्वत: पटला होता. आता ते विरोधी पक्षात असले तरी त्यांनी ह्या विचाराला पाठिंबा दिला पाहिजे असं आम्हाला वाटतं. त्याचप्रमाणे विरोधी पक्षाच्या शरदरावांचा पाठिंबा आहे म्हणून नव्या मुख्यमंत्र्यांनी अडचणी निर्माण करू नयेत अशी अपेक्षा आहे. अशी अपेक्षा धरण चूक आहे असं आम्हाला वाटत नाही. आता हवेलीमधील बकोरीच्या लोकांचच उदाहरण घ्या. मी तिथं जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती बघून आलोय. आमच्या इथल्यापेक्षा त्याची अवस्था वाईट आहे. मोठ्या आशेनं त्यानी नव्वद टक्के मतदान करून दाखवलं आहे. रोजगारहमीवर *जगणाऱ्या* बकोरीच्या शेतकऱ्यांनी पैपैसा-साठवून कष्टाच्या घामाचे पंचेचाळीस हजार रुपये लिफ्टसाठी जमवलेत. त्याचं लिफ्ट मोठं आहे; कठीण आहे; नव्या सरकारनं लक्ष दिलं पाहिजे. त्याच्या आशा धुळीला मिळविल्यानं काय साधणार आहे ? लोकाची परिस्थिती हलाखीची आहे. पाणीपंचायत ह्या त्यातून सुटण्याचा मार्ग आहे. तर आता ह्या नव्या–जुन्या राजकारणी मडळीनी नुसतं राजकारण खेळण्यात वेळ घालवू नये. राजकारणाला लोकं कंटाळली. तसंच मंत्रीलोकांनी आता उद्घाटनं, कोनशिला असल्या कार्यक्रमात वेळ खर्ची घालू नये. आम्ही आपल मनातलं स्पष्ट बोलून दाखवतोय.

छापायचं का नाही तुम्ही ठरवा. अहो, पाणीपचायत सारख्या गरिबाच्या कल्याणाच्या योजनावर विचार करण्यासाठी ह्यानी थोडा जरी टाइम खर्च केला तर लोक दुवा देतील–'

काय चूक आहे ह्या तरुणाचं म्हणणं ? त्याच्या अपेक्षा अवास्तव आहेत का ? ज्या गावकऱ्यांनी योजना–आखणीला आणि वीस टक्के पैसे गोळा करायला नुकतीच सुरुवात केली आहे त्यांच्यापैकी एकजण कोरड्या ओठावरून वारंवार जीभ फिरून सांगू लागला–

' अहो ह्ये सगळं आपण आपल्या मनाशी ठरवतोय; पण त्याना टाइम पायजे ना इकडे लक्ष द्यायला ! आपण अर्धपोटी राहून वीस टक्के भांडवल उभ केलं की सरकारन ऐंशी टक्के द्यायलाच पायजेत असा आग्रह धराया पायजे ! आपुन आग्रह धरल्याशिवाय त्ये ऐकनार न्हाईत. आत्ता ऐंशी टक्के देऊन भाडवलाची सोय करा आणि समान वाटप तत्त्वावर पाणी घ्यायला मोकळं करा. मग आम्ही तुमच्याकडे काही मागणार नाही. आम्हाला रस्ता नको, यसटी नको, शाळेची *इमारत नको, सगळं आमच आम्ही करू.* पायजेल तर *शाळेच्या* शिक्षणासाठी आमच्यावर टॅक्स बसवा; पण ऐंशी टक्क्यांची सोय करा !'

त्याच गावचा आणखी एक तरुण पोटतिडकीनं बोलू लागला–

' अहो, मुबईला मी अंधेरीला ऱ्हायला होतो. सांताक्रूझला हाळीपाटीचा धदा करायचो–म्हणजे डोक्यावर भाजीची पाटी घेऊन हाळी देत विकण्याचा धंदा. तिथं भाजी विकत असताना गावात लिफ्टची स्कीम निघाल्याची बातमी लागली. तेव्हापासून मी इकडंच हेलपाटलो–म्हंजे कायमचं परत आलो. आमची इथं सहा एकर जमीन आहे. आमी दोघा भावानी मिळून तीन एकर पाण्याचा वीस टक्के शेअर जमा केलाय. आता लिफ्ट झालं की इथं तरकारी करून मुंबईला ट्रक भरून धाडणार ! पण लिफ्ट मात्र दिवाळीच्या आत झाला पायजे, नाही तर कठीण ! मग पुन्हा मुबईला डोक्यावर पाटी घेऊन हाळी घालत भाजी विकायची पाळी येनार !'

¤

तर हे असं सगळं आहे. पाणीपंचायतला सरकारनं सहानुभूतीपूर्वक साह्राय्य केलं तर लाखो शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार आहे. सैतानचौकीतील चार-पाच हजार माणसं मुबई सोडून आपआपल्या गावी परतण्यासाठी जशी तयार आहेत तशीच शहरातील इतर वस्त्यामधील माणसं देखील आपआपल्या गावी परत येऊन उत्पादक शेतकरी बनण्याची फार मोठी शक्यता नायगावच्या प्रयोगानं दाखवून दिली आहे. हा प्रयोग मोठ्या प्रमाणावर यशस्वी करायचं मात्र


Phone : 696131

*With Best Compliments from:—*

**Fine Art Die Makers**

Manufacturers of ;

Nylon & Other Plastic Industrial Components
Also Plastic Nylon Dies and Plastic
House-Hold Articles

Patel Estate, Ishwarbhai Patel Road,
Goregaon ( East ) B O M B A Y – 400 063



**एक शेतकरी राजा...सोमा**

¤

सर्वस्वी सरकारच्या हाती आहे. खाजगी संस्था आणि कार्यकर्ते अशा प्रकारचा पथदर्शक प्रयोग छोट्या प्रमाणावर करू शकतात. त्याला जर सरकारी धोरणाची साथ मिळाली तरच व्यापक स्वरूप प्राप्त होऊ शकतं.

महाराष्ट्रामध्ये गेली दोन-अडीच वर्षे भटकत असताना मी ज्या अनेक ग्रामीण विकास योजना पाहिल्या त्यांपैकी नायगाव पाणी-पंचायतचं कार्य आणि तत्त्वप्रणाली मला स्वतःला मनोमन पटली आहे. माझा व्यवसाय विकासाला साहाय्य आणि पूरक माहिती गोळा करून प्रसार करण्याचा. ह्या अंकाद्वारे तो प्रयत्न मी केला आहे. त्यातून निश्चित काय निर्माण होईल हे मी सांगू शकत नाही.

जाता जाता शेवटी एका मनस्वी जिद्दी शेतकऱ्याची एक छोटी सत्यकथा सांगतो. त्याचं नाव आहे सोमा. सहा एकर जिराईत जमीन. वार्षिक उत्पन्न तीनशे-साडेतीनशे रुपये. मोठा संसार. त्याला पाच मुली आहेत. मी सोमाला पाहिला तेव्हा तो आपल्या शेतावर एका बाभळीखाली खोपीत राहायचा. दिवसभर कुठं ना कुठं रोजगार शोधत असायचा. दिवसभर काबाडकष्ट करून दोनतीन रुपये मोलमजुरी कमावून त्यावर संसाराचा गाडा रेटायचा.

पोटासाठी दिवसभर मेहनत करणारा हा सोमा रोज संध्याकाळी दोन तास आणि पहाटे दोन तास एक पहार, कुदळ, फावडं आणि घमेलं घेऊन एकटाच विहीर खणायचा. होय एकटाच आणि चौदा वर्षं सतत त्याचा हा उपक्रम चालू होता. तीस फूट बाय तीस फूट इतका खोल खड्डा त्यानं खणला होता. अजून पाणी लागत नव्हतं; पण सोमा खणतच होता. गावकरी त्याला वेडा सोमा म्हणायचे.

मागील वर्षी सोमाच्या परिसरात पाणीपंचायत-लिफ्टची योजना आखण्यात आली. सोमानं कर्ज काढून अडीच एकराला पाणी घेतलं.

पाणी मिळाल्यावर सोमानं काय केलं असेल हे पाहण्यासाठी मी त्याच्या गावी गेलो. ह्या कानापासून त्या कानापर्यंत हसत सोमानं स्वागत केलं. बांध ओलांडून त्याच्या शेतात पाय ठेवण्याअगोदर सोमानं मला ' चॅलेंज ' दिला. ' माझ्या शेतात कुठबी तणाचं एक पातं दावून दिलंत तर शंभर रुपये देतो. तसच बारकासा दगुड दाखवलात तरी शंभर रुपये देतो ! '

सोमानं पाणी येणार कळताच जमिनीची उत्तम मशागत केली होती. सगळे दगड वेचून उत्तम बांधबंदिस्ती केली होती.

मला वाटतं ही कथा मी सांगण्याऐवजी सोमाच्या भाषेतच सांगितलेली बरी. सुरुवातीपासून ऐका त्याची कहाणी–

' आता तुम्ही इचारता एकट्यानं हीर खणायचं तुझ्या डोक्यात कसं आलं ?–तर काय है–इथे माझं रान हाय त्याची खूप धूप होत व्हती–मग म्हटलं ह्यी धूप येळीच थांबवली पायजे–पण ह्याला टाकायला माल-म्हंजे माती कुठून आणायची–तवा ठरलं इतर कुठून माल आणण्यापक्षी इथंच खड्डा ध्यावा आणि त्यातून भर टाकून ताली बांधाव्या. खड्डा खणता खणता थोडासा नादावलो–म्हटलं असंच खणत ऱ्हाइलं तर एक दिवस इथंच पाणी प्यायची सोय हुईल. तालबी चांगली मजबूत हुईल आन् रानाची धूपबी थांबल.

' ताल पूर्ण झाली आन् पाऊसकाळाला खड्ड्याला पाणी लागलं. लांब पाणी आणाया जावं लागायचं ते इथल्या इथं झालं–आता ह्ये दिसतंय ते मी एकटा ओवरटायम पंधरा वर्सं खणलेलं–मजुरी संपली का संध्याकाळच्याला रोज दोन तास खणायचं, मजुरी नसल त्या दिवशी सकाळधरनं रात पडेस्तोवर खांदायचं. आता कधीमधी बायकु कावायची; पण कावायचं खरं तर काय कारनच ऱ्हाई तिला. मी खांदीत बसलो तर तिला कावायचं काय काम–मी काय येळ फुकाट घालवीत फिरत नव्हतो–ही व्हीर खांदायचा ह्यो ओवरटायम फुकटाचा जरी असला तरी एकदा ताल पक्की झाल्या-वर जमिनीत दोन पोती जुंधळे जास्त व्हनार–मग त्योच आपला पगार म्हनायचा.

' शेतकऱ्याला शेतातच पानी प्यायची सोय झाली पाहिजे. लई शेती नकोच आपल्याला. थोडीच शेती पन तिला बैजवार केली का थोडं भांडवल असलं तरी जमतं. आता माझं तर सगळंच बिनभांडवली काम. मेहनत ह्येच भांडवल. वाळकाला दुख नको, वेलाला दुख नको. वाळूक तोडलं तर वेल वाळतोय, वेल वाळला तर वाळुक सुकतंय–भांडवलाच्या नादानं कर्ज काढाया नको म्हंजे व्याज भरायचा प्रश्नच ऱ्हाई–

' आता लिफ्टासाठी काढलं कर्ज–काढावंच लागलं–पन् त्याची चिंता ऱ्हाई. आठ गुंठे कांदा केला. त्याचे नऊशे रुपये मिळाले. पहिला कर्जाचा हप्ता भरला, मग तीनशे रुपयाचा खोंड घेतला आन दोन झोपड्यावी बांधून झाल्या–एक झोपडी बारकी व्हती तिच्यात आम्ही सगळे अन् खोंड बसना–तवा इचार केला ही बारकी जर एकदम

मोडली आन् मोठी बी टायमात पुरी न्हाई झाली तर सगळ्यांनाच उघडं पडायची वेळ येणार–म्हणून बारकी तशीच ठेवून ही मोठी टप्प्या – टप्प्यानं बांधली – बायकुला पद्धतशीर घर झालं– आन् ह्ये आता माझं सोताचं हाय–सरकारी पैशाचं न्हाय !

'पाणीपुरवठा भक्कम असला तर पंधरा गुंठे कांदा सहज हुईल– पर आमचं लिप्ट हाये तलावाचं–त्येबी आठमाही पाण्याच आणि ह्या लिप्टाचं पाणी समद्यांना सारखं पोचायला पायजे – आपण जर म्हटलं मला एकट्यालाच दहा पांड लावायच तर मग इतरांनी काय करायचं–सगळ्यांना पाणी पुराया पायजे–पाणी अपुरं असलं तर त्या अंदाजानं पीक घ्यायला पायजे-आता सहा पाड कपाशी लावलीया त्यापेक्षा जास्त पाण्याचं गणितच बसंना–पर अदुगर इतकी वर्सं काहीच नव्हती तर आता सहा पांड कपाशी कमी झाली का ?

'शेतीचं सर्वांत महत्त्वाचं म्हंजे देखरेख–देखरेख चोख पायजे. घरच्या भाकरी शेतावरच यायला पायजेत. माझा मुक्काम तर सतत शेतीतच. आपली झोपडी, कुटुंब–त्यो खोड, त्याच्या आसपासच माझं काम चालू असतय–त्याच्या पलिकडं जायचंच न्हाई–मगच शेती पद्धतशीर व्हती. आता ह्या लिप्टामुळं कांदा तर झालाच-शंभर किलो हरभरा झाला, दोन पोती खपली म्हंजी गहू झालं–आन् ज्वारी तीन पोती निघाली – शिवाय एरंडी लावली. त्याच्या बिया इकून सत्तर रुपये मिळालं वर आणि जळणाला लाकूडफाटा – ह्ये पुष्कळ झालं.

'मशागतीला अजून माझ्याकडं बैल नाही एकदम व्याजानं हजार–दोनशेचा परवडणार न्हाई म्हणून तीनशेचा ह्यो खोंड घेतला. पुढच्या वर्षी हा हलक्या कामाला वापरता यील. तवाच आणखी एक खोड घ्यायचा म्हंजे त्यापुढच्या सिझनला आपली बैलजोडी तयार. मग आपण एकदम स्वतंत्र ! निम्मं कष्ट आपलं, निम्मं बैलाचं सगळी शेती बैजवार होणार !

'आनि दुसरं खरं सागायचं म्हनलं तर माझी बायको लई सहन करणारी. एक दिवस खायला कमी पडलं तर चुकून कुनापाशी वरडायची न्हाई. अर्ध्या पोटानं र्‍हाईल पर बोभाटा न्हाई ! झाला तर आमच्या नवरा–बायकोत; पन आपन नेह्मी गप! तिचं ऐकून घेणार. तिच्यामुळं तर ह्ये सगळं इतकं बघायला मिळालं–

'खरं तर मला शेतीची फार आवड. मला नोकरी नको, एक वेळेला पोटाला भाकरी नसली तरी चालल, कापडं नसली तरी चालल–थोडं कमी पिकलं तरी चालल–पर जे हाय ते शात ग्वॉड दिसलं पायजे. सगळं पद्धतशीर दिसलं पायजे. मग शेती उपाशी न्हाई ठेवीत कुणाला. शेतीची मला लई आवड ! मी बायकुला सांगून ठिवलंय, मी मेलो की मला हियंच शेतामंदी गाड ! मी राखण करत र्‍हाईन !'

सोमाची कथा ऐकता ऐकता विहिरीपाशी आलो. विहीर पाण्यानं तुडुब भरलेली पाहून आश्चर्य वाटून मी म्हणालो, 'सोमा, आता तू राजा होणार ! विहिरीवर इंजिन बसवलंस तर उरलेली शेती सुद्धा भिजवशील !'

माझ्याकडे चमत्कारिक नजरेनं पहात जोरजोरात मान हलवत


Always insist on–

# AMBIKA PRODUCTS

*Manufacturers of* :

**Polythene P. V. C. Tubing, Sheetings, Bags, Liners and all Packaging Materials, Bank Pass Book Covers, Plastic Folders, Files and All Kinds of Plastic Novelties**

**Bombay Office :**

30, Mili Co-op. Society, Opp. Shree Cinema,
MAHIM, BOMBAY - 400 016

¤ *Phone* : **453768** ¤

**Factory :**

Plot No. 414, At Post SHIRWAL
Dist. SATARA

¤ *Phone* : **42 ( Shirwal )** ¤

सोमा म्हणाला–

'अवो, असं कसं म्हणता तुम्ही ? ह्ये पाणी माझं न्हाई. मला खणून लागलेलं न्हाई हये पाणी. लिफ्टानं जमिनी भिजल्या त्याचा पाझर मी खणलेल्या खड्डयात उतरला. जवळपास कुठंच पानी न्हाई. समद्या वस्तीवरची मानस इथं पानी भरत्यात. जनावरांना बी हये पानी व्हतय. इंजिन कस काय बसवून आपनच एकटयानी हे पाणी वापरायचं ?'

असा हा विलक्षण सोमा ! जाता जाता त्याला शेवटचा प्रश्न विचारला,

'सोमा, मुबईला गेला होतास का नाही कधी ?'

हसत हसत सोमा म्हणाला,

'गेलो होतो एकदा पैशाची नड व्हती म्हणून पावन्याकडं मागायला. न्हायलो सैतानचौकीत. पाव्हणा म्हणाला, तुझ्यासारखा मानूस मुबईत दिवसाला तीस–तीस रुपय कमवल न्हा–म्हणून आग्रह करू लागला; मला पण वाटलं न्हावं इथंच. थोड पैस गाठीला मारावं आणि मगच जावं. मग एकदम शेतीची आठवण झाली. म्हनलं हया म्हुंबयचं काई खर न्हाई. पावन्याला सांगितल आम्ही जातो आमच्या गावा आन् जे मुबई सोडली ते थेट इथ शेतावर ! ☐


# पिंपरी चिंचवड नगरपालिका

पिंपरी, पुणे ४११ ०१८

**नव्या विकासयोजना हाच आमचा ध्यास**

**सर्वांगीण विकास हीच आमची आस**

आमची काही खास वैशिष्टये:--

१. टवटवीत पुष्पपर्णांनी पालिकेच्या सौंदर्यात भर घालणारा " उद्यान विभाग "

२. नव्या योजना आखून, नवे बदल घडवून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्नशील असलेला " शिक्षण विभाग "

३. विविध प्रकल्प यशस्वी करण्यासाठी कार्यरत असलेला " नियोजन व बांधकाम विभाग "

४. या उद्योगनगरीत रात्रंदिवस जनतेची ने-आण करण्यात कार्यरत असलेला " वाहन व्यवहार विभाग "

५. जनतेच्या आरोग्याची काळजी वाहणारा तत्पर " आरोग्य विभाग "

६. दलित व मागास वर्गीयांसाठी चाळीस टक्क्यांहून अधिक खर्चाची तरतूद.

७. भ्रष्टाचाररहित स्वच्छ व कार्यक्षम कारभाराबाबत प्रयत्नशील

पिंपरी चिंचवड नगरपालिकेचे नवनिर्वाचित सदस्य, सेवक व अधिकारीवर्ग या सर्वांच्या सहकार्याने आपली सेवा करण्यास आम्ही प्रतिज्ञाबद्ध आहोत !

| | |
|---|---|
| श्री. विनायकराव वाते<br>मुख्याधिकारी | डॉ. श्री. श्री. घारे<br>अध्यक्ष |
| श्री. स. शं. धावडे ( मास्तर )<br>उपाध्यक्ष व सभापती<br>पाणी पुरवठा समिती | श्री. प्रल्हाद वा. जाधव<br>सभापती<br>बांधकाम समिती |
| डॉ. घ. चां. चोबे<br>सभापती<br>आरोग्य समिती | श्री. धनराज टी. ओचानी<br>सभापती<br>विकास व नियोजन समिती |

श्री. नंदकुमार हजारे
सभापती, परिवहन समिती

# पाणीपंचायत



अहोरात्र परिश्रम घेऊन आतापर्यंत सोळा उपसा जलसिंचन योजना ('शेतकऱ्यांच्या भाषेत लिफ्टा !') साकार करणारी पाणी पंचायतीची त्रिमूर्ती – श्री. विठ्ठल होले, श्री. नाना पाटोळे, श्री. पोपटअण्णा खसे.

## □ गरीब शेतकरी बंधूंनो–

सुवर्णसंधीचा लाभ घ्या आणि छोटे बागाइतदार व्हा :

१ : बिनव्याजी भांडवल वापरून कर्जमुक्त व्हा !

२ : स्वतंत्रपणे लिफ्टची योजना करण्यास लागणारे भांडवल तुमच्याजवळ नाही अथवा घेतलेल्या कर्जाची परतफेड होत नाही अथवा पाण्याचा साठा जवळ नाही अशा अनेक कारणांनी बागाइती शेतीचे तुमचे स्वप्न दूर दूर जात आहे. ते साकार करण्याकरिता आमच्याशी संपर्क साधा ! भूमिहीनांनाही बागाइतदार करण्याची ही योजना आहे.

३ : गरीब शेतकऱ्यांना लवकरात लवकर फायदा व्हावा व त्यांना स्वतःच्या पायावरती उभे रहाता यावे, त्यांची पत सगळीकडे वाढावी याकरिता ही योजना आहे. आतापर्यंत सरकारच्या अनेक योजना तुमच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. काही योजना पोहोचल्या तर त्या तुमच्या हातात पूर्णपणे पडल्या नाहीत. पुढारी सतत आश्वासने देत असतात. सरकारी नोकर योजनांच्या वावड्या उडवीत असतात आणि दिवसेंदिवस तुम्ही हवालदिल होत असता ! अशा तुमच्या भांबावलेल्या परिस्थितीत 'पाणी–पंचायतीची योजना तुम्हांला दिलासा देईल का याचा विचार करा ! या अंकातील यशस्वी योजना वाचून तुमचे समाधान होईल; पण अशा योजना तुम्ही कशा घडवू शकाल ? याकरिता एकत्र येऊन कामास लागा ! अधिक माहितीकरिता आपल्यापैकी कोणाला लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचा छंद असेल त्याची नायगावला ताबडतोब रवानगी करा व नायगावच्या त्रिमूर्तींना भेटून ह्या झालेल्या योजना प्रत्यक्ष पहा व अशाच पद्धतीवर तुमच्याकडे कशी करता येईल याचा जिवाला ध्यास लावून घ्या.

४ : ह्या योजना सामुदायिक तत्त्वावरच असतील. पाण्याचे वाटप हे माणशी अर्धा एकर तत्त्वावर व घरातील माणसांच्या संख्येवर दिले जाईल. साधारण एकरी एक हजार ते बाराशे सर्वसाधारण खर्च येतो. यापैकी तुम्ही २० टक्के जमवायचे. सरकारतर्फे खर्चाच्या ५० टक्के भांडवली सूट मिळेल व बाकीचे ३० टक्के 'ग्रामगौरव प्रतिष्ठान'तर्फे पाच वर्षांच्या मुदतीने बिनव्याजी भांडवल म्हणून मिळेल.

५ : तुम्ही सामुदायिक विचार करायला लागलात व तुमच्यापैकी ज्याच्यावर तुमचा संपूर्ण विश्वास असेल त्याला घेऊन नायगावला या. यापुढे आमचे संघटक आणि तांत्रिक सहाय्यक ती योजना तपासून पाहतील. योजनेचे प्लॅन-एस्टिमेट बनवतील, सरकारी सूट मिळण्याकरता तुम्हाला योग्य ती माहिती जमविण्यास सांगतील.

## Attention Entrepreneurs !

Do you know that

**The Development Corporation of Konkan**

can assist you to set up your industrial enterprise ?

We offer :

(a) **Infrastructure**
Infrastructural facilities under MSFC+MIDC +DCKL scheme including plots, sheds and financial assistance for purchase thereof.

(b) **Employment Promotion Programme.**
10% seed capital for projects costing **over Rs. 1 lakh.** 15% seed capital for projects costing **below Rs. 1 lakh. 20% seed capital for projects less than Rs. 1 Lakh if enterpreneurs's family income is below Rs. 4,800/- per annum.**
In the case of schedule caste/schedule tribe and nomadic tribe 20% seed capital for projects below Rs. 1 lakh; 22½% seed capital if family income is below Rs. 4,800/- per annum.

(c) Participation in equity/cumulative redeemable preference shares on selective basis for entrepreneurs going to underdeveloped areas of Konkan.

(d) Package of Incentives for eligible small scale industries in industrial estates/areas in Kulaba and Thane districts.

**Enquire with :**

The Development Corporation of Konkan Ltd,
Warden House, 5th floor, Sir P. M. Road.
**Bombay-400 001.**

The Development Corporation of Konkan Ltd.
Bhoir's House, Opp.. Govt. Rest House,
Dr. Ambedkar Road, Pen, Dist. Kulaba.

**District Industries Centre, Kulaba**
Athavale Building,
Opp. Kanya Shala, Alibag.

**District Industries Centre, Ratnagiri**
2986, M. G. Road,
Near Gogte College, Ratnagiri.

**District Industries Centre, Thane.**
Shree Vaishnav Mandir Trust Building,
Jambhali Naka, Kharkar Ali, Thane.

**BRANCH OFFICE :**

The Development Corpo. of Konkan Ltd.
2510 Old Tambat Ali,
**Ratnagiri.**

The Development Corpn. of Konkan Ltd.
Suryawamshi Sadan, Navpada Road,
**Thane.**


बऱ्याच वेळेला काही खातेदाराची खातेफोड करण्याची आवश्यकता असते. त्याबाबतही आम्ही व्यवस्था करू. सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्याची योग्य ती माणसे आमच्याकडे जमली आहेत. आम्ही तुमचीच वाट पहात आहोत. तुमच्यापैकी एकाची योजनेचा सूत्रधार म्हणून निवड होईल व तो उत्साही असेल तर तीन महिन्यात तुमची योजना पूर्ण होईल.

६ : सामुदायिक लिफ्टयोजना उभ्या राहिल्या तर फारच थोड्या चांगल्या चालू रहातात असा लोकांचा समज आहे पुढाऱ्याचाही आहे व आर्थिक सहाय्य देणाऱ्या बँकांचाही आहे. अनुभवाने हे बऱ्याच ठिकाणी घडले आहे त्यात स्थानिक हेवेदावे, गुडगिरीचे राजकारण, अपुरे अर्थसहाय्य, तान्त्रिक चुका, नोकरशाहीची बेफिकिरी इत्यादि अनेक गोष्टीची गुतागुत आढळून येते. या गोष्टी लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करण्याचे सामाजिक, तान्त्रिक आर्थिक व व्यवस्थापकीय शास्त्र आम्ही साध्य केले आहे आणि तुमची लिफ्टयोजना यशस्वी झाली की, पाणीपंचायतीतर्फे आपणाला राजकीय शास्त्र्यांची बाजू मांडायची आहे आणि तुमच्यासारख्या अनेकावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडायची आहे.

७ : पाझरतलावाच्या खाली अथवा ओढ्यावर बंधारा घालून अथवा नदीच्या पात्रात अथवा धरणाच्या वरच्या बाजूला किंवा कॅनॉलच्या उंचाईवर आपल्या डोळ्यांसमोर आणि डोळ्यात *ज्या योग्य जागा असतील त्या सुचवा ! त्यातून कसा मार्ग काढा*यचा हे तुमच्यापैकीच यशस्वी झालेले तुमचे शेतकरीमित्र सुचवतील.

निराश जीवन जगण्यापेक्षा संघटित होऊन विकासाचा मार्ग शोधा. नायगावच्या सोमाचे स्वावलंबन, स्वधर्म व सहकार्य आणि जीवननिष्ठा आपण सर्वांनी बाळगली तर दारिद्र्याच्या संकटावर मात करण्यास फार वेळ लागणार नाही ! ◻

## ◻ पाणपंचायतीच्या सभासदत्वाची शपथ

*नायगाव येथील काही शेतकऱ्यानी संघटित होऊन उपसा–जल*सिंचन योजना यशस्वी रीतीने उभारून दोन ऑक्टोबरला 'पाणी–पंचायती'च्या उद्घाटनप्रसंगी घेतलेली ही दोनशे सभासदांची सामुदायिक शपथ आहे.

१ : महाराष्ट्राची गेल्या वीस वर्षांतील शेतीतील प्रगती ही अभिमानस्पद आहे; पण दुर्दैवाने ह्या प्रगतीचा लाभ फारच थोड्या लोकाना झाला आणि माझ्यासारखे महाराष्ट्रात रहाणारे असंख्य जिराईत शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, छोटे शेतकरी या प्रगत सुधारित शेतीचा फायदा घेऊ शकले नाहीत. त्यामुळे दिवसेंदिवस आम्ही दारिद्र्याच्या खाईत लोटले जात आहोत. ज्या लोकांनी शेतीत प्रगती केली, त्याच्या प्रगतीचा आढावा घेतला तर प्रामुख्याने एक गोष्ट स्पष्ट होते की, या सर्वांना सरकारने मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध करून दिले व त्या पाण्याचा भांडवली बोजा सरकारने स्वीकारला व अल्पदरात भरपूर पाणीपुरवठा केला.

२ : सुधारित शेती करण्याची संधी आम्हाला मिळाली तर आमच्यासारखे छोटे शेतकरी राष्ट्रीय उत्पादनात भर घालतील,

आम्हाला पुरेसा रोजगार आमच्या शेतात मिळेल व उद्योगवाढीला खरी चालना मिळेल आणि आमच्यावर आलेल्या दारिद्रयाचे संकट हटू शकेल; पण याकरिता आमच्या शेतीला प्रथम आवश्यकता आहे ती थोडयांशा पाण्याची आणि ही पाण्याची तहान भागवण्याकरिता आम्ही जागृत झालो आहोत. आमचा लढा आमच्यापेक्षा जे मोठ बागाइतदार आहेत त्यांच्याशी नसून, सरकारने उपलब्ध केलेले आजवरचे पाण्याचे साठे व यापुढे होणारे पाण्याचे साठे या सर्वांचे समप्रमाणात, रेशनिंग पद्धतीने सर्वांना घरातील माणसाच्या प्रमाणात देण्यास भाग पाडण्याकरिता आहे व यासाठी मी 'पाणी–पंचायती'च्या सभासदत्वाचा स्वीकार करीत आहे व त्याकरिता पाणीपंचायतीने वेळोवेळी केलेल्या नियमाचे पालन मी निष्ठेने करीन.

३ : ज्या तांत्रिक पद्धतीने पाण्याची साठवण व वाटप केले जाते ती पद्धतच विषमतेला कारणीभूत आहे. प्रवाही पद्धतीने पाणी देण्याचे समर्थन, हे उपसा–सिंचनपद्धतीशी तुलना करताना प्रवाही पद्धतीत कमी भाडवल लागते, म्हणून ती स्वीकारली जाते असे आहे; परंतु यामुळे ८० टक्के ग्रामीण जनता पाण्यापासून वंचित राहिल. निसर्गाची अवकृपा, आर्थिक दारिद्रय, खचत असलेले मनोधैर्य यामुळे शेतीचे उत्पन्न दिवसेंदिवस घटत चालले आहे.

कोटयवधी रुपयांचे नुकसान आम्ही गरीब शेतकरी सहन करीत आहोत. आमच्या जीवनमरणाचा प्रश्न आमच्यापुढे सतत उभा आहे. अशा वेळी सरकारच्या नियोजनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याशिवाय आम्हाला मार्ग दिसत नाही- त्याकरिता पाणीपंचायत ही एक राष्ट्रीय प्रणाली आहे व ही प्रणाली प्रत्यक्षात येण्यास संघर्षाचा मार्ग स्वीकारावा लागला तरी त्यांत मी मागे रहाणार नाही.

४) गाव हे घटक धरून पाण्याचे नियोजन व वाटप, पाणी–पंचायततर्फे करण्याचा हा 'लोककार्यक्रम' आहे. गावातील भूमीहीनांनाही ह्या पाण्यावर अधिकार ठेवता येईल. खेडयात रहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सुधारित पद्धतीने व आजच्या किंमतीने रु. सहा हजार इतके शेतीचे उत्पन्न येण्याकरिता साधारण पाच माणसांच्या कुटुंबाला अडीच एकर अथवा माणशी अर्धा एकर जमीन लागते. एवढी जमीन व त्याला लागणारे पाणी उपलब्ध करून देण्याच्या पाणीपंचायतीच्या योजना मी स्वीकारण्याचे मान्य करतो. ही सामाजिक व आर्थिक घडवणूक माझ्या खेडयात होत असताना जर माझ्या जमिनीचा काही भाग खंडाने पाणीपंचायतीला द्यावा लागला तर तो आदेश मी मान्य करेन.

५) माझ्या मालकीच्या शेतात उपलब्ध होणारे पाणी त्याचप्रमाणे सरकारच्या छोटया-मोठया योजनाद्वारे उपलब्ध होणारे पाणी हे सर्व पाणी राष्ट्रीय संपत्ती आहे, ह्या मताशी मी सहमत आहे व त्याचे वाटप करण्याचे पूर्ण अधिकार पाणी–पंचायतीला आहेत हे मला मान्य आहे. पाण्याच्या उपलब्धतेवर कोणती पीके घ्यावीत याचे पाणी–पंचायतीने केलेले नियमन मला मान्य आहे.

६) रोजगारहमी व इतर योजनाद्वारे गावात सतत आणखी कित्येक वर्षे पाण्याच्या योजनेवरती काम उपलब्ध होणे शक्य आहे; पण ज्या पद्धतीने सरकार नियोजन करीत आहे त्यात बदल घडविणे आवश्यक आहे. होणाऱ्या सर्व कामाची आखणी सरकारने करून द्यावी व त्याची अंमलबजावणी पाणीपंचायतीमार्फत व्हावी


# THE RUBY MILLS LIMITED

**Lady Jamshedji Road,**
**Dadar – Bombay 400 028**

Phone : 45 42 26 — Telex : 011 - 3328


**Manufacturers of :**

**Tery cot Suitings and Shirtings**
**Combed long cloth and wash and Wear coatings :**

Sales Dept :

**The Ruby Mills Limited**
Dharmaraj Galli,
M. J. Market,
BOMBAY, 400002

Phone : 31 01 80



हंसः श्वेतो बकः श्वेतः को भेदो बकहंसयोः ।
नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बकः ॥
हंस पांढरा आणि बगळाही पांढरा. मग बगळा आणि हंस यांत फरक तो काय ? पण दूध आणि पाणी निरनिराळे करण्याच्या वेळी मात्र हंस हा हंस ठरतो व बगळा बगळाच ठरतो.
वरील सुभाषित 'महाराष्ट्र टाइम्स'च्या बाबतीत तंतोतंत प्रत्ययास येते. वृत्तपत्रांच्या सध्याच्या गजबजाटात, सर्व थरांतील आपल्या सुजाण वाचकांना नेमके काय हवे ते आकर्षकरीत्या कसे द्यायचे ही किमया फक्त 'महाराष्ट्र टाइम्स'च करू शकतो.
उत्तरोत्तर वर्धिष्णू होत जाणारे दैनिक
महाराष्ट्र टाइम्स

तरच तो खरा 'लोककार्यक्रम' होईल व त्याकरिता मी उत्साहाने त्यात सहभागी होईन.

७) आजचे नियोजन हे वरून लादले जात आहे. यामुळे आमचे दारिद्र्य हटत नाही. त्याऐवजी उपलब्ध असणारी जमीन, मनुष्यबळ, पाणी यावर नियोजन करून त्याचा चागला उपयोग करण्यास सरकारने भाडवली गुतवणूक करावी व आम्हाला पाहिजे तेव्हढे तात्रिक मार्गदर्शन करावे, ह्या पाणीपंचायतीच्या विचाराशी मी सहमत आहे. सरकारने भाडवली गुतवणूक केल्यानंतर त्याचा योग्य वापर समप्रमाणात व्हावा व त्याची देखभाल व्हावी यासाठी आम्ही कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत व हे होणे अशक्य नाही, यावर माझा विश्वास आहे व त्या दृष्टीने मी पाणीपंचायतीला सहाय्य करीन ◻

९) आजची नोकरशाही ही ग्रामीण जीवनापासून विभक्त झाली आहे. दिवसेंदिवस तिच्याकडे आर्थिक केन्द्रीकरण वाढत आहे. व्यवस्थापनाच्या अनुभवांच्या अभावामुळे योजनाचा खर्च नोकरशाहीची तैनात राबविण्यात वाया जात आहे. पूर्वनियोजन, त्याची कार्यवाही, नियंत्रण व सामाजिक मूल्यमापन व या सर्वांचे प्रबंधन ह्याच्या अभावामुळे कोटयवधी रुपयाची गुतवणूकही वाया जात आहे ह्याची अनेक उदाहरणे रोजगार हमी योजना, पाटबंधाऱ्याचे नियोजन अशी व इतर कार्यक्रमातून ठळकपणे दाखविता येतील.

१०) नको आहे त्याचा प्रतिकार करणे व लोकांना पाहिजे आहे त्याचा स्वीकार करावयास लावणे याकरिता लोकशिक्षण, लोकजागृती, लोककल्याणाचे कार्यक्रम व पर्यायी लोकराज्याची स्थापना व्हावी या उदात्त ध्येयाने 'पाणीपंचायत' ही खऱ्या अर्थाने लोककार्यक्रमाची सुरुवात आहे ◻

## ◻ पाणीपंचायतीचे कार्यक्रम

१) चार कोटी ग्रामीण जनतेला न्याय्य पद्धतीने पाण्याचा साठा (पांढरे सोने) मिळवून देऊन त्यांची उत्पादकता वाढविण्याकरिता सरकारला व्यवहार्य नियोजन करण्यास भाग पाडणे.

२) पाण्याचे रेशनिंग पण त्याचबरोबर वर्षभर पाण्याचा पुरवठा मिळण्याच्या सोयी उपलब्ध करणे व त्याचे वाटप व नियोजन गावपातळीवर पाणीपंचायतमार्फत करणे.

३) मोठ्या प्रमाणात उपसा जलसिंचन योजनेची प्रवाही सिंचनाशी जोड.

४) तालुकापातळीवरती पाण्याच्या उपलब्धतेवरती पिकांची निवड व त्याचे क्षेत्र मर्यादित करणे.

५) लहानमोठे सिंचनाचे प्रकल्प सामाजिक दृष्टीने पण व्यापारी नियमाने चालवण्याचे व्यवस्थापकीय कौशल्य लोकाच्यात निर्माण करणे.

६) ज्याना सरकारी पाणी उपलब्ध झाले नाही अशा ८० टक्के ग्रामीण जनतेची खिळखिळी झालेली अर्थव्यवस्था लक्षात घेऊन उपसाजलसिंचनाची भांडवली जबाबदारी सरकारी खर्चातून करून घेऊन, न वापरले जाणारे मनुष्यबळ उद्योगाला लावून, मनुष्यबळाचे रूपातर औद्योगिक वाढीला लागणाऱ्या भाडवलासाठी आयोजित करणें.

७) वरील उद्दिष्टे साध्य करण्याकरिता सरकारला सर्व पाण्याचे राष्ट्रीयीकरण करण्यास भाग पाडणे व ह्या पाण्यावरती खेड्यात रहाणाऱ्या सर्व जनतेचा हक्क सम प्रमाणात प्रस्थापित करणे. भूमिहीनाचाही ह्या पाण्यावर अधिकार राहील, तरच आर्थिक व सामाजिक पुनर्रचना आपणाला खेड्यात घडवून आणता येईल.

८) आजचे सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी (अपवाद वगळता) हे शहरी जीवनाचे संघटित वर्गाचे व भांडवली अर्थप्रधान अर्थव्यवस्थेचे समर्थक आहेत. गाजल्या जाणाऱ्या ८० टक्के ग्रामीण जनतेच्या, दुर्बल शेतकऱ्यांचे व शेतमजुराचे खोटे प्रतिनिधित्व उधळण्याचा व वेळ पडल्यास त्यासाठी संघर्षाचा मार्गही अवलंबणे आवश्यक आहे.

## ◻ नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण

१. नुसती रोजगार हमी योजना ही फसवणूक आहे.
२. पाण्याच्या हमीकरता रोजगार हमी योजना राबवा.
३. पाटाचे पाणी आणि लिफ्टचे पाणी सारख्या दरात द्या.
४. आठमाही सामुदायिक लिफ्ट योजनेलाच अधिक सवलती द्या.
५. कोरडवाहू शेतकऱ्यांना नुसती कोरडी आश्वासने देऊ नका.
६. जर पाण्याची मालकी सरकारची आहे तर तिचे वाटप समतेने झाले पाहिजे.
७. भूमिहीनाचाही पाण्यावरती समान हक्क आहे.
८. प्रत्येक कुटुंबाला अडीच एकर जमीन व त्या शेतीला लागणारे पाणी सरकारने उपलब्ध करून दिले पाहिजे.
९. गावपातळीवर पाण्याच्या योजना राबवा.
१०. पाण्याच्या वाटपात लोकांना सहभागी करा.
११. लोकांच्या सहकार्याने सहकारी योजना आखा.

**काय करुं आता धरूनिया भीड ।**
**निःशंक हे तोंड वाजविले ।।**
**नव्हे जगी कोणी मुकियाचा जाण ।**
**सार्थक लाजोनी नव्हे हित ।।**
**आले हे उत्तर बोलो स्वामीसवे ।**
**धीट नीट जीते होऊनिया ।।**

—तुकाराम

# आपले प्राप्तीकर विवरणपत्रक दाखल करण्याची आठवण ठेवा !

प्राप्तीकर आणि संपत्तीकर विवरणपत्रके दाखल करण्याची अखेरची तारीख ३० जून होती.

तरी पण, जर आपण अशा एखाद्या धंद्यांत अथवा व्यवसायात असाल, ज्यात प्राप्तीच्या दृष्टीने आपले आर्थिक वर्ष २९ फेब्रुवारी १९८० नतर सपत असेल, तर आपण आपली विवरणपत्रके ३० जूननतर पण आपले आर्थिक वर्ष सपल्या दिवसापासून ४ महिन्याचे आत दाखल करू शकता.

मग अखेरच्या तारखेची वाट पाहायची कशाला ?

आताच ती दाखल करा आणि मोकळे व्हा.

* आपल्या गटास योग्य असेच विवरणपत्रक वापरा आणि ते पत्रक सर्व माहितीसह संपूर्ण भरा.

  ही विवरण पत्रके प्राप्तीकर अधिकारी किंवा प्राप्तीकर आयुक्तांच्या कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी यांचेकडून मोफत मिळतील.

  प्राप्तीकर विवरणपत्रके क्रमांक २ आणि ३ काही निवडक टपालकचेऱ्यांत प्रत्येकी २५ पैशास मिळतात.

* विवरणपत्रक दाखल करण्यापूर्वी, आपल्या पत्रकाप्रमाणे स्वयं आकारणी कर जमा करण्याची आठवण ठेवा.

## — योग्य कर भरा – राष्ट्राला बलवान करा —

निवेदक

**डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन,**
**( रिसर्च, स्टॅटिस्टिक्स अँड पब्लिकेशन )**
इन्कमटॅक्स डिपार्टमेन्ट,
नवी दिल्ली ११० ००१

davp 80/85 (Marathi)

# ऋतुचक्र, एक असेही

## उत्तम मख्दूमहुसेन जागिरदार

२५ भीमवाडा, सांताक्रूझ
मुंबई.

थांब थांब परतू नको
रे घना कृपाळा
अजूनि जाळतोचि जगा
तीव्र हा उन्हाळा....

पोरं एका सुरात किंचाळताहेत. शाळा सुटायला अजून अवकाश आहे, शाळा तरी काय कोंडवाडा झालाय. मेंढरांसारखं कळप करून बसताहेत पोरं. घामाच्या धारा *लागल्या आहेत साऱ्याच्या अंगातून.*

घण्ण...ण्...ण्...ण्ण्ण्...

रस्ता भाजून निघालाय. डांबर रटरटतंय छत्री आता काढायलाच हवी.

तरी शाळेपेक्षा घरी बरं वाटतं. नुसत्या टॉवेलवर उघडंबंब अंगणात बाजेवर अंग टाकलं की कसं छान वाटतं! आता वस्ती तरी काय गच्च झालेय! पूर्वी कसं विरळ, भरपूर मैदान असायचं. आता गल्ल्यांतूनही लोक खाटा टाकून राहिलेत.

कशी बघता बघता वस्ती फुगत चालली. झोपडीला बिलगून झोपडी उभी राहिली. रतिक्लांत युग्मासारख्या श्रांत! अवघ्या *दहा-पंधरा वर्षांतच केवढी गजबज झाली.* इथं आमच्या तीन पिढ्या झाल्या. आजोबा खेड्यातनं आले; त्यांनी झोपडी बांधली तेव्हा तुरळक तुरळक झोपड्या उभ्या होत्या. आजूबाजूला इकडं तिकडं सारीकडं हिरवं गवत, खाचरं आणि तळी होती. इंग्रज गेले तेव्हा थोडंसं बाळसं धरलं होतं वस्तीनं. आजूबाजूला कारखानेही यायला लागले होते. ह्या दहा वर्षांतच माणसं मुंग्यांसारखी जमत चालली. आता तर७०।८०वर्षं होत आलीत इथं. झोपड्या वाढल्या, माणसं वाढली आणि कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे नालेही वाढले.

घरानं आढ्यातच बैठक मारलीय. दुरुस्तीला काढलं पाहिजे. नगरपालिकेचा परवाना मिळणं तसं कठीण आहे; पण पाहू. आजोबा, वडील तर संपलेच. आमचाही ह्याच आढ्याखाली जन्म झाला खोलीच्या आतच बाळपण संपलं. एका कोपऱ्यात *जवानी कटली. आता पडवीत म्हातारपण* थकत चाललंय. पुरी उमर ह्या वाकलेल्या अंधाऱ्या खोलीत बर्बाद झाली.

हळूहळू तबेलेही वाढीस लागले. आता तर ते साऱ्या वस्तीचेच दादा होऊन राहिलेत. हजारदा नगरपालिकेकडे तक्रारीही करून झाल्या. घरोब्याच्या रीतीने बोलणंही झालं. पण ज्याच्या हातात दांडा त्याचाच शब्द खरा. आता जागोजागी शेणक्या साचून राहिल्यात. रस्त्यावर गाईबैलाचे कळप जमून रहातात. रस्ते तर वासरं बांधण्यासाठीच असतात जणू. शाळेच्या मैदानातही शेणामुताची घाण साचून राहिलेली असते.

आता खाचराचे प्लॉट्स पडलेत. तळीही बुजवताहेत.*काही ठिकाणी काम चालू आहे तर* काही ठिकाणी कॉलनीज उठल्यात. डांबराचे रस्ते होऊ लागलेत. दिवे आलेत. डॉक्टर आलेत, दुकानं, मार्केट, थिएटर...बसही *जवळ आहे. ट्रेनलाही काही फार काळ* चालावं लागत नाही.

आजूबाजूला भराभर नवं अपूप घडतय. *वस्ती मात्र सारखी बसत चाललीय. कॉल*नीच्या रस्त्यांवर दिवे भकाकत राहिले तरी वस्ती मात्र अंधारातच बुडालेली असते. तबेल्यातून वीजेचा थोडासा प्रकाश येत रहातो तेवढाच.

पूर्वीसारखी आता वस्तीही शांत राहिलेली नाही. पूर्वी आयुष्य कसं सुस्त अजगरासारखं वेढा घालून बसणारं असायचं. आता सारंच गतिमान झालंय. भन्नाट.

पाच वर्षांमागे एकदा इलेक्शनचा तमाशा येतो. काही दिवसांची धुलवड असते. दारादारातन *खेळचे आणि नाचे घुमत रहातात.* उमेदीच्या पोरांना बरा तजेला येतो. गल्लीगल्लीतनं मीटिंग्ज होतात. लाइट आणू, नळ आणू, सिमेंटची गटारं होतील, दारावरून *खडीचे रस्ते जातील. वस्ती सुधारेल की!* काय काय पाहिजे? बख्खळ!

कॉलनीज उभ्या राहिल्याने आता फारच *गैरसोय होतेय. पूर्वी खाचरात तट्टीला बसता* यायचं. आता लघवीचीही चोरी झालेय. तरी रस्त्यांवर अजून लोक बसतातच. अजून इमारतीचे काम चालू आहे. त्यांच्या प्लॉटमध्ये *जावंच लागत. एवढ्या वस्तीला संडास आहेत* कुठे पुरेसे! कधी पोलिसांची धाडही येते. पकडतात काहींना. हातात टिणपाट देऊन रस्त्यावरून धिंड काढत ठाण्यावर नेतात. लोक तरी काय करतील? सकाळी कामाला जायची गडबड असते. तास तास रांगेत कसं उभं रहाणार? पोलिस पकडतात, लोक पुन्हा बसतातच. कॉलनीवालेही सारख्या तक्रारी करताहेतच.

कधीकधी संडासही पार तुंबून जातात. पाय ठेवण्यापुरती जरी जागा असली तरी नाक मुठीत घेऊन बसता येतं. हप्ता हप्ता म्युनिसिपालिटीचे लोक फिरकतही नाहीत.

# महाराष्ट्र प्रगतीपथावर...
# ...वीस वर्षांच्या विकासाची वाटचाल.



| १९६० | | १९८० |
|---|---|---|
| ५५ लाख टन | अन्नधान्योत्पादन | १०५ लाख टन |
| ११.७१.४०० हेक्टर | ओलिताखालील क्षेत्र | १७,६९,००० हेक्टर |
| ५२२ गावांचे विद्युतीकरण | विद्युतीकरण | २४५४४ गावांचे विद्युतीकरण |
| ५,४२० विजेवर चालणारे पंप | विद्युतीकरण | ५,६८,१९२ विजेवर चालणारे पंप |
| ७७० मेगॅवॅट | वीज निर्मिती | ३,१०६ मेगॅवॅट |
| ३७,३५० | शैक्षणिक संस्था | ५७,४६६ |
| २८९७३ | सहकारी संस्था | ५५२३० |
| ३७,७५७ कि.मी. | रस्ते | ९४,१४६ कि.मी. |
| २४,४४० | शासकीय रुग्णालयातील खाटांची संख्या | ७३,४१५ |
| ९४६ | मोठे व मध्यम उद्योगधंदे | १.६७५ (१९७८) |
| ४,८६० | लघु उद्योग | ४७,९३१ (१९७८) |

K.CHANPU

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई क्र. ४०००३२.

पुरुषांचं एक ठीक आहे. मार्केट वा स्टेशनवर रांग तरी लावता येते. बायकांचे खूप हाल होतात.

आता मात्र कहरच झालाय्. सहन करायलाही एक हद्द असते.

कालच सडासावर आंघोळ करणाऱ्या काहींना पोलिसांनी उचललं.

कॉलनीवाल्याची तक्रार आहे. आंघोळी करणाऱ्या पुरुषाची उघडी शरीरे पाहून त्यांच्या स्त्रियाना लाज वाटते म्हणे. संडासावर कपडे धुण्याची तर यापूर्वीच बंदी झालेय. काहींचे कपडे आणि भांडीही गेली. पाणी साठवायला भांडीकुंडी लोकांकडे असतातच कुठे? सडासाभोवती तर ह्यापूर्वीच एक मोठी भिंत बांधलेय्. कॉलनीवाल्यांना आमचे पार्श्वभाग दिसतात ना! येतात कशाला साले बाल्कनीत? लाज वाटते तर डोळे मिटून घ्यायचे. स्वस्थपणे जगणही मुश्किल झालंय्.

वस्तीचं एक सास्कृतिक जीवनही आहे. पार्टी आहेत तसेच गटही आहेत. छोटी-मोठी मंडळं आहेत तशाच चिल्लर संस्था आहेत. भाडणे आहेत तसं सहकार्यही आहे. शिवजयंती, आंबेडकरजयंती, सत्यनारायण, रोजरी, रमजान उत्साहानं साजरं होत असत. उत्सवाचा तमाशा संपला की अहवालाचं कवित्वही बाकी असतंच!

आता वस्तीत पुन्हा चैतन्य रसरसतंय. सारी मंडळं, संस्था एकत्रित आल्यात. दहा हजारांच्या वस्तीचे प्राण आता घशात आल्यासारखं झालंय, झोपडला तोडण्याची नोटिसं मिळालीत. मालकाला त्याची जागा नगरपालिकेला खाली करून द्यायचीय. कुठं जायचं आता? ह्या खंडप्राय देशाच्या पाठीवर सुईच्या अग्राइतकीही जमीन नाय्येय का आमच्यासाठी?

भाडेकरूंनी आपलं रहिवाशीमंडळ स्थापलंय. मोर्चे, आंदोलन, घेराव, लाठ्या आणि तुरुंग आता वस्तीला नवीन राहिलं नाहीय्. परवापरवापावतर कॉर्पोरेटरला लोकांनी चक्क शेणात बुडवलं. एम्. एल.ला पण चक्क हाकलून लावलं. चाळमालकांनीही आपला संघ स्थापलाय. कोर्टात त्यांचे हेलपाटे सुरू झालेयत. इंजेक्शन, ऑर्डर मिळायलाच पाहिजे. एवढ्या लोकाना काय कागदाच्या कपट्यासारखं टरकावून टाकलं जाईल? आम्ही दिलेल्या मतांचं काय झालं? काडी-काडी करून जमवलेले संसार वाऱ्यावर उडून जायची वेळ आली तरी लोकनियुक्त प्रतिनिधींच्या गप्पा अजून संपलेल्या नाहीत काय?

हे उन्हाळ्याचे दिवस केव्हा संपताहेत असं झालंय. पाण्याबाहेर मासा तडफडावा तसं झालंय. सूर्य कासराभर वर चढला की, साऱ्या अंगाची लाही व्हायला सुरुवात होते. तांदळासारखं शिजून व्हायला होत. सावल्या लांब पडेपर्यंत जिवाला चैन पडत नाही.

पत्रे तापून निघाले की, घरात अगदी बसवत नाही. शरीराला कपडाही सोसवत नाही. बरेच लोक अशा वेळी पैसा असला की, सरळ थिएटरात जाऊन बसतात. तीन तास एअरकंडिशंडमध्ये घालवले की, बरं वाटतं. मग काय सूर्यही मावळतीकडे झुकायला लागलेला असतोच.

दुपार आग ओकायला लागली की सारं अंग कसं सुन्न सुन्न झाल्यासारखं वाटतं. बायाबापड्या छातीशी पोरं घेऊन लवंडतात. दुसऱ्या पाळीचे लोकही घराच्या सावलीने पसरतात वा पत्त्याचा डाव मांडतात. कुत्री मातीत खळी करून चिडीचीप होतात. कोंबड्याही घराच्या वळचणीने गपगार होतात. झाडांची पानं हालचाल मिटवून झोपी जातात. वारा अगदी खेळेनासा होतो, बिलकूल पडून जातो.

दुपारचे एक दोन घटे सारं शात, अजगरासारखं सुस्त होऊन जातं. रांगती पोरं मात्र धामोळ्या, खरजेनं चिडीला येतात.

रात्री दारासमोर खाट टाकून जरा पसरू गेलो की, वारा आग लपटून वहायला सुरुवात होते.

उन्हाळा संपायला अजून अवधी आहे. गर्मीची तीव्रता अजून तशीच राहिलेय्.

आंबे-गऱ्याचे दिवस सुरू झालेत्. पोरांच्या अंगातून गर्मी बाहेर पडायला सुरुवात झालीय्.

पोराच्या सुट्ट्याही आता संपायला आल्याय्त. पुन्हा गावाकडे चक्कर टाकायला पाहिजे. सारखीच ओढाताण चाललीय.

लग्नाचा मोसम आता सुरू झालाय्. पत्रिकाचा तर घरात ढीग झालाय. अहेर तरी किती करायचा? बरं, नाही गेलं तर किती रुसारुस!

बनीचंही ह्या वर्षी पहायला हवं होतं. गेली तीस वर्षे सतत चालढकल चाललीय्.


## 'लघुउद्योग' मासिक

(वार्षिक वर्गणी रु. २२ फक्त)

* आपला एखादा उद्योग–व्यवसाय असावा *

अशी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तीने संग्रही ठवावे असे मराठी मासिक!

लघुउद्योगक्षेत्राचा परामर्श घेऊन तरुण व्यक्तींना उद्योगव्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देणारे, १४ वर्षे नियमितपणे प्रकाशित होणारे मासिक.

अधिक माहितीसाठी कृपया संपर्क साधा :–

**महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित**

कृपानिधी, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८

किती काळ असं चालायचं हे? तिच्या चेहऱ्यावरची कोवळीक आता आटायला लागलीय.

आढ्याला निदान टेकू दिला असता ह्या वेळेस! मेढा कसल्या महाग झाल्यायत् आता!

जगणं परवडेनासं झालंय् हल्ली.

गेले तीन-चार दिवस खूपच उष्मा होऊन राहिलाय. उन्हाळी पावसाच्या सरी कोसळायला हव्या होत्या एवढ्यात.

गावाकडे जमीन धूळपेरा होऊन पडलीय कधीची.

काळ्या ढगांचा तर पत्ताच नाही अजून. यंदा बराच उशीर झालाय. ¤

## : २ :

आता एक-दोन सरी तरी नक्कीच येऊन जातील अशी चिन्हं दिसताहेत. वाराही बराच जोराचा सुटलाय. जमिनीवरची धूळही बरीच उडायला लागलीय. जोरानं वाहणाऱ्या वाऱ्यानं तर पत्रे उडून जायचे बहुतेक. आता घरावर चढून मोठेमोठे दगडच ठेवायला पाहिजेत.

धुळीनंतर काहीएक दिसेनासं झालंय आणि पोरं तर केवढ्यानं गोंधळ घालून नाचताहेत. चार-दोन सरीत घेतील अंग भिजवून, मग खोल्यातून पाणी शिरलं की, रात्रभर उपसत जागं राहवं लागेल तेव्हा राहतील शिव्या हासडत.

जो तो आपापल्या छपरावर चढून पत्रे वा मेणकापड उडून जाऊ नये म्हणून मोठाले दगड ठेवण्यात गर्क झालाय. दारातले शेणाचे ढीग चपळाईने घरात हलवायला पाहिजेत. संपूर्ण उन्हाळाभर खपून हिवाळ्यासाठी बेगमी केलेली असते ती. ज्याच्या घरात माळा असतो त्यांना शेणाचा साठा करणं जड जात नाही; पण पडवीतूनच ज्यांच्या खोल्या काढलेल्या आहेत वा मुळातच ज्यांच्या खोल्या लहान आहेत अशांचे मात्र फारच हाल होतात.

चला, घरावरचं काम तर आटोपलं. नवं मेणकापड तर टाकायलाच हवं, नाही तर पाणी आत जायचं. दरवाजाना झडपा बांधायला हव्यात कुडांनाही सलदी ठोकायलाच हवीत. आतली जमीन जरा आधी करून घेतली असती तर बरं झालं असतं.

पावसाला केव्हाही तोंड फुटेल. कुडाणही आता ठीक करावं लागणार. वाऱ्यापुढं टिकायचं नाही. पोराच्या शाळाही आता तोंडावर आल्यात. त्यांची वह्या, पुस्तकं, ड्रेस, पायताणं... गावाकडंही पाहायला पाहिजे. शेतीचा हंगाम. एखादी तरी चक्कर टाकायला पाहिजे. पैशांची फार चणचण चाललीय.

आता आकाश कसं अगदी मोकळं झालंय. जमिनीतून वाफारे निघताहेत. गावाकडं कसा मातीला मस्त गंध सुटतो. पाणी मात्र बरं पांगलं. सरी जोराच्या नव्हत्या तरी अंगण मात्र बऱ्याच ठिकाणी उकरलंय. धूळ खाली बसून गेलीय. व्वा! गारवा आलाय हवेत. बरं वाटतंय!

उघड्यावरच्या म्हशी भैय्यानी तबेल्यात बांधून ठेवल्यायत. बिचारी वासरं भिजून

*With best compliments from :*

**The All India Federation of Co-op. Spg. Mills Ltd.**

**14, Murzban Road, 2nd Floor,**
**BOMBAY - 400 001**

**Shri V. G. Puranik**
*Managing Director*

**Shri D. R. Patil**
*President*

गारठतायत कधीची. आता भैय्यांना ती मरायची जास्त वेळ वाट पाहावी लागणार नाही.

पोरांनी पाण्यात बरा धुडगूस घातला. घामोळया आलेल्या पोरांना नागडं करून आयाबायांनीही पहिल्या सरीचं अप्रूप डोईवर घेतलं.

अंगणातलं किडुकमिडुक घरात हलवल्यानं अंगणं कशी सुनी सुनी-ओकीबोकी वाटताहेत.

पावसाळा जवळ यायला लागला की, लोकाच्या पोटात खड्डा पडत जातो. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा...इथं हर हंगाम वैरी झालाय माणसाचा. सारखी फरफट निघतेय. किडामुंगीची कळा आलीय माणसाला. सुखाचे दिवस कधी येणार ?

रस्त्यावर आणि अंगणात झोपणारे आता घरात पळतील. बिचारी ताजीहळद जोडपी आता हिरमुसायची. त्याचा निवांतपणा आता संपला की, जुहूला फिरणंही आता अवघडच !

पावसाला आता नियमित सुरुवात झालीय. लोकही आता सरावलेयत.

वर्गात पोरं आता कशी पेंगुळलेली असतात. रात्रभर खोलीतलं पाणी उपसून बाहेर टाकावं लागतं. तळं होतं खोलीचं. सारा संसार बाजेवर घेऊन अंग चोरून रात्रभर जागत बसावं लागतं. कसला अभ्यास नि कसलं काय ! स्वतःलाच वैतागलेली असतात. डोळ्यात सूज घेऊनच सकाळी ओल्या दमट कपड्यात शाळेत येतात.

'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे' वगैरे शिकवताना स्वतःलाच फसवल्यासारखं वाटतं.

वस्तीत आता सारीकडे चिखलच चिखल झालाय. श्रावणमासातली हिरवळ आणि पुस्तकातला राय पावसाळा इथं कधीच आढळत नाही.

खेळत्या पोरांना अगदी पाय बांधल्यासारखं झालंय. घरंदारं लावून उगीच स्वस्थ चिडीचीप बससात. रागत्या पोरांना तर सारखं ओढावं लागतं. त्याची ढोपरं अन् हातापायांचे तळवे घुऊन घुऊन आया तर सारख्या बेजार होतात. ओलानं कंबर भरून येते. हातापायाचे सांधेही आखडतात. साफ मोडवशी येते. म्हातारी जमिनीला सुकं बघून चिरगुटातनं मुरकुटत्या वळतात.

आताशा हवेनंपण खूपच ओल धरलीय. लोकांच्या तब्येती बिघडायला लागल्यायत. बहुतेकाना तर सारख्याच धारा लागल्यायत. सारखच चिणपाट हातात असतं.

खोकून खोकून म्हाताऱ्याचे तर पिंजरे बाहेर पडलेयत. तान्ही पोरंपण सर्दी-तापानं बेजार झालीयत. नाकं तर सारखी वाहायला लागलीत.

दोन दिवस तर वाऱ्यापावसानं कहरच केला. रस्ते पाण्यानं तुंबून राहिले होते. वाहतूक वगैरे तर सारंच बंद होतं.

ढोपराएवढं पाणी झालं होतं वस्तीत. बऱ्याच जणांची भांडीकुंडीपण पाण्यानं रस्त्यावर आली होती. घरात पाऊस सुपानं कोसळत होता. मेणकापडं तर फाटून चिंध्या झाली होती.


*With Best Compliments*
*from*

**KETAN ELECTRO-PLATERS**

**Industrial Electro - Platers**

*Specialist in* :

**Gas Stoves and Decorative Brass Plating**

S. V. Road, Opp. Petrol Pump,
Mira Village, Po. Ghodbunder,
Dist. THANA

Phone : 661897

*With Best Compliments*
*from*

**AL-BRIGHT INDUSTRIES**

**Industrial Electro - Platers**

*Specialise in*:

**Acid Zinc Barrel Plating Blackening, Phosphating & Parkertsing**

Al - Bright Compound,
59, S. V. Road, Opp. Petrol Pump.
Mira Village, Po. Ghodbunder
Dist. THANA

Phon : 661897

# BOMBAY SUBARBAN ELECTRIC SUPPLY LIMITED

**Our Activities :**

★ Distribution of Electricity

★ Installation of Power stations, and Electrical Equipments Air Conditioning Plants.

★ Breakdown Services

★ Marketing of Electrical Power, Electrical Equipments and Appliances

★ Computer Services Management Information system,

★ Hire of Domestic Appliances

**: Registered Office :**

Nagin Mahal, 82, Veer Nariman Road Bombay 400020

Gram : "MICROSCREW" Bombay 92

Phone : 662907
662473
Resi . 662171

## GURUCHARAN SINGH

MICRO SCREW MANUFACTURING CO.

Factory :
Kashigaon, P. O.
Mira 401104
Dist. Thana

Office :
Purnima, W. S. Road
Dahisar ( East ),
Bombay 400068

*With best compliments from :*

Call No. 563299

## MALSHE RUBBER WORKS

Manufacturers of Pharmaceutical

and

Industrial Rubber Items.

Unit No. B-5 Udyog Sadan No. 1,
Marol Industrial Area. M. I. D. C.
Andheri ( East ) Bombay 400093.

बायाबापड्याच काय पण गडीमाणसंही रडकुंडीला आलीत. दोन दिवसाचो पावसान साऱ्यानांच रजा दिली; पण वस्तीची साफ दाणादाण झाली की !

पाऊस थावला की पाणी गटारातनं रस्त्यांवर काढून द्यावं लागतं. लोकांनी आता आपापल्या दारात पाट काढलेत. मोऱ्यांचं पाणीही त्यातच सोडून दिलंय. अष्टौप्रहर पाणी दारांतून सारखंच साचून राहिलेलं असतं.

कुत्र्याकोंबड्याच्या सोबतीनं मच्छरही आता माणसाच्या संगतीला रहायला आलंय.

आता पाऊस हत्तीच्या सोंडेने कोसळतोय. थांबून थाबून सरी येताहेत. आकाश कसं नुस्त सदान्‌कदा झाकोळलेलं असतं. सारंच वातावरण अगदी बेजान झालंय. दमट. वस्तीत सगळीकडे चिखलच चिखल झालाय. चार-पाच वर्षांपूर्वी वस्तीत सामुदायिकपणे पावसाळी रस्ता व्हायचा. लोक जमा व्हायचे; दगड इकडून तिकडून गोळा व्हायचे आणि मग त्याचा रस्ता. आता कुणाचा पायपोस कुणात नाहीय. लोक चिखलातून जातील; पण चार–दोन दगडं टाकायची तयारी नाही. ज्यानी त्यानी आपापल्या दारातून दगड टाकून पाय ठेवण्यापुरता रस्ता आपापल्या पुरता तयार केलाय. त्यावरनं चिखलाचे पाय ठेवून कुणी गेले की झालीच शिव्याची सुरुवात. आता तर सारखीच भांडणं होताहेत. पावसाच्या प्रत्येक सरीबरोबर भाडणं चाललीत. मसणातले मुडदेपण उकरून काढताहेत. पावसाचं पाणी दारातनं तुंबल की त्याला वाट काढून देताना भाडणं, नाल्याच्या पाण्यात मोऱ्याचं पाणी सोडून देताना भाडणं; दारातनं कपडे वाळत घालताना भाडणं– भाडणं भाडणं, भांडण ... माणसंपण आता काय जनावरं झालीयत नुस्ती. ज्यांची घरं उंचावर आहेत त्याचे ठीक; पण खालपटीला असलेली घरं मात्र बेटांसारखी दिसतात.

जराशी जरा उघडीप पडली की बरं वाटतं. कपडे, चिरगुटं वाळत घालण्याची तर ह्या दिवसात सोयच नसते. ओल्या दमट चादरी, गोधड्यातनं पडून रहाताना अगदी उमस करते. ह्या दिवसातनं उंदराघुशीना तर ऊतच येतो. जागोजागी त्यांची बिळं बुजवणं हेच एक मोठं काम होऊन रहातं. इलाज दुसरा नसतो म्हणून घरात रहायचं एवढंच !

पावसानं बरी मेहरबानी केली. नाही तर म्हातारीला पोचवणं कठीणच होतं. ओल्या लाकडांनी तसा त्रासच दिला; पण गेली एकदाची म्हातारी ! गेलं आख्खं वर्ष उगीच जमीन धरून होती. स्वतः सुटली तसं दुसऱ्यानाही सोडवलं. बरं झालं. तुकारामला पण हायस वाटलं असेल ! तिच्या हगामुताची चिरगुटं धुऊन रामीपण जेरीला आली होती.

डोक्यावर चार तांब्ये भडाभडा ओतून घेतले तेव्हा कुठं बरं वाटलं. आताशा फार उभं रहावं लागत नाही. गोळे येतात पायात पण करता काय ! ठ्ठो होईपर्यंत थाबणं तर भागच होतं.

पाऊस आता तुरळक तुरळक झालाय. पाऊस नसला की रस्त्याला फिरून तरी येता येतं. घरातल्या घरात अंगपण धरून येतं.

पावसाचा जोर आता बिलकूलच कमी झालाय. दिवसातून एकदोन सरी आल्या तर आल्या. तेवढाच उकाडा कमी होतो.

वाहतं पाणी नसल्यानं नाले आता सारखेच तुंबून रहातात. सारखा गाळ काढावा लागतोय. हररहमेशाच्या भांडणं–कटकटीनं पण वैताग आणलाय. मच्छरडास पण आता खूपच वाढीस लागलेत. केरकचरा कुजत पडून राहिल्यानं चिखलाण खूपच साचून राहिलाय.

पावसाळा आता अगदी कधी उठतोय असं झालंय. ¤

## : ३ :

गौरीगणपतीचे दिवस भिजत भिजत निघून गेले. थोडी उसंत मिळते न मिळते तोच नवरात्र हजर. एरवी वस्तीत शांतता कधी नसतेच. सदानकदा मारामाऱ्या, भांडणं, बाचाबाची, कटकटी चाललेल्या असतात आणि सुदैवानं काही नसलंच तरीही कुत्र्याचं भुकणं काही चुकत नाही आणि आता तर काय नवरात्रच बोलून-चालून. ह्या दिवसांत वस्ती सहसा झोपतच नाही. ओळीनं नऊ दिवसांचं सक्तीचं जागरण घडतं साऱ्याना. लाउडस्पीकरवरून तर वाद्यांचा हा गोंगाट चाललेला असतो नुसता. कोण कसं झोपेल ! आजारी माणसानं तर फक्त मरायचं ! इथं असंच चालतं. एका घरी आनंद तर दुसऱ्या घरी दुःख. कुणाची कळ कुणास नाही. ज्यानं त्यानं आपापले भोग भोगायचे.

बहूरातल्या पोरांनी नवरात्रात बरी मजा


**Anant Commercial Designer**

PRINTERS, STATIONERS, BLOCK MAKERS
& PAPER MERCHANTS

75, Mint Road, Pavri House,
FORT, BOMBAY–400 023

* Phone : C/o 266515

करून घेतली. नवे नवे ऋणानुबंध जुळवायचा ह्याच मोसम असतो !

पावसानं आता पोबाराच केलाय. दूर आकाशाच्या एखाद्या कडेसही काळा ढग उमगत नाही. दारातला चिखल घट्ट झालाय. लोकांनी पायवाटेला घातलेले दगड आपापल्या दारातून उचकटले आहेत. प्रत्येक दारात आता दगडांचे लहान-मोठे ढीग दिसू लागले आहेत.

थंडीचा मोसम असला तरी थंडी काही अजून जाणवत नाय्येय.

सप्टेंबरची अखेर होत चाल्लेय. लोकाच्या बोनसच्या चर्चा सुरू झाल्यायत. बऱ्याच जणाना २० टक्क्यांची आशा आहे. वस्तीत आता पगारदारही बरेच आहेत. पूर्वीसारखे आता काही गुंड, हातभट्टीवाले आणि रोजंदारीवरचेच लोक काही राहत नाहीत. आता महिना आठशे-नऊशे कमावणारे कारागीर आहेत, तसेच खाजगी नि सरकारी ऑफिसांतून काम करणारे कारकूनही आहेत. काही तर शाळामास्तरही आहेत. वस्तीतली पोरंही आता नुसतीच जुगार खेळणारी, दारू पिणारी अन् रंडीबाजी करणारी राहिलेली नाहीत. बरीच पोरं आता शाळांत शिक्षणाच्या पलीकडे गेलीत. काही पोरं तर लाला इंजिनियरिंगला, एम. ए. लाही आहेत. चमत्कारिकरीत्या वस्ती वेगवेगळ्या मानसिकतेत वाटली गेली आहे.

जुगारी, दारुबाज, रंडीबाजांचं जसं एक हिंस्र, गुन्हेगारी जग आहे तसंच कारकून, शाळामास्तर, विद्यार्थी ह्यांचे एक व्हाइट कॉलर शामळू विश्वही आहे. ह्या दोन्हीशी समन्वय साधणारे कष्टकरी कामगारांचे एक अलग संस्थानही आहे. हे सारे लोक एकमेकांशी जुळवून घेत आपापले अस्तित्व टिकवून जगताहेत.

बोनसच्या अंदाजाबरोबरच खर्चाची आकडेमोड चाललीय. गावाकडे कापणीचा हंगाम सुरू झालाय. देणेकऱ्यांची बिलं घरात येत चालल्लीत. पोरांना शाळेला सुट्टी पडलीय.

सप्टेंबर संपलाय. दिवाळीचे वेध लागलेत लोकांना.

पोरं दिवाळीचे दिवे बनवण्यात गर्क झालीयत. घराची साफसफाई सुरू झालीय. कुडं लिपायला सुरुवात झालीय. चुना काढला जातोय. पत्र्यांना रंग चढतोय.

बहुतेकाना ८·३३ टक्केच बोनस मिळालाय. सिडीएसचा हप्ता मिळेल अशी बोलवा होती; पण कसचं काय ? पण लोक तरीही दिवाळीच्या मूडमध्ये आहेत.

ह्या दिवसांत सरकारी कर्मचारी सगळ्यात जास्त दु.खी. बिचाऱ्यांच्या काहीच पदरात पडत नाही; पण त्यांच्याही दारात अंगणं पडलीयत. सारीकडंच सारवण व रंगसफेदी चाललीय.

बाजारात सारं काही आहे. कशाचाच तुटवडा नाही. पैसा आहे तर दिवाळी आहे. फटाके घ्यायचे म्हणजे पैसे सरळ बत्तीवरच धरायचे. महाग असण्यालापण काही सीमा ? पण पोरं आहेत ना ! मग काय करता राव ?

दिवाळी आलीच.

एरवी काळोखात बुडालेली वस्ती कशी लखलखतेय आता. अंगणात रांगोळ्या पडल्यायत. दारावर दिवे लटकताहेत. प्रत्येक


**TYPOGRAPHIC**

**Photo Type Setting**
**& Offset Printing**

B-23 Royal Industrial Estate, 2nd Floor,
Naigaum Cross Road, WADALA,
Bombay 400 031

Tel. 447218 ● 448830

Contact. : M. D. RAJAN RUSI 525832

*With Best Compliments From :*

**MAYUR PRINTERS**

A-43, Royal Industrial Estate
Naigaum Cross Road
WADALA, Bombay 400 031.
*Phone : 445416*

दारात किमान एक तरी पणती आहेच.

फटाक्यांच्या आवाजानं जीव मात्र मेटाकुटीला आलाय. कुत्री-मांजरी आवाजानं भेदरून सैरावैरा धावत आसऱ्याला पळू लागतात.

वस्तीशेजारी रिकाम्या प्लॉटमध्ये सोसायटधांचं कंस्ट्रक्शन चाललंय. पायात गोळे येत होते तरी काठीच्या जोरावर चार जिने चढून गच्चीवर गेलो. वस्ती डोळे भरून पाहतच राहिलो. एरवी कुरूप, ओंगळवाणी दिसणारी वस्ती पणत्यांच्या उजेडात खरंच खूप खूपखूप सुदर दिसत होती. नरिमन पॉइंटचा वेल्टच पाहत होतो जणू !

सारा दोन दिवसाचा तमाशा.

दिवाळी म्हणजे बिलं भागवण्याचं निमित्त !

आज सकाळीच वजीर आणि म्हमद्या येऊन गेले. उराउरी भेटले. घरी यायचं आमंत्रण देऊन गेले. शिरखुर्म्यासाठी.

आज बकरी ईद.वस्तीत मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज पढला. शेजारीपाजारी खास मुस्लिम डिशेस व शिरखुर्मा पोचवला गेला. शेवया खायच्या तर मुस्लिमांच्या हातच्या. ह्या लोकांच्या हातात विलक्षण जादू असते.

पोरांनी नि स्त्रियांनी रंगीबेरंगी छापाची कापडं घातलीत. थबक्या जाळीदार पांढऱ्या काळ्या नि फरवाल्या टोप्या पोरं नि गडीबापयांच्या डोक्यावर पडल्यायत. ईद म्हणजे रंगीबेरंगी कपडे, सायकल चालवणं, पतंग उडवणं आणि शिरखुर्मा !

वस्तीत ईद सामुदायिक साजरी करतात. संध्याकाळी मुशायरा असतो. लाबलाबचे शायरलोक येतात. तोबा गर्दी होते. निरनिराळ्या चवीचे लोक जमा होतात. तीनचार घटका कशा मस्तपैकी निघून जातात ह्याचं भानच रहात नाही.

थंडी आता जाणवू लागलेय. वारा बोचरा झालाय; सोसवेनासा झालाय.

दोन दिवसात पार दैना झालेय देहाची. दिवस-रात्र रॉकेलसाठी रांगेत कुडकुडत मरावं लागलं. चार-चार रुपये लिटरनं हवं तेवढं रॉकेल मिळतंय. रेशनवर मात्र नाही. कसली कपाळाची टंचाई ! साखरेचीही तीच गत ! उघडया बाजारात आठ रुपये दरानं घ्या हवी तर. का असं लोकांना छळताहेत हे लोक ? त्यापेक्षा गोळधा घालून ठार का नाही मारत एकदाचे ? हे दररोजचं मरणं तरी सुटेल !

तब्येतीचं काही खरं नाही. पायांत गोळे येतात. कंबर भरून येते. डोळयासमोर अंधेरी येते. हे उतारवय मोठं वाईट. बदलत्या हवामानाशी शरीर जुळवून घेत नाही. गार वारा त्रस्त करतोय. संध्याकाळी रस्त्यावरून चार पावलं फिरून येणं फार अवघड झालंय.

पेटघा-कपाटांतून ठेवलेले गरम कपडे लोकांनी आता बाहेर काढलेत. घोगडघा, ब्लँकेट्स वापराला निघालेत.

लोकांची अंगं आता भुरकट दिसायला लागलीत. ओठ फाटायला लागलेत. पायाना भेगा पडताहेत. तेल लावून अंग थोडच नितळ होतंय ?

कडाक्याच्या थंडीत कामाला निघायचं म्हणजे दिव्यच.रस्त्याला जागोजागी शेकोटघा पेटवून लोक शेक घेत राहतात. प्रत्येकजण जाळाशी थोडा वेळ अंग शेकवून घेत कामवाले लोक स्टेशनाकडे पळत रहातात.

शाळेत पोरांकडे बघवत नाही. साऱ्यांचेच चेहरे आक्रसलेले. थंडीनं रात्री झोप येत नाही. जागरणानं डोळघात सूज घेतलेली. ह्या असल्या कडक थंडीपुढे चिरगुटाचा कसला निभाव लागतो. तशात सारखी वहाती सर्दी. बेजार झालेली असतात पोरं. कसलं कपाळ अभ्यासाकडे लक्ष लागतंय.

सकाळी प्रार्थना म्हणतानाही दातावर दात आपटत असतात. शरीराला कंप रहातो. सकाळचे दहा वाजले तरी हवेतला गारठा मरत नाही. एक विलक्षण औदासीन्य आणि मरगळ वातावरणात भरून राहिलेली असते. रात्र चढली की थंडीलाही माज चढतो. तबेल्यात म्हशी गारठघानं संत्रस्त झालेल्या असतात. सारख्या हंबरत रहातात. त्यांच्या हंबरण्यानं बेचैनी अधिक वाढते.

उघडघावर बांधलेली वासरं ह्या दिवसात पटापट मरून जातात. ती मरावीत म्हणूनच त्यांना तिथे बांधलेलं असतं. तेवढेच त्यांच्या कातडीचे थोडेफार पैसे मिळतात. बाकी त्यांच्यापासून भय्यांना काही फायदा नसतोच. त्यांना पोसायचा नसता भूर्दंड. त्यांना असंच उपाशी उन्हा-वाऱ्यात आणि गारठघात मारलं जातं. वासरांपासून तोडलेल्या म्हशी जास्तच दूध देतात; पण म्हशीची बेचैनी फारच वाढते. त्या व्याकूळ होऊन रात्रीबेरात्री हंबरू लागल्या की, असल्या ठार थंडीतही काळीज हलून जातं.


भरपूर प्रॅक्टिकल्स ! नोकरीची हमी !!

रेडिओ-ट्रान्झिस्टर-टेलिव्हिजन

टर्नर-फिटर, वायरमन, मोटर रिवाइंडर, पंच-ऑपरेटर

## कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयूट

दादर : कोहिनूरभवन, सेनपती बापट मार्ग, दादर, मुंबई ४०० ०२८
फोन : ४६५९४१, ४६५६८७

अंधेरी : स्टेट बँक ऑफ इंडियाचेवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ५८
फोन : ५६९७९९

ठाणे : ठाणे स्टेशनसमोर, ठाणे (पश्चिम) फोन : ५०१७७५

पुणे : डेक्कन जिमखाना, जंगलीमहाराज रोड, पुणे

# Remember Morarjee

## For Fine Fabrics

**The Morarjee Goculdas Spinning and Weaving Co. Ltd.**

Dr. Ambedkar Road, Parel
Bombay 400012.

☎ 310370

R

# RAVIS & COMPANY

— DEALERS IN —

**LABORATORY CHEMICALS, ACIDS, SOLVENTS, SCIENTIFIC GLASSWARE & APPARATUS**

Bode Chawl, 1 st Fl., Princess St.
BOMBAY 400 002.

**Prop. S. D. OZA** **Rep. V. D. OZA**

# RELIANCE HEAT TRANSFER PVT. LTD.

*Wishes all Success to :*

## Bombay to Purandar re-migration Project

पहाटेचे चार वाजले की वस्तीला हळूहळू जाग यायला सुरुवात होते.

भैय्ये दुधाचे हंडे घेऊन रेल्वेस्टेशनकडे निघालेले असतात. नळांना पाणी सुटतं. बर्फच वितळून वाहातंय की काय असं वाटतं. भयंकर थंड असतं पाणी; पण तशा जीवघेण्या गारठ्यातही दोन-तीन तास पाण्यासाठी घालवावे लागतात. रात्री सारखीच शेकोटी पेटवावी लागते. शेणीचेही भाव बेफाम वाढलेत.वीस रुपये शेकडा. पूर्वी रुपयाला शंभर मिळायच्या. माणसाबरोबर पैशाचीही किंमत सारखीच घसरतेय.

ह्या कडाक्याच्या थंडीतही वस्ती भयानक तापतेय. दोन दिवसांपूर्वीच एक मर्डरकेस घडली. मवाल्याच्या दोन गटात भाडणं झाली. एक अठरा–वीस वर्षांच अगदी कोवळं पोर जिवास मुकलं. आणखी चार–पाच जणांनीही घाव खाल्ले. बिचारे आईबाप !

वस्तीतली मवाली पोरं दोन गटात वाटली गेलीत. कुणाच्याही अध्यामध्यात नसणाऱ्या शाळकरी पोरांनाही गच्चीला धरून मवाली विचारतात,

' काय रे भडव्या, तू कुणाच्या पार्टीत ?'

बिचारं पोरगं भेदरून जातं. काय कपाळ बोलणार ? कानाखाली पाच बोटं उठली की पोर घरी परत येतं.

कुणी काहीच बोलत नाहीय. सारेच भेदरलेत. मवाल्यांची टोळकी अंतराअंतरावर उभी असतात तरण्या पोरींनी बाहेर पडायची धास्तीच घेतलीय विचारणार कोण ह्या मवाल्यांना ? वस्तीत पोलिसपहारे बसवलेय्‌त. पत्त्यांच्या डावात पोलिसाचा छान दिवस जातो. कधीकधी बाटल्याचा अहेरपण होतो.

बराच काळ निघून गेलाय. वातावरण निवळलंय. जीवन पूर्ववत सुरू झालंय.

पायांना जागजागी भेगा पडल्याय्‌त. बिब्यानं डागलं की थोडा वेळ बरं वाटतं. खूप दुखत रहातं चालताना. अंग विलक्षण आक्रसलं आहे.

रिवाज पार पडला. तिळगूळ दिला, घेतला. पुढाऱ्यांनी सगळ्या बायकांचं एकच महिलामंडळ स्थापन केलं. सामुदायिक हळदीकुंकू झालं. तेवढ्यापुरतं हेवेदावे, उणीदुणी विसरली गेली. वर्गण्या काढल्या. गोड गोड बोलणं झालं.

समारंभ झाला. अजून हिशेब बाकी आहे. खरी रणं लढली जातील ती तेव्हाच.

माणूस मोठा गूढ प्राणी. ठावच लागत नाही त्याचा. रुसणं, हसणं, लढणं, पुन्हा सारं विसरणं आणि तेच काही काळानं उकरणं...किती बेरकी असतं हे जीवन ! आपलंसंही वाटत नाही अन्‌ परकंही म्हणता येत नाही. नुसतं जगतच रहायचं; पण कशासाठी ? □


**We all at**

# Abhi Chemical & Pharmaceutical Private Limited

PUNE 411 026

**Wish you grand success achieving**

*Reverse Migration from Bombay to Purandar*

This achievement, we are sure, will give a momentum to this very important aspect of developing our societies in the desired direction.

: Telex : Pn 388 | : Grams : ABHICHEM | : Phone : 82979, 83077

: *Registered Office & Factory* :

MIDC Plot Nos. T-37, and T-38, Bhosari Industrial Area,
PUNE - 411 026 ( India )

By providing basic infrastructure facilities—developed land, approach roads, water and power—**MIDC** has been playing a vital role in the industrial development of Maharashtra. It has now 60 industrial areas spread up all over the state, housing small, medium as well as large scale industries of all types. Nearly 3,050 units are now in production employing a work force of

MORE THAN 1·36 LAKH

**MIDC**

*With Best Compliments from :*

**M/s Krest Chemicals Pvt. Limited**

Manufacturers and
Manufacturer's Representatives
FOR

Chemicals and
Fine Chemicals

*OFFICE :*
10, Gajjur Colony, Nizampure,
**Baroda - 390 002**
( GUJRAT ) INDIA

Telephone : 8440 - 8570
Gram : " CREST "

WE SPECIALISE IN
↓
**Timely Quality Supply**
FOR

- ☐ SAND
- ☐ BRICKS
  AND
  ALL SORT OF
- ☐ CONSTRUCTION MATERIAL

CONTACT :

**J. & K. TRADE LINK**


VEER SAWARKAR ROAD,
THANE

रेडिओ, ट्रान्झिस्टर–टेलिव्हिजन
शिक्षणाचे माहेरघर !

**प्रोग्रेसिव्ह टेक्निकल क्लासेस**
मुंबई – पुणे

किसान–कामगार विशेषांकासाठी
हार्दिक शुभेच्छा !

संचालक, शिक्षक सहकारी व विद्यार्थीवर्गातर्फे



आता ही घ्या-मुलायम दाढी करणारी ब्लेड
हळूवारपणे दाढी करते, जास्त चालते.
STAINLESS
Lancer
MADE IN INDIA
Lancer
MADE IN INDIA
STAINLESS
Lancer
सादर करीत आहोत
लान्सर
स्टेनलेस ब्लेड
अनेकदा प्रयत्न करूनही हवी तशी मनपसंत मुलायम दाढी करणे तुम्हाला जमले नसेल तर आता वापरा नवीन ब्लेड— लान्सर!
लान्सरची खास प्रक्रियेने बनविलेली तीक्ष्ण धार अजिबात कापत नाही. प्रत्येक वेळी कशी सुखद मुलायम दाढी बनते.
आजच लान्सर घ्या. फायदेशीर ब्लेडचा हा फायदेशीर सौदा.
लान्सर-मस्त मुलायम दाढीसाठी.
मुलायम दाढी करणारी ब्लेड
विक्रेते : टी. टी. कृष्णमाचारी ॲण्ड कं.
मद्रास • मुंबई • कलकत्ता • दिल्ली.
Imageads-TTK-8013-m



# रोपणीला येणार ?

महाराष्ट्रात आज अनेक ठिकाणी गावातील माणूस जागा व्हावा या उद्देशाने निरनिराळे कार्यक्रम चालू आहेत. काही ठिकाणी या कामाचे स्वरूप शेताच्या पाण्यासाठी बंधारे आणि लिफ्ट इरिगेशन यासाठी माणसांची संघटना असेल, तर काही ठिकाणी वर्षभर शेतीउद्योग पुरविण्याच्या दृष्टीने कोणत्या पिकांची योजना करायची व ती कशी घ्यावयाची याबाबतचे लहान शेतकऱ्यांचे शिक्षण असेल. कार्यक्रम बालशिक्षणाचा, स्त्रीशिक्षणाचा वा प्रौढशिक्षणाचा असेल किंवा रोगनिवारणाचा वा कुटीरोद्योगाचा असेल.

मूलत: हे सर्व कार्यक्रम माणसाने आपले भविष्य स्वत: जाणीवपूर्वक घडविण्याचे. आजची सामाजिक नि आर्थिक विषमता, आजचे दारिद्र्य ही एक नशिबाने दिलेली आणि म्हणूनच न बदलणारी घटना न मानता ' समत्वावर ' आधारित नवीन कल्पना पेरू आणि उगवू या उमेदीने समाज बांधण्याचे. मग या ' समत्वा 'चा उगम मार्क्समाओच्या वाङ्‌मयातला असेल किंवा गांधींच्या प्रयोगशीलतेतून. आणि बऱ्याच वेळा असेही आढळेल की, गावकऱ्यांना हे ' समत्व ' कोण्या माळकरी तुकोबारायाने वा कीर्तन करणाऱ्या एकनाथाने फार सोप्या शब्दात आधीच सांगितलेले असते.

महाराष्ट्रात चाललेल्या अशा अनेक कार्यक्रमांची नोंद ठेवण्याचे कार्य ' ग्रामायन ' ही संस्था करते. या कार्यक्रमात निरनिराळ्या तऱ्हेच्या माणसांची गरज लागते. कधी रोग निर्माणच होऊ नयेत म्हणून गावाला समजाविणारा डॉक्टर लागतो, तर कधी तलाठ्याशी वा ' भाऊसाहेबां 'शी आम्हालाही कायदा समजतो असे सांगणारा वकील लागतो. कधी शेतीतज्ज्ञ लागतो, तर कधी पाण्याची योजना कशी करता येईल हे सांगणारा इंजिनिअर लागतो. कधी फिल्म्स् दाखवून शिक्षण देणारा कीर्तनकार लागतो तर कधी फोटोग्राफर. कधी दुधाचा धंदा तर कधी रेशमाचे किडे पाळण्याचा धंदा किंवा असे अनेक धंदे, जोडधंदे म्हणून गावकरी असे करू शकतील ते सांगणारा लागतो; तर कधी ह्या धंद्यातून निर्माण होणारा माल नीट विकला जाईल अशी यवस्था करणारा लागतो. अनेक निरनिराळ्या कला, तंत्रे, अनुभव असलेली माणसे लागतात. ह्या माणसांना युनिव्हर्सिटीने दिलेली डिग्री आवश्यक नसते. बरीचशी अशी माणसे अनुभवाच्या शाळेतच शिकलेली असतात. आवश्यक असते शास्त्रीय दृष्टी व सामाजिक बांधिलकी. आवश्यक असते ती उमेद-उद्याचा भारत घडविण्याची. त्याकरिता उन्हात उभे राहून खेड्यातल्या श्रमिकांशी संवाद साधण्याची.

' ग्रामायन 'चा स्वत:चाही असा एक उपक्रम आहे. हा उपक्रम नवीन स्वरूपाचा आहे. काळाशी मुकाबला करण्यासाठी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उपसासिंचन योजना अंमलात आणल्या गेल्या शिरूर तालुका (पुणे जिल्हा) हा एक असाच दुष्काळी आणि दरिद्री तालुका. या तालुक्यात बऱ्याच सरकारी उपसासिंचनांची सरकारी दप्तरात अधिकृत नोंद आहे दुर्दैवाची गोष्ट अशी की, त्यापैकी बहुतेक सर्व योजना बंद आहेत. परिणामत: लोक दारिद्र्यातच खितपत पडले. कर्जाचा बोजा वाढला. हलाखी वाढली. या योजना चालू करण्यास गावकऱ्यांना उद्युक्त करणे त्यासाठी त्यांना सहाय्य देणे हे काम ' ग्रामायन 'तर्फे सध्या चालू आहे. गावकऱ्यांनीच या योजना चालवण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे आणि समन्वाच्या दिशेने पावले उचलली पाहिजेत असा ' ग्रामायन 'चा प्रयत्न आहे.

हे काम एकट्या दुकट्याचे नाही. सगळ्यांनीच त्यात भाग घेतला पाहिजे. तरुणांनी आणि प्रौढांनीही. त्यांनी थोडा वेळ, आपले ज्ञान आणि कौशल्य या कामासाठी वापरले पाहिजे.

पूर्वी रोपणाच्या वेळी खेड्यातल्या शेतकऱ्याला मदत करायला त्याचे शहरातले भाऊ जात असत. आज अनेक नवीन रोपे घेऊन शहरातल्या जाणकार मंडळींनी खेड्यातल्या या माणूस जागा करण्याच्या कार्यक्रमात भाग घेण्याची आवश्यकता आहे. असे समयदान, ज्ञानदान, प्रत्यक्ष काम करू इच्छिणाऱ्यांनी ग्रामायनबरोबर संपर्क साधावा.

मुंबईत यासाठी आजवर संपर्कव्यवस्था ग्रामायनला उपलब्ध नव्हती, ती आता झाली आहे. मुंबईचा पत्ता असा–

' ग्रामायन ', C/o डॉ. श. शं. कुलकर्णी,
एम्–४, प्रथमेश को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी.
वीर सावरकर मार्ग. प्रभादेवी, मुंबई–४०० ०२५
दूरध्वनी : ४६१८२६

पुण्याची संपर्कव्यवस्था होती ती मात्र सध्या विस्कळित झाली आहे. पत्रव्यवहारापुरती ' माणूस 'ची सोय आहे; पण बैठकांसाठी व कार्यालयीन कामकाजासाठी जागा नाही. पुण्यात कुणी जागेबाबतची ही ग्रामायनची अडचण सोडवू शकतील असे असल्यास त्यांनी कृपया त्वरित संपर्क साधावा. पुण्यातील–संपर्क–साप्ताहिक माणूस, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० ●

*With Best Compliments from :*

# ACCURATE ENGINEERING CO. PVT. LTD.

67, Hadapsar Industrial Estate
P. B. No. 1202, Poona 411 013

**Manufacturers of Precision Gauges**
**Industrial Machine Tools**

Gram : Accurate ☐ Telephone : 7158 / 59
Telex : 0145-363-ORET-IN